पुणे, शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 72 • वर्ष ४ थे, अंक ७२ • किंमत ₹ ६ • पाने : १२



नाशिक रेल्वेच्या जुन्या मार्गाला केंद्राचा 'ग्रीन सिग्नल?

P३

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com
Beyond The News

भारताची विजयी घोडदौड श्रेयश, शुभमन, अक्षर यांची जोरदार फटकेबाजी

१२



## At a Glance

### पवार-भुजबळ मतभेदाचे अंतर कमी होतेय

**पुणे :** गेल्या महिन्याभरापूर्वी अजित पवार आणि छगन भुजबळ यांच्यामध्ये असलेले मतभेदाचे अंतर हळूहळू कमी होत असल्याचे दिसून येत आहे. शिर्डीचे अधिवेशनासाठी अजित पवार यांनी आपल्याला फोन केला आणि आपण बसून चर्चा करू याबद्दल आश्र्वस्त केले . त्यामुळे आपण अधिवेशनाला आलो. असे छगन भुजबळ यांनी सांगितले.

» पान ७ वर

### मुख्यमंत्र्यांची कुरघोडी

**पुणे :** परिवहन महामंडळाचे अध्यक्षपदी अप्पर मुख्य सचिव संजय शेट्टी यांचे नियुक्ती करत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर कुरघोडी केली. थेट राज्य शासन आदेश काढून याबाबतचा अध्यादेश त्यांनी जारी केला. परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी संजीव सेठी या आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यांची नियुक्ती करत हे महामंडळ किंबहुना हे मंत्रालय थेट आपल्या

» पान ७ वर

# दादांचा रौद्रावतार!

## सुव्यवस्थेची जबाबदारी पोलिसांची: कोयता गँगवर ही भाषा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पोलीस आयुक्तालयाच्या भूमिपूजन समारंभात आज ना. अजितदादा पवार यांनी आपला रौद्र अवतार दाखवला. कायदा आणि सुव्यवस्था राखण करण्याची तसेच ती अबाधित ठेवण्याची जबाबदारी ही पोलिसांची आहे . त्यामुळे पुण्यामध्ये एवढे गुन्हे घडतातच कसे ? असा सवाल त्यांनी केला. कोण कुठली कोयता गँग ? कुठून आली , काय करते ? त्याचे एवढे कसे प्रस्थ वाढले अशा प्रश्नांची सरबत्ती करत त्यांनी पोलिसांना याबाबत कडक कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

अशा लोकांना मकोका लावा , काय वाटेल ते लावा, कुठलेही कलमे लावा परंतु शासन करा त्यांच्यावरती कठोर कारवाई करा असे ते म्हणाले.

इतकेच नव्हे तर अशा गुन्हेगाराची धिंड काढून त्यांच्यावर जरब बसवा असेही आदेश पोलिसांना दिले.



पुणे न्याय आणि सुरक्षेसाठी अढळ निर्धार!: 'निबे लिमिटेड' वर्धापन दिन व अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल, लघु शस्त्रास्त्र निर्मिती सुविधेची पाहणी करताना...

दादा म्हणाले की , मी मुख्यमंत्र्यांसमोरच सांगतो की अशा गुन्हेगारांना अजिबात दयामाया दाखवू नका . इतर समाजावर त्याचा धाक बसला पाहिजे. दहशत बसली पाहिजे . यासाठी त्यांची धिंड काढा . काहीही करा परंतु ही गुन्हेगारी तातडीने थांबवा.

याच कार्यक्रमात शिट्ट्या मारणाऱ्या काही नागरिकांचाही त्यांनी समाचार घेतला . तुम्हाला काही शिस्त वगैरे प्रकार आहे की नाही , असे सांगत त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर असे प्रकार टाळले पाहिजेत. असे कोणी वागणार असेल तर त्याला पोलिसांकडून उचलून आणतो असाही इशारा त्यांनी यावेळी दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील यावेळी उद्योजकांना त्रास होऊ नये अशी भावना

» पान ७ वर

### महायुतीच्या चांगल्या बातम्या द्या नाहीतर...

- देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी एके 47 रायफल ची पाहनी करताना ती रायफल माध्यमांच्या प्रतिनिधीकडे रोखत मिश्किल टिप्पणी केली.
- दादा म्हणाले , महायुतीच्या चांगल्या बातम्या द्या नाहीतर आम्ही दोघेजण तुम्हाला उडवून टाकू. या विनोदावर सर्वांनी हसून दाद दिली

### तुम्हाला शिस्त नावाचा काही प्रकार आहे का ?

- कार्यक्रम सुरू होत असताना काही हौशी आणि उत्साही नागरिकांनी शिट्या वाजवल्या त्यावर अजित दादा यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री व्यासपीठावर असताना शिट्ट्या काय वाजवता ? हा शिट्या वाजवण्याचा कार्यक्रम आहे का ? तुम्हाला शिस्त नावाचा काही प्रकार आहे का ? अशा प्रश्नांची सरबत्ती करत त्यांनी , पोलिसांकडून उचलून आणण्याचा इशारा दिला.

# मुंडेंचा पाय खोलात शर्मा यांना पोटगी मंजूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढत असून आज न्यायालयाच्या एका निर्णयामुळे त्यांचा पाय आणखी खोलात गेल्याचे दिसत आहे .

मुंबई न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचार प्रकरणी करुणा शर्मा यांनी केलेल्या अर्जावर ४ फेब्रुवारी रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान धनंजय मुंडे यांच्यासंदर्भात कोणताही अंतिम निष्कर्ष काढलेला नाही. अर्जदार करुणा शर्मा आणि त्यांची मुलगी शिवानी यांची सध्याची आर्थिक परिस्थिती आणि अन्य निकषांच्या आधारे अंतरिम देखभालीसाठी मिळून २ लाख रुपये (अर्जदार क्र. १ यांना १.२५ लाख, तर अर्जदार क्र. ३ यांना ७५ हजार रुपये प्रति महिना) पोटगी म्हणून देण्याचा अंतरिम निर्णय दिलाय.



धनंजय मुंडे यांच्या वरील आरोपांच्या अनुषंगाने किंवा कौटुंबिक हिंसाचाराच्या अनुषंगाने कोणत्याही आरोपांवर काहीही निर्णय अद्याप दिलेला नसून, याबाबत काही माध्यमांवर दाखविण्यात येत असलेले वार्तांकन निराधार आहे, असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे धनंजय मुंडेंच्या वकील ॲड. सायली सावंत यांनी स्पष्ट केलंय. धनंजय मुंडे यांनी स्वतःच आपल्या व्यक्तिगत आयुष्याबाबत याआधी जाहीर खुलासा करत ते करुणा शर्मा आणि मुले यांच्याबरोबर लिव्ह इनमध्ये राहिल्यासंदर्भात त्यांनी यापूर्वीच कबुली दिलेली असून, आजच्या अंतरिम आदेशाला त्याचाच आधार असल्याचे वकील सायली सावंत यांनी स्पष्ट केलंय.

ॲड.सायली सावंत यांनी याबाबत माध्यमांनासुद्धा विनंती केली असून, सर्व माध्यमांनी जबाबदार आणि अचूक वार्तांकन करावे, तसेच न्यायालयाच्या अंतरिम आदेशावर आधारित कोणतीही दिशाभूल करणाऱ्या किंवा खोट्या वार्तांकनापासून दूर राहावे, कुणाचीही नाहक बदनामी होईल, असे चुकीचे वार्तांकन करू नये. कुठल्याही माध्यम प्रतिनिधींना याबाबत अधिक माहिती किंवा स्पष्टीकरण हवे असल्यास ते वकिलांकडे मागावे, असे आवाहन ॲड. सायली सावंत यांनी केलंय.

# परदेशीय स्थलांतर सुरक्षित करणार

## अमेरिकेच्या कारवाईनंतर भारताचा पावित्रा


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बेकायदा भारतीयांना अमेरिकेतून हद्दपार करण्याच्या मुद्द्यावरून गदारोळ माजला आहे. विरोधक सातत्याने केंद्रावर हल्लाबोल करत आहेत. आता केंद्र सरकार या मुद्द्यावर मोठं पाऊल उचलू शकतं. परकीय रोजगारासाठी सुरक्षित, व्यवस्थित आणि नियमित स्थलांतराला चालना देण्यासाठी केंद्र सरकार नवा कायदा आणण्याचा गांभीर्याने विचार करत आहे. १०४ बेकायदा भारतीय स्थलांतरितांना घेऊन अमेरिकेचे लष्करी विमान बुधवारी अमृतसरमध्ये दाखल झाले. डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने बेकायदा स्थलांतरितांवरील कारवाईचा भाग म्हणून हद्दपार केलेल्या भारतीयांची ही पहिलीच तुकडी आहे. काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या अध्यक्षतेखालील संसदेच्या परराष्ट्र विषयक स्थायी समितीने लोकसभेत सादर केलेल्या अहवालात ओव्हरसीज मोबिलिटी (सुविधा आणि कल्याण) विधेयक २०२४ प्रस्तावित करण्यात आले आहे. रोजगारासाठी परदेशात जाणाऱ्या भारतीय नागरिकांचे स्थलांतर सुरक्षित आणि संघटित करणे हे या विधेयकाचे उद्दिष्ट आहे. संसदेच्या परराष्ट्र विषयक स्थायी समितीच्या अहवालात हे विधेयक समोर आले आहे. काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे.




जागतिक स्थलांतराचा बदलता कल आणि भारतीय नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन समितीने १९८३ च्या स्थलांतर कायद्यात व्यापक सुधारणा करण्याच्या तातडीच्या गरजेवर वारंवार भर दिला आहे, असे अहवालात म्हटले आहे. प्रदीर्घ विलंबानंतर मंत्रालय आता 'ओव्हरसीज मोबिलिटी (सुविधा आणि कल्याण) विधेयक, 2024' या नावाने नवीन कायदा लागू करण्याचा गांभीर्याने विचार करत आहे. हा प्रस्तावित मसुदा

» पान ७ वर



> अवैध स्थलांतरितांना हद्दपार करण्याची प्रक्रिया सामान्य आहे, परंतु अमेरिकन अधिकाऱ्यांकडून भारतीय नागरिकांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीवर टीका केली. लोकांना हद्दपार करण्याची ही पहिलीच वेळ नाही. गेल्या वर्षी बायडन प्रशासनाच्या काळात ११०० हून अधिक भारतीयांना हद्दपार करण्यात आले होते. पण हे प्रकरण अधिक आक्रमकपणे करण्यात आल्याने लक्ष वेधून घेतले.
>
> — **शशी थरुर, खासदार**



### सोन्याचा नवा उच्चांक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** भारतातील सोन्याच्या किंमती बुधवारी सर्वाधिक वाढून प्रति ग्रॅम ८४३२ रुपयांवर पोहोचल्या. ४ फेब्रुवारीच्या दरांच्या तुलनेत १३२२ रुपयांनी यात वाढ झाली. केंद्रीय बँकांच्या खरेदी आणि गुंतवणूकदारांच्या वाढत्या हितामुळं जागतिक स्तरावर सोन्याच्या मागणीत वाढ होत असताना, भारतात सोन्याच्या किंमती नव्या उंचीवर पोहोचल्या आहेत.

जागतिक सुवर्ण परिषदेनं सोन्याच्या मागणीच्या ट्रेंडवरील ताज्या अहवालात असं उघड केलं आहे की, मजबूत आणि सतत मध्यवर्ती बँकांची खरेदी आणि गुंतवणूक मागणीतील वाढ यामुळं २०२४ मध्ये जागतिक सोन्याची मागणी, ज्यामध्ये ओव्हर-द-काउंटर


» पान ७ वर

# पुण्यात वाहन तोडफोडीचे सत्र सुरूच, २५ वाहनांची तोडफोड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात वाहन तोडफोडीचे सत्र कायम असून बिबवेवाडीत २५ वाहनांची तोडफोड झाल्याची घटना ताजी असतानाच येरवडा परिसरात २४ वाहनांची तर फरासखाना परिसरात चार वाहनांची तोडफोड झाली आहे. कोणतेही कारण नसताना केवळ हुल्लडबाजीसाठी वाहनांची तोडफोड केले जात असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे टवाळखोरासंह हुल्लडबाजी करणाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

पोलिसांनी गुन्हेगारांविरुध्द आक्रमक पवित्रा घेऊनही गुन्हेगार वठणीवर येत नसल्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. वाहन तोडफोडीच्या सत्रामुळे हातावर पोट असणाऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये लक्ष्मीनगरमध्ये तब्बल २२ चारचाकी आणि दोन दुचाकीची तोडफोड केली. ही घटना बुधवारी रात्री घडली. घटनास्थळी पोलिसांनी पाहणी केली असता, एकजण हातात धारदार शस्त्र घेऊन वाहनांची तोडफोड करताना दिसत आहे. यातील काही वाहने ही पोलीस चौकीच्या जवळच फोडण्यात आली आहेत. घटनास्थळी गुन्हे शाखा आणि पोलीस ठाण्याची पथके रवाना झाली होती.



**तोडफोडीची नागरिकांमध्ये भीती**

येरवडासह फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये कागदीपुरा परिसरातील सातातोटी चौकी येथे चार ते पाच वाहनांची तोडफोड केली आहे. त्यामुळे फरासखाना परिसरातील नागरिक देखील भीतीच्या वातावरणामध्ये आहेत. वाहनाची तोडफोडीच्या या प्रकरणात पाच आरोपी ताब्यात आहेत. पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार तरुणांनी हातात कोयता आणि बांबू घेऊन गाड्यांची तोडफोड केली.



> लक्ष्मीनगर परिसरात २२ रिक्षा आणि दोन दुचाकीची तोडफोड झाली आहे. आणखी कोणाची वाहने फोडली असतील तर त्याची माहिती घेतली जात आहे. **— हिम्मत जाधव पोलीस उपायुक्त, परिमंडल चार**

**भारतीयांच्या सुरक्षेसाठी**

### क्रीडा समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचे निधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** प्रसिद्ध क्रिकेट समीक्षक आणि लेखक द्वारकानाथ संझगिरी यांचं गुरुवारी दीर्घ आजारानं निधन झालंय. वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मुंबईतल्या लीलावती रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू असताना, त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची बातमी कळताच क्रिकेट विश्वातून हळहळ व्यक्त केली जातेय.

द्वारकानाथ संझगिरी यांनी खुमासदार क्रिकेट लेखन केलं. त्यांची अनेक पुस्तक प्रसिद्ध असून, क्रिकेटवर त्यांनी अनेक कार्यक्रम केले. मराठी साहित्य आणि क्रिकेटमधील रुचीने त्यांच्यातला क्रिकेट

» पान ७ वर

## बांगलादेशात पुन्हा हिंसाचार

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**बुलडोझर रॅली:** पश्चिम बंगालमध्ये आज मोठ्या प्रमाणात हिंसाचार उफाळला. शेख हसीना यांच्या पूर्वजांच्या बंगल्यावर बुलडोजर चालवून त्यांचे बांधकाम जमीनदोस्त करण्याचा प्रयत्न केला.

# काँग्रेसकडून सबका साथची अपेक्षा चुकीची: मोदींचा घणाघात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** "सबका साथ, सबका विकास, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. म्हणूनच देशाने आपल्या सर्वांना येथे बसण्याची संधी दिली आहे; पण काँग्रेसचा विचार केला तर, त्यांच्याकडून 'सबका साथ, सबका विकास' अशी अपेक्षा करणे ही मोठी चूक ठरेल असे मला वाटते. हे त्यांच्या कल्पनेपलीकडचे आहे. ते त्यांच्या आकलनशक्तीच्या पलीकडे आहे. कारण एवढा मोठा पक्ष एकाच कुटुंबाला समर्पित झाला आहे. त्याच्यासाठी, सर्वांचा पाठिंबा आणि सर्वांचा विकास शक्य नाही," अशा शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि. ६) राज्यसभेत विरोधी पक्षावर हल्लाबोल केला. राष्ट्रपती




द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला उत्तर देताना ते बोलत होते.

यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, काँग्रेस सरकारच्या काळात प्रत्येक गोष्टीत तुष्टीकरण होते. खोटेपणा, कपट, भ्रष्टाचार, घराणेशाही आणि तुष्टीकरण यांचे मिश्रण असणारे राजकारणाचे मॉडेल काँग्रेसने तयार केले आहे. अशा प्रकारचे मिश्रण असते तिथे सर्वांचे सहकार्य आणि सर्वांचा विकास होऊ शकत नाही. काँग्रेस मॉडेलमध्ये कुटुंब प्रथम सर्वात महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्याची धोरणे, मार्ग, भाषण आणि वर्तन फक्त त्या

» पान ७ वर


# अखेर अभिनेता राहुल सोलापूरकरचा राजीनामा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अभिनेता राहुल सोलापूरकरने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त झाला. राजकीय नेत्यांकडूनही सोलापूरकरच्या वक्तव्यावर टीका करताना त्याला जिथं दिसेल तिथं बदडा अशी भावना व्यक्त करण्यात आली. राहुल सोलापूरकर ज्या ज्या संस्थांवर आहेत, तिथून त्याचा राजीनामा घ्या, त्याला कुठेही अभिनयाचं काम देऊ नका, अशा मागणीसह पुणेकर रस्त्यावर उतरल्याने शेवटी वाढता विरोध आणि शिवभक्तांची नाराजी लक्षात घेऊन राहूल सोलापुरकर यांनी भांडारकर प्राच्यविद्या संस्थेच्या विश्वस्त पदाचा राजिनामा दिला आहे. भांडारकर संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष नंदकुमार फडके यांच्या कार्यालयात राहूल सोलापुरकर यांनी राजिनामा दिला असून संस्थेने तो स्वीकारला आहे, असल्याची माहिती संस्थेचे मानद सचिव प्रा. सुधीर वैशंपायन यांनी दिली.

### लष्कराच्या हेलिकॉप्टरचा भीषण अपघात



**भोपाळ :** भारतीय लष्कराचे हेलिकॉप्टर कोसळून मध्य प्रदेशात दुर्घटना घडली. शिवपुरीत हवाई दलाचे हेलिकॉप्टर शेतात कोसळले . हेलिकॉप्टर कोसळल्यानंतर आग भडकली आणि यात हेलिकॉप्टर जळून खाक झालं. सुदैवाने या घटनेत कोणतीही जिवीत हानी झालेली नाही. हेलिकॉप्टरमधील दोन्ही पायलट सुखरुप आहेत. हेलिकॉप्टर दुर्घटनेचे कारण अद्याप समोर आले नाही.

यावेळी पायलटने प्रसंगावधान राखत हेलिकॉप्टर नागरी वस्तीपासून दूर नेलं. अन्यथा हेलिकॉप्टर घरांवर कोसळून अनर्थ झाला असता.

# तिजोरीतील खडखडाट : अनेक योजनांना ब्रेक !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य शासनाच्या तिजोरीत खडखडाट झाल्यानं अनेक योजनांना ब्रेक लागण्याची शक्यता आहे. एक लाख कोटी रुपयांची तूट भरुन काढण्यासाठी शिवभोजन थाळी, आनंदाचा शिधा सह इतर योजना बंद करण्याच्या विचारात राज्य सरकार असल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळं तिजोरीवर भार वाढला आहे. आगामी अर्थसंकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या विविध विभागनिहाय बैठकांमध्ये इतर योजना बंद करण्यासंदर्भात चाचपणी केली जाणार आहे.



शिवभोजन थाळी बंद करु नका अशी मागणी छगन भुजबळ यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

शिवभोजन थाळी उद्धव ठाकरे यांचे सरकार असताना सुरु करण्यात आली होती. त्यावेळी छगन भुजबळ अन्न व नागरी पुरवठा मंत्री होते. राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे, दोन लाख कोटींहून अधिक तूट आहे. त्यामुळे एक लाख कोटींची तूट भरुन काढली तर गाडा सुरळीत चालू शकतो, असे अर्थमंत्र्यांचे म्हणणे आहे. यासंदर्भात विभागवार बैठका झालेल्या आहेत. शिवभोजन थाळी, आनंदाचा शिधासह इतर योजना बंद होण्याची शक्यता आहे.

शिवभोजन थाळीचे दिवसाचे लाभार्थी १,९०,००० आहेत. या योजनेसाठी वार्षिक खर्च २६३ कोटी रुपये लागतात. त्यामुळे ही योजना बंद करावी का अशी चाचपणी सुरु आहे. आनंदाचा शिधा एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सुरु करण्यात आली होती. दिवाळी, शिवजयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आनंदाचा शिधा वाटप करण्यात आलं होतं. आनंदाचा शिधा म्हणून चार वस्तू १०० रुपयात दिल्या जातात. बाजारात याची किंमत ५०० रुपये इतकी आहे. त्यामुळं उरलेली रक्कम राज्य सरकार आपल्या अनुदानातून भरत होते.

दोन्ही योजना बंद करण्याची वेळ येते की काय अशी चर्चा आहे. अर्थमंत्र्यांनी काही आढावा बैठका घेतलेल्या आहेत. त्यामध्ये दोन्ही योजना बंद करायच्या का अशी चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. यापूर्वी शिवभोजन थाळी आणि आनंदाचा शिधा योजना बंद करावी का अशा चर्चा झाल्या होत्या तेव्हा विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती.आता अर्थसंकल्प सादर होणार आहे त्यामुळं या योजना बंद करायच्या का अशा चर्चा सुरु आहेत.

लाडकी बहीण योजनेमुळे तिजोरीवर भर वाढलेला आहे. कंत्राटदारांचे ८९ हजार कोटी रुपयांची थकबाकी असल्याने आंदोलन सुरु आहे. त्या पार्श्वभूमीवर शिवभोजन थाळी आणि आनंदाचा शिधा योजने बाबत काय निर्णय होतो ते पाहावे लागेल.

#रा

# वडगावशेरीत पाण्याची 'गळती'...!

## अधिकारीच करतात कृत्रिम टंचाई; आमदार बापूसाहेब पठारे यांचा सनसनाटी आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुका झाल्यापासून वडगावशेरीत कृत्रिम पाणीटंचाई केली जात आहे, विरोधी पक्षाचा आमदार असल्यानेच सत्ताधारी यंत्रणेकडून हे षडयंत्र रचले जात आहे. या पाणी 'गळती'ला अधिकारीही जबाबदार आहेत असा सनसनाटी आरोप वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी केला आहे.

वडगाव शेरीला पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याने नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहे. विधानसभा निवडणुकीपासून सुरु झालेली पाण्याची टंचाई अद्याप सुरुच असल्याने विरोधी पक्षाचा आमदार असल्याकारणे मुद्दाम महापालिकेचे अधिकारी पाणीपुरवठा करण्यास हात आखडता घेत आहेत का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. निवडणुकीचा निकाल लागून आता तीन महिने झाले तरी पाणी प्रश्न सुटत नसल्याने याप्रकरणी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी सांगितले आहे.




महापालिकेच्या शहरातील विविध जलकेंद्राची देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी सुरु आहेत. यामुळे आधुनमधून पाणी पुरवठा बंद ठेवला जातो. पण त्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे विभागाकडून सांगण्यात येत होते. परंतु अद्यापही अनेकांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याने पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. शहराला पाणी पुरवठा करणारे धरणे शंभर टक्के भरली आहेत. शहराला पुराचा फटका देखिल सहन करावा लागला होता. मुबलक प्रमाणात पाणी असून देखिल शहरातील नागरिकांच्या घशाला कोरड पडली आहे.

वडगाव शेरी, खराडी, चंदननगर, हडपसर, मांजरी, वाघोली आदी भागात पुरेशा प्रमाणात पाण्याचा पुरवठा होत नाही. गेल्या चार ते पाच महिन्यांपासून अनेक भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. अनेक भागातील ड्रेनेज लाईन जीर्ण झाल्या असल्याने घाण पाणी थेट पाण्याच्या पाईल लाईनमध्ये मिसळले जात आहे. त्यामुळे नागरिकांना हिरवट दुषित पाण्याचा पुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे अनेकवेळा तक्रार करुन सुध्दा पाणी प्रश्न सुटत नसल्याने अधिकाऱ्यांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे.

वडगावशेरी भागाला ७१ एमएलडी पाण्याचा पुरवठा केला जातो. तर या भागात एकूण २९ पाण्याच्या टाक्या आहेत. या मतदारसंघाला लष्कर पाणीपुरवठा जलकेंद्रातून तसेच भामा आसखेड धरणातून पाणीपुरवठा केला जातो. त्यानंतर पाण्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. ऐननिवडणुकीच्या काळात पाणी कमी दाबाने येत होते. निवडणुकीनंतर हा प्रश्न मार्गी लागेल असे वाटत होते. परंतु त्यानंतर याभागात पाण्याचे राजकारण केले जात असल्याचा आरोप केला जाऊ लागला आहे. खराडीतील जय तुळजा भवानीनगर, आपले घर सोसायटी, खराडी बॉलीवूड चित्रपट गृहाजवळीत भाग, राजाराम पाटीलनगर आदी भागात पाणी पुरेशा प्रमाणात येत नाही. त्यामुळे पाण्यासाठी पैसे मोजण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

### थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार

- वडगावशेरीत पाण्याच्या संदर्भात राजकारण केले जात आहे, विशेष म्हणजे या राजकारणाला खुद्द अधिकारीच खतपाणी घालत आहेत असा आरोप करुन पठारे म्हणाले; यासंदर्भात बैठक बोलाविण्यात आली आहे. या बैठकीमध्ये खरे सत्य बाहेर येणार आहे, त्यामध्ये दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करावी अशी आमची मागणी आहे. त्याशिवाय यासंदर्भात थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार तसेच एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार करण्यात येणार आहे असा इशाराही पठारे यांनी दिला.



"वडगावशेरीसह खराडीतील पाण्याच्या टाक्या भरत नाहीत. वरून पाणी कमी दाबाने येत आहे. त्यामुळे कमी दाबाने पाणी पुरवठा केला जातो. असे अधिकारी सांगत आहेत. निवडणुक काळात निर्माण केलेला प्रश्न अद्याप तसाच सुरु ठेवला. जुने वॉलमन असल्याने ते जाणूनबुजून असे करतात का अशी शंका येत आहे. त्यामुळे त्यांची बदली करावी. वेळोवेळी पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार केली आहे. मात्र पाण्याचे राजकारण केले जात आहे. याप्रकरणी महापालिका आयुक्तांकडे तक्रार केली जाणार आहे. विरोधी पक्षाचा आमदार या मतदारसंघात असल्यामुळे असे केले जात आहे का प्रश्न आहे."

**— बापूसाहेब पठारे,** आमदार, वडगावशेरी मतदारसंघ

"खराडीतील काही भागात पाणी कमी दाबाने येत असल्याची तक्रारी आल्या आहेत. त्यानुसार तक्रारी सोडविण्याचे काम केले जात आहे. पाणी मुबलक प्रमाणात आहे. त्यामुळे कोठेही टंचाई नाही. पाणीपुरवठा सुरळीत केला जात आहे. वॉलमनचा यामध्ये कोणताही संबंध येत नाही. नागरिकांना अडचणी असतील तर त्यांनी त्या त्या भागाचे नाव लिहून तक्रार करावी."

**— एकनाथ गाडेकर,** कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग

## पुण्यात काय घडतंय...

### 'फॅबेक्स २०२५' या राष्ट्रीय परिषदेचा उद्घाटन सोहळा

- **आयोजक:** फेबर इंफायनाइट कन्सल्टींग
- **उदघाटक:** उदय सामंत (उद्योगमंत्री), चंद्रकांतदादा पाटील (उच्च व तंत्र शिक्षणमंत्री)
- **प्रमुख मार्गदर्शक:** शेखर सरदेसाई (कार्यकारी संचालक, कायनेको ग्रुप), मकरंद अपल्वार (व्यवस्थापकीय संचालक, एम्बी इंडस्ट्रीज लिमिटेड)
- **सहभागी कंपन्या:** अदानी ग्रुप, टाटा ग्रुप, ऍमनीयल फार्मास्युटिकल्स, कायनेको ग्रुप यासह देशातील सुमारे १५० बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी
- **कुठे :** ओ हॉटेल, पुणे
- **कधी :** शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी, सांयकाळी ५ वाजता
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य खुला

### पुणे नगर वाचन मंदिराचा १७७ वा वर्धापनदिन

- **पुरस्कार प्रदान सोहळा**
- **आयोजक:** कै. आर.एल.नगरकर प्रतिष्ठान
- **संयोजक:** मधुमिलिंद मेहेदंळे ( अध्यक्ष, पुणे नगर वाचन मंदिर)
- **पुरस्कारार्थी:** लक्ष्मण थोरात (आदर्श कार्यकर्ता पुरस्कार),आशा भट्ट वेलणकर (अॅड. शरद तपस्वी पुरस्कार हा आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार),डॉ. राहुल देशपांडे (कवी ह. स. गोखले पुरस्कार हा संत साहित्य विषयक ग्रंथ लेखन पुरस्कार)
- **हस्ते:** कौस्तुभ दिवेगावकर (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ)
- **कुठे :** पुणे नगर वाचन मंदिर, १८१ बुधवार पेठ, लक्ष्मी रोड.
- **कधी :** शुक्रवार, दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता

# २६०० जप्त मालमत्तांचा होणार लिलाव

## लिलावासाठी तज्ज्ञांची नियुक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मिळकतकर वसूलीसाठी जंग जंग पछाडूनही थकबाकीदार मिळकतदार अपेक्षित प्रतिसाद देत नाहीत, त्यामुळे थकबाकीचा 'टक्का' दिवसेंदिवस अधिकच वाढत चालला आहे. त्याची आता महापालिका प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून जप्त करण्यात आलेल्या तब्बल २ हजार ६०० मिळकतींचा लिलाव करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे; ही लिलाव प्रक्रिया पारदर्शीपणे पार पडावी यासाठी पाच मूल्यांकन तज्ञांची (व्हॅल्युअर) नेमणूक करण्यात आली आहे.

मिळकतकराची थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिकेने विशेष उपाययोजना अमलात आणल्या आहेत. मोठ्या थकबाकीदारांकडून कर वसूल करण्यासाठी कर निरीक्षकांना विशेष जबाबदारी देण्यात आली आहे; तसेच विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना थेट फिल्डवर राहून कर वसूल करण्याचा आदेश देण्यात आला आहे.



"फक्त खासगी थकबाकीदारच नव्हे, तर केंद्र सरकार, राज्य सरकार आणि पीएमपीएमएलच्या मालमत्तांवरही कोट्यवधींची मिळकतकर थकबाकी आहे. केंद्र सरकारच्या ५९मालमत्तांवर ४१ कोटी ३७ लाखांची थकबाकी आहे. पीएमपीएमएलच्या २५१ मालमत्तांवर ७ कोटी ७० लाखांची थकबाकी आहे. राज्य सरकारच्या ४३८ मालमत्तांवर ९३ कोटी २४ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये पोलीस विभाग, सिंचन विभाग व इतर विभागांचा समावेश आहे."

**— माधव जगताप,** मिळकतकर प्रमुख, पुणे महापालिका

महापालिकेच्या मिळकतकर विभागाच्या माहितीनुसार, मिळकतकरची एकूण थकबाकी जवळपास ११ हजार कोटी रुपये आहे. यामध्ये न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे, दुबार कर लावलेली प्रकरणे; तसेच करासंबंधी वादग्रस्त प्रकरणांचा समावेश आहे. त्यामुळे ही रक्कम मोठी झाली असून, प्रत्येक वर्षी दंडात्मक रक्कम जोडली जात असल्याने हा आकडा वाढत आहे.

**मिळकतकर**

मिळकतकर विभागाला २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी २हजार८७४ कोटी रुपयांचे लक्ष्य देण्यात आले आहे. ४ फेब्रुवारीपर्यंत महापालिकेच्या तिजोरीत २ हजार ५ कोटी रुपये जमा झाले आहेत. मात्र, मिळकतकराची मोठी थकबाकी असल्याने ती वसूल करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. महापालिकेने थकबाकीदारांची यादी तयार केली आहे ज्यामध्ये टॉप-100 थकबाकीदारांचा समावेश आहे. या १०० थकबाकीदारांची एकूण थकबाकी ३३४ कोटी १० लाख रुपये आहे. यामध्ये सिंहगड इन्स्टिट्यूटच्या १७ मालमत्ता समाविष्ट आहेत.

# बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेचा मेळावा

## प्रसाद ओक, डॉ. सौरभ गाडगीळ यांना प्राईड ऑफ बीएमसीसी पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेच्या ४० व्या वार्षिक मेळाव्याच्या निमित्ताने प्राईड ऑफ बीएमसीसी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता महाविद्यालयातील टाटा सभागृहात होणा-या कार्यक्रमात प्रख्यात अभिनेते प्रसाद ओक आणि पीएनजी ज्वेलर्सचे संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांना प्राईड ऑफ बीएमसीसी पुरस्काराने गौरविण्यात येईल, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष अरुण निम्हण यांनी दिली.



संघटनेचे सचिव सुहास पटवर्धन म्हणाले, बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाला ८० वर्षे आणि माजी विद्यार्थी संघटनेला ४० वर्षे पूर्ण होत असल्याने या सोहळ्याला यंदा विशेष महत्व आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी आणि राज्याचे जमाबंदी व भूमी अभिलेख आयुक्त डॉ. सुहास दिवसे हे उपस्थित राहणार आहेत.

मुख्य पुरस्कारांसोबतच अर्थशास्त्र विषयाच्या प्रमुख, सावित्रीबाई पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्राच्या माजी संचालक व सध्या बीएमसीसी मधील डी.जी. कर्वे संशोधन अध्यासन केंद्राच्या प्रमुख डॉ.वसुधा गर्दे आणि माजी उपप्राचार्य वाणिज्य विषयाचे प्रमुख व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे सुप्रतिष्ठित प्राध्यापक डॉ. संजय कंदलगावकर या दोन निवृत्त प्राध्यापकांचा बीएमसीसी गुरुवर्य पुरस्काराने गौरव केला जाणार आहे. सन्मानचिन्ह आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

खजिनदार सुहास धारणे म्हणाले, व्यावसायिक रायकुमार नहार यांना उद्योगभूषण पुरस्कार, निवृत्त व्हाईस एअर मार्शल जयंत इनामदार यांना शहीद मेजर कुणाल गोसावी शौर्य पुरस्कार, पत्रकार प्रसाद पानसे यांना वरुणराज भिडे पुरस्कार, अभिनेता अथर्व कर्वे याला सुहास कुलकर्णी नाट्य पुरस्कार, गायिका अमृता खाडीलकर - नातू यांना बाळासाहेब सरपोतदार पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

प्राचार्य डॉ. राजेश कुचेकर म्हणाले, टेनिसपटू वैष्णवी आडकर, रोलर स्केटींगपटू मृगनयनी शिंदे यांचा शिवराम फळणीकर पुरस्काराने या दोन आजी विद्यार्थीनींचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

# तरुणावर वार करुन जीवघेणा हल्ला


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रस्त्याने जाणाऱ्या तरुणाला अडवून लुटण्याचा प्रयत्न केला असता, तरुणाने विरोध केल्यावर लोखंडी वस्तूने डोक्यात घाव घालून जखमी केल्याचा प्रकार विमाननगर येथे घडला. प्रकाश दीपक थापा (वय ३०, रा. यशोदा नंदन सोसायटी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवारी (५ फेब्रुवारी) दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार विमाननगर परिसरातील यशोदानंदन सोसायटी येथे सुरक्षारक्षक म्हणून नोकरी करतो आणि तेथेच राहायला आहे.

# श्री महालक्ष्मी मंदिराच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्त 'ब्रह्मोत्सव'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट, श्री महालक्ष्मी मंदिर सारसबागच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्त ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ८ ते १० फेब्रुवारी दरम्यान मंदिरात हा उत्सव होणार असून त्यामध्ये धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा पुण्यातील ३०० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, अशी माहिती ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त अमिता राजकुमार अग्रवाल यांनी दिली.



राजस्थान डिडवाना येथील अनंत श्री विभुषित जगतगुरु रामानुचार्य झालरिया पीठाधीपती पूज्य श्री श्री १००८ स्वामीजी घनश्यामाचार्यजी महाराज यांच्या उपस्थितीत विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. सामाजिक उपक्रमांतर्गत पुण्यातील हुजूरपागा मुलींची शाळा, रेणुका स्वरुप हायस्कूल, विद्या विकास विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल, मॉडर्न हायस्कूल, अहिल्यादेवी मुलींची शाळा, विमलाबाई गरवारे हायस्कूल या शाळांमधील ३०० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यांचे शैक्षणिक शुल्क ट्रस्टतर्फे भरण्यात येणार असून शनिवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.३० वाजता मंदिरात होणा-या या कार्यक्रमाला राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित राहणार आहेत.

## Selected

### प्रवेशासाठी प्रलोभनाला बळी पडू नका- शरद गोसावी यांचे आवाहन

**पुणे :** आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन व पारदर्शक प्रक्रिया असून या प्रक्रियेत लॉटरी पध्दतीने सोडत काढून प्रवेश पात्र लाभार्थी व प्रतिक्षाधिन लाभार्थी याची शाळानिहाय यादी घोषित केली जाते.यामध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप केला जात नाही. पालकांनी बालकांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये असे आवाहन शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी केले आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१) (सी) नुसार आरटीई २५ टक्के प्रवेश वंचित व दुर्बल घटकातील मुला-मुलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. पालकांना प्रलोभन देण्याचे गैरप्रकार निदर्शनास आल्यास याबाबत संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी मनपा, नपा, संबंधित विभागाचे विभागीय शिक्षण उपसंचालक तसेच प्राथमिक शिक्षण संचालनालय पुणे (depmh2@gmail.com), आयुक्त (शिक्षण), पुणे (educommoffice@gmail.com) यांचेकडे ई-मेलद्वारे अथवा समक्ष आपली तक्रार पुराव्यासह नोंदविण्यात यावी. असा कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितावर नियमानुसार फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असेही गोसावी यांनी कळविले आहे.

### 'एकांतस्वर' या कवितासंग्रहाला साहित्यसेवा प्रज्ञामंचचा पुरस्कार

**पुणे :** ज्येष्ठ गझलकार,कवी राजेंद्र शहा यांच्या 'एकांतस्वर' या कवितासंग्रहाला साहित्यसेवा प्रज्ञामंचचा उत्कृष्ट काव्यसंग्रह म्हणून 'प्रज्ञा बहूउद्देशीय संस्था पुस्तक पुरस्कार - २०२५' जाहीर झाला आहे.हा पुरस्कार पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात देण्यात येणार आहे.प्रज्ञा बहूउद्देशीय संसंस्थेच्या अध्यक्ष सौ.लीना देगलूरकर यांनी ही माहिती दिली.'एकांतस्वर' हा कवितासंग्रह संवेदना प्रकाशनने प्रकाशित केला आहे.दिवंगत संगीतकार राहुल घोरपडे यांनी याच कवितांवर अल्बम संगीतबद्ध केला.या प्रकाशित अल्बममधील गीत-गझला या ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर,रविंद्र साठे,पं.रघुनंदन पणशीकर,हृषिकेश रानडे आदि गायकांनी गायलेली आहेत.



### जिवंत काडतूस विकत घेणाऱ्या दोघांना अटक

**पुणे :** सराईत गुन्हेगाराकडून पिस्तूल आणि जिवंत काडतूस विकत घेणाऱ्या दोघांना येरवडा पोलिसांनी अटक केली. प्रवीण विकास कसबे (२९, रा. आंबेगाव, कात्रज) आणि प्रतीक दादासाहेब रणवरे (२५, रा. सद्गुरु रेसिडेन्सी, सिंहगड कॉलेजवळ, येवलेवाडी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी आकाश उद्धव कोपनर (रा. गोकुळनगर, कात्रज) या सराईत गुन्हेगारावरही गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलीस कर्मचारी अमोल अरुण गायकवाड यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश कोपनर हा सराईत गुन्हेगार आहे. गावठी पिस्तूल बाळगल्याप्रकरणी गेल्या वर्षी बिबवेवाडी पोलिसांनी त्याला अटक केली होती. तसेच कोपनर याच्यावर लूटमार केल्याचा दौंड पोलीस ठाण्यात तर मारहाण केल्याचा गुन्हा कोंढवा पोलीस ठाण्यात दाखल आहे.

# रमाई महोत्सवात कविता, किस्से आणि हास्याचे फवारे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक आयोजित महामाता रमाई महोत्सवात हास्य मैफलीत सादर करण्यात आलेल्या कविता, किश्यांनी हास्याचे फवारे उडाले.

महामाता रमामाई भीमराव आंबेडकर स्मारक येथे आडकर फौंडेशनच्या सहकार्याने हास्यमैफलीचे आयोजन करण्यात आले होते.

भालचंद्र कोळपकर, अनिल दीक्षित यांनी कवितांचे सादरीकरण केले. महोत्सवाचे मुख्य संयोजक विठ्ठल गायकवाड, अध्यक्ष अॅड. प्रमोद आडकर, कार्याध्यक्ष सचिन ईटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कवी भालचंद्र कोळकर यांनी 'बुलेट प्रेम' कवितेद्वारे कॉलेजमध्ये अभ्यास सोडून प्रेम करायला गेलेल्या युवकाची कशी फजिती होती हे सांगितले. त्यानंतर काही



किस्से सांगून 'हीरोइन' ही कविता सादर केली. या कवितेत एक युवक हिरोईनशी लग्न करण्याचं स्वप्न पाहतो आणि ते कसं भंग पावतो हे या विनोदी रचनेतून सांगितले. 'भांडण' या कवितेतून नवरा बायकोमधील वाद हा कसा संवादात परिवर्तित होतो आणि नवरा बायकोच्या नात्यांमध्ये भांडण कसे आवश्यक आहे हे अतिशय मजेशीररित्या सांगितले. 'लाजरे पोरा' या विडंबन कवितेतून आजकालची मुलं अभ्यास सोडून मोबाईलच्या नादी लागतात व पदरात अपयश पाडून घेतात त्यामुळे त्यांचे कसे हाल होतात याचे मार्मिक टिपण केले. अखेरीस 'बाप झाल्यावर' जबाबदारीची जाणीव करून देणारी कविता सादर केली.

अनिल दीक्षित यांनी नोट बंदीवरील विडंबन काव्याद्वारे मैफलीची सुरुवात केली. त्यानंतर 'अन्याय रोखण्याचा तलवार भीम माझा जखमेवरील फुंकर हळुवार भीम माझा' ही भीमगझल सादर केली. 'लाजू कशाला उगीच कुणाला जयभीम म्हणायला, तुझ्यामुळेच शिकलो भिमा ताठ मानेनं जगायला' या भीम गीताने मैफलीची सांगता केली.

## महिला आयोग आपल्या दारी;वंचित विकास व उदयकाळ फाउंडेशनतर्फे 'अभया' राज्यस्तरीय परिषद

# कौटुंबिक कलहातील 'अभया' ला मिळणार 'अभय...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही वर्षांच्या कालावधीत समाजात पुढारलेपणा आला आहे. मात्र; या काळातही मान, सन्मान व स्वतःच्या हक्कांसाठी झगडावे लागते. महिला सन्मान व संरक्षणासाठी कायदे आहेत. तरीही अत्याचाराच्या घटना थांबत नाहीत, धक्कादायक बाब म्हणजे त्यांना समाजापेक्षाही कुटुंबातूनच या कलहाला सामोरे जावे लागत आहे. ही बाब निश्चितच चिंताजनक आहे, अशी खंत राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केली.

वंचित विकास व उदयकाळ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अभया अभियानांतर्गत आयोजित दोन दिवसीय 'अभया' राज्यस्तरीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी विजया रहाटकर बोलत होत्या. लोहगाव येथील नीहार आनंदनिवासमध्ये आयोजित परिषदेत वंचित विकास संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार मर्लेचा, कार्यवाह व संचालक मीना कुर्लेकर, सुनीता जोगळेकर, मीनाक्षी नवले, देवयानी गोंगले, रंजना चव्हाण, आणि उदयकाळ फाऊंडेशनचे बाळकृष्ण बागुल, मयूर बागुल आदी उपस्थित होते. महाराष्ट्रातील एकल महिलांवर



काम करणाऱ्या विविध जिल्ह्यातील ५० सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले आहेत.

"देशभरात महिला अत्याचाराच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ होत आहे. राज्य व राष्ट्रीय महिला आयोग, कौटुंबिक न्यायालयात लाखो तक्रारी प्रलंबित आहेत. ५०-६० टक्के तक्रारी कौटुंबिक वादाच्या असून, या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने देशभर 'महिला आयोग आपल्या दारी' अभियान हाती घेतले आहे. विभागवार सुनावण्या घेऊन या तक्रारींचे निराकरण केले जात आहे," असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले. दिव्यांगांप्रमाणे 'अभया'लाही सन्मान देण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन रहाटकर यांनी दिले.



"अभया ही सक्षम असते, तिला आधाराची, सकारात्मक मानसिकता देण्याची गरज असते. प्रेम, स्नेह व आपलेपणा तिला या संघर्षात ऊर्जादायी ठरतात. त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्थांची भूमिका ही 'कॅटॅलीस्ट' सारखी आहे. समाजाचा स्वीकार आणि सकारात्मक भावना विकसित करण्यात संस्थांनी पुढाकार घ्यावा. महिला आयोग म्हणून अभयाच्या समग्र विकासासाठी काही शिफारशींवर आमचे काम सुरु आहे."

**— विजया रहाटकर,** अध्यक्षा, राष्ट्रीय महिला आयोग

वंचित विकास व उदयकाळ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अभया अभियानांतर्गत आयोजित दोन दिवसीय 'अभया' राज्यस्तरीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी विजया रहाटकर बोलत होत्या. लोहगाव येथील नीहार आनंदनिवासमध्ये आयोजित परिषदेत वंचित विकास संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार मर्लेचा, कार्यवाह व संचालक मीना कुर्लेकर, सुनीता जोगळेकर, मीनाक्षी नवले, देवयानी गोंगले, रंजना चव्हाण, आणि उदयकाळ फाऊंडेशनचे बाळकृष्ण बागुल, मयूर बागुल आदी उपस्थित होते.

#रा

# अनोख्या 'स्री त्वा' तून मिळाली 'उभारी'!

## अवघड शस्रक्रियेनंतर दिला गोंडस बाळाला जन्म; डॉक्टरांची अफाट मेहनत फळाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ऑटो इम्यून ट्युमरमुळे एका अठ्ठावीस वर्षीय तरुणीला लघवीचा मार्ग गमवावा लागला होता; त्यामुळे तिचे आयुष्यच अंधकारमय झाले होते. मात्र; डॉक्टरांनी अपार मेहनत करुन या तरुणीवर कृत्रिम स्नायु प्रस्थापित करुन अवघड अशी शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. आनंदाची बाब म्हणजे तिचे लग्न होउन ती गरोदर राहिली आणि तिने एका गोंडस बाळाला जन्मही दिला; या अनोख्या 'स्री त्वा' मुळे तिच्या जीवनाला 'उभारी' मिळाली आहे.


अठ्ठावीस वर्षीय तरुणीला नवमूत्रमार्ग, कृत्रिम स्नायू प्रस्थापित करून तिचे जीवन आनंदी व पूर्ववत करण्यात पुण्यातील डॉक्टरांना यश आले आहे. कृत्रिम मूत्रमार्ग बसवल्यानंतर तिची गळणारी लघवी थांबलीच; पण तिचे लग्न होऊन ती गरोदर राहिली व नुकताच तिने एका गोंडस बाळाला जन्म दिला आहे. या तरुणीचे 'स्त्रीत्व' पूर्ण झाल्याने तिच्यासह पती व आईच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू तरळले," अशी माहिती युरोकूल-कुलकर्णी युरो सर्जरी इन्स्टिट्यूटचे संस्थापक व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे युरोलॉजिस्ट डॉ. संजय कुलकर्णी यांनी दिली.

जगातील पहिल्या महिला लॅप्रोस्कोपिक तज्ज्ञ डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी, प्रसूतीरोग तज्ज्ञ व उमरजी हॉस्पिटलचे चिन्मय उमरजी, युरोलॉजिस्ट डॉ. पंकज जोशी, डॉ. अमित होसमनी, डॉ. श्रेयस भद्रनवार, कर्करोगतज्ज्ञ डॉ. उदय चंदनखेडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अभय चौधरी, बाणेर-बालेवाडी मेडिको असोसिएशनचे संस्थापक डॉ. राजेश देशपांडे उपस्थित होते.



"'आर्टिफिशियल युरिनरी स्प्रिंक्टर' शस्त्रक्रियेची माहिती दिली. या शस्त्रक्रियेमुळे अंजलीला नवे आयुष्य मिळाले आहे. तिचे आयुष्य पूर्ववत झाले असून, लग्न व मातृत्व या दोन्हीही सहजपणे झाल्याने दोन वर्षांपूर्वी निराश अवस्थेत असलेल्या अंजली व तिच्या आईंचा आनंद गगनात मावत नाही. प्रसूती झाल्यानंतर व आपल्या नातवाला हातात घेतल्यानंतर तिच्या आईंनी कडाडून मारलेली मिठी आणि ढाळलेले आनंदाश्रू आजवर केलेल्या कामाची पावती आहे."
**— डॉ. पंकज जोशी,** युरोलॉजिस्ट

"माझ्या मुलीला झालेल्या आजाराने खचून गेलो होतो. दिवसातून दहावेळा डायपर बदलावे लागे. तसेच सततच्या लघवीच्या तिला त्वचेचेही आजार होत होते. तिचे लग्न होईल की नाही, अशी शंका होती. मात्र, डॉ. संजय कुलकर्णी यांच्याकडे उपचारासाठी आलो आणि आशेचा किरण दिसला. माझ्या मुलीचे आयुष्य त्यांनी पुन्हा उभारले. तिच्या दोन्ही शस्त्रक्रिया, योग्य गर्भधारणा व प्रसूती करणाऱ्या डॉक्टरांचे पथक आमच्यासाठी देवासमान आहे."
**— मुलीची आई**



"आर्टिफिशियल युरिनरी स्प्रिंक्टर' बसवल्याने प्रसूती जिकिरीची होती. त्यामुळे सुरवातीपासूनच आम्ही विशेष खबरदारी घेतली. सोनोग्राफी व प्रगत मशीनद्वारे बाळाची व आईची तपासणी करून सिझरियन पद्धतीने ही प्रसूती करण्यात आली. प्रसूती करताना स्प्रिंक्टरला धक्का लागणार नाही व तिला त्रास होणार नाही, याची काळजी घेतली. आता बाळाची आई सुखरूप असून, जवळपास तीन किलो वजनाचे बाळ सुदृढ अवस्थेत आहे."
**— डॉ. चिन्मय उमरजी,** प्रसूतीरोग तज्ज्ञ



"मुंबईची ही तरुणी २०२२ मध्ये युरोकूलमध्ये आली. तिची लघवीची जागा आणि योनी मार्ग यादरम्यान गाठ तयार झाली होती. तिचा मूत्रमार्ग व त्यावरील मांस विरघळून गेल्याने लघवीवर नियंत्रण नव्हते. अँटिबायोटिक व इम्युनोथेरपी दिल्याने तिचा लघवी मार्ग निकामी झाला होता. तिला आशेचा किरण दाखवत आम्ही तिच्या दोन शस्त्रक्रिया केल्या. तपासणीअंती तिचा लघवी मार्ग बंद झाल्याचे आढळले. योनीभागातील कातडी काढून त्यापासून मूत्रमार्ग तयार केला. त्यामुळे लघवी मार्गातून तिला लघवी होऊ लागली. परंतु लघवीवर तिचे नियंत्रण नव्हते. सहा महिन्यांनी ऑक्टोबर २०२२ मध्ये पुन्हा दुसरी शस्त्रक्रिया केली आणि लघवी मार्ग व योनीमार्गाच्या मधोमध 'आर्टिफिशियल युरीनरी स्प्रिंक्टर' हे अत्याधुनिक उपकरण बसवले."
**— डॉ. संजय कुलकर्णी,** आंतरराष्ट्रीय ख्यातीचे युरोलॉजिस्ट

"स्तनाच्या कर्करोगाविषयी प्रतिबंधात्मक काळजी घेण्याची गरज आहे; महिलांनी चाळिशीनंतर मॅमोग्राफी करावी. तसेच स्तनांची स्वतःच्या हाताने नियमित तपासणी करावी. गाठ लागली, तर लागलीच डॉक्टरांशी भेटून घ्यावे."
**— डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी,** महिला लॅप्रोस्कोपिक तज्ज्ञ

### कर्करोगाबाबत जनजागृती हवी

- कर्करोगतज्ज्ञ डॉ. उदय चंदनखेडे यांनी कर्करोगाची सद्यस्थिती सांगतानाच त्याचे प्रकार, कारणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय याविषयी सांगितले. कर्करोग हा जगातील मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण बनत असून, कर्करोगाबाबत जनजागृती गरजेची आहे. नऊपैकी एक व्यक्ती कॅन्सरग्रस्त असतो. दरवर्षी १० दशलक्ष लोकांचा कॅन्सरमुळे मृत्यू होतो. बदलत्या जीवनशैलीमुळे कॅन्सरचे प्रमाण वाढले असून, त्याचे योग्यवेळी निदान झाले, तर त्यावर उपचार करणे शक्य आहे. युरोकूल हॉस्पिटलमध्ये सर्व सोयीसुविधांनी युक्त तपासणी व उपचार केले जात आहेत.

# असंघटित कामगारांनाही मिळणार पेन्शन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र सरकारने नागरिकांसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. केंद्र सरकारने असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांसाठी खास योजना राबवली आहे. सरकार असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांसाठी ६० वर्षांनंतर ३००० रुपयांची पेन्शन मिळणार आहे.

ई-श्रम योजनेअंतर्गत असंगठित क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांना विमा कव्हरसोबत महिन्याला पेन्शनदेखील मिळते. यासाठी प्रत्येक कामगाराला युनिक डिजिटल कार्ड दिले जाते. त्यामुळे त्या कामगारांची वेगळी ओळख रजिस्टर होते.

**निवृत्ती वेतन**

संगठित क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीनंतर पेन्शन मिळते. EPFO आणि ESIC अंतर्गत त्यांना ही पेन्शन दिली जाते. परंतु जे लोक EPFOशी जोडले गेलेले नाही. त्यांच्यासाठी ही योजना आहे. या योजनेत नागरिकांना सेवानिवृत्तीनंतर दर महिन्याला ३००० रुपये दिले जातात.या योजनेचा लाभ घेण्यासाठी तुम्ही ऑनलाइन पद्धतीने अर्ज करु शकतात.१६ ते ५९ वयोगटातील उमेदवार या योजनेत अर्ज करु शकतात.

### ई-श्रम कार्ड कसं बनवावे?

- ई-श्रम कार्ड बनवण्यासाठी https://eshram.gov.in/ कार्ड बनवावे लागते.
- होमपेजवर जाऊन रजिस्टर eShram ऑप्शनवर क्लिक करा.
- आधार कार्डशी लिंक मोबाईल नंबर आणि कॅप्चा कोड टाकावा लागेल.
- यानंतर काही प्रश्न विचारले जातील त्याची माहिती द्यावी लागेल.
- तुमचा पत्ता आणि शैक्षणिक माहिती द्यावी लागणार आहे.
- कौशल्याचे नाव, बिझनेस, तुम्ही कोणते काम करता तो ऑप्शन सिलेक्ट करावा लागले.
- self-declaration फॉर्म सिलेक्ट करावा लागेल.
- फॉर्म भरुन सबमिट करायचा आहे. यानंतर तुमचे ई-श्रम कार्ड तयार होणार आहे. तुम्ही हे डाउनलोड करु शकतात.

# बिबवेवाडीत तोडफोड करणाऱ्या आरोपींकडून तरुणाच्या खूनाचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बिबवेवाडीत वाहनांची तोडफोड करणाऱ्या तिघांनी एका तरुणावर कोयत्याने वार करुन त्याचा खून करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. फैजान इक्बाल तासीलदार (वय २४, रा. राजीव गांधीनगर, बिबवेवाडी) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी गणराज सुनील ठाकर (रा. सुवर्णयुग मित्र मंडळाजवळ, बिबवेवाडी) याच्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बिबवेवाडीतील अप्पर इंदिरानगर परिसरात बुधवारी मध्यरात्री २५ ते ३० वाहनांची तोडफोड केली. लाकडी दांडके आणि कोयत्याने वाहनांच्या काचा फोडल्याने या परिसरात घबराट पसरली. याप्रकरणी पोलिसांनी अंडी उर्फ निरंजन देवकर, अभिषेक पांढरे, गणराज सुनील ठाकर यांना अटक केली.

आरोपींनी बुधवारी मध्यरात्री वाहनांची तोडफोड करण्यास सुरुवात केली. त्या वेळी तासीलदार मोटारीत झोपला होता. मोटारीच्या काचेवर कोयता आपटल्याने काच फुटली. काच फुटल्याचा आवाज झाल्याने तासीलदारने मोटारीचा दरवजा उघडून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आरोपी ठाकर आणि साथीदारांनी त्याला शिवीगाळ करुन डोक्यावर कोयत्याने वार केला. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी ठाकर याच्यासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक अशोक येवले तपास करत आहेत.

तीन दिवसांपूर्वी बिबवेवाडीत पूर्ववैमनस्यातून सराईत पवन सुभाष गवळी (वय २८, रा. ओटा परिसर, इंदिरानगर, बिबवेवाडी) याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आला होता. माधव वाघाटे खून प्रकरणात बदला घेण्यासाठी जामीन मिळवून कारागृहातून बाहेर पडलेल्या गवळीवर गोळीबार करण्यात आला होता. ही घटना ताजी असतानाच बुधवारी मध्यरात्री सराइतांनी दहशत माजवून बिबवेवाडीत ७० वाहनांची तोडफोड केल्याने नागरिक दहशतीखाली आहेत.

उपनगरात दहशत माजविण्यासाठी वाहनांची तोडफोड करण्याच्या घटना वाढीस लागल्या आहेत. येरवडा, वारजे, पर्वती भागात तोडफोडीच्या घटना घडल्या होत्या. उपनगरातील वाढती गुन्हेगारी, तसेच वाहन तोडफोडीच्या घटनांमुळे नागरिक दहशतीखाली आहेत. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील गुंड टोळ्यांविरुद्ध कारवाईचे आदेश दिले. वाहन तोडफोडीच्या घटना रोखण्यासाठी कडक कारवाईचे आदेश दिले आहेत.

## लाभार्थ्यांसाठी आता एकच ऑनलाईन पोर्टल

**पुणे :** राज्यातील विविध विभांगातर्गत अनेक सामाजिक महामंडळे कार्यरत आहेत. तसेच अनेक सामाजिक महामंडळे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत. राज्यातील सर्व सामाजिक महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये लाभार्थींना एकच केंद्रीयकृत ऑनलाइन व्यासपीठ, पोर्टल असावे. अशा ऑनलइन केंद्रीकृत व्यासपीठ, पोर्टलचे स्वरुप निश्चित करण्यासंदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. या बैठकीत विषयासंदर्भात उच्चस्तरीय समिती गठीत करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील सर्व सामाजिक महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# ऑनलाइन समुपदेशनासाठी समुपदेशकांची नियुक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बोर्डातर्फे इयत्ता बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ व दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ या कालावधीत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या विभागीय मंडळांमार्फत आयोजित करण्यात करण्यात आलेल्या आहेत. इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षेच्या काळात अनेक विद्यार्थी नकारात्मक विचाराने किंवा परीक्षेच्या भीतीने दडपणाखाली असतात. या विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी ऑनलाइन समुपदेशन करण्यासाठी राज्य मंडळस्तरावरुन समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भ्रमणध्वनी क्रमांक दिलेले समुपदेशक लेखी परीक्षेपूर्वी, परीक्षा कालावधीत सकाळी ८ ते रात्री ८ या कालावधीत विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीद्वारे निशुल्क आवश्यक ते समुपदेशन करतील. मात्र विद्यार्थी, पालक यांनी परीक्षा केंद्र, बैठक व्यवस्था व प्रश्नपत्रिकेसंबधित प्रश्न याबाबत समुपदेशकांना विचारणा करू नये, असे राज्य मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी सावरकर यांनी स्पष्ट केले आहे.

### समुपदेशकांचे भ्रमणध्वनी क्रमांक

- ९०११३०२९९७,
- ८२६३८७६८९६,
- ८७६७७५३०६९,
- ७३८७४००९७०,
- ९९६०६४४४११,
- ७२०८७७५११५,
- ८१६९२०२२१४,
- ९८३४०८४५९३,
- ८३२९२३००२२,
- ९५५२९८२११५

# रंगावलीतून साकारले अर्धनारी नटेश्वराचे अनोखे सौंदर्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रंगावलीतून दाखविलेली शिवाची उत्पत्ती... शिवाला झालेला सती वियोग... भव्य रंगावलीतून साकारलेला शिव-पार्वती विवाह सोहळा... सप्तरंगातून दर्शविलेले अर्धनारी नटेश्वराचे सौंदर्य... वीरभद्रेश्वर आणि हनुमंताची टू इन वन रांगोळी... आणि पाण्याच्या मधोमध कार्तिक स्वामींचे बालस्वरूपातील मोहक रुप पाहताना पुणेकर भारावून गेले. तसेच रंगावलीच्या माध्यमातून बारा ज्योर्तिलिंगांचे दर्शनही नागरिकांना घडले.

श्रीरंग कलादर्पण फाऊंडेशन तर्फे 'हर हर महादेव' या रंगावली प्रदर्शनाचे आयोजन बालगंधर्व कलादालनात करण्यात आले आहे. प्रदर्शनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ अध्यात्मिक गुरु व प्रवचनकार स्थितप्रज्ञानंद सरस्वती माताजी आणि शिल्पकार प्रमोद कांबळे यांच्या हस्ते झाले. यावेळी फाउंडेशनचे प्रा. अक्षय शहापूरकर, अजित पवार, जगदीश चव्हाण, प्रतीक अथणे, महादेव गोपाळे, श्रीहरी पवळे आदी उपस्थित होते. प्रा. अक्षय शहापूरकर आणि त्यांचे १०० विद्यार्थी यांनी तब्बल ३० ते ३५ तासांत महादेवांच्या लीला रांगोळीच्या माध्यमातून साकारल्या असून रांगोळीतील अनेक संशोधने प्रदर्शनात पहायला मिळत आहेत. यावेळी स्थितप्रज्ञानंद सरस्वती माताजी यांनी उपस्थितांना आशीर्वचन दिले.

प्रा. अक्षय शहापूरकर म्हणाले, प्रदर्शनात ३० रांगोळ्या असून रंगावली चे विविध प्रकार देखील आपल्याला प्रदर्शनात पाहायला मिळतील.

## 'हर हर महादेव'

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



पुणे

# पीएमआरडीए'च्या सेवा सुविधा ऑनलाइन

**पुणे :** नागरिकांना सुलभ व कालमर्यादित सेवा मिळाव्यात, यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (पीएमआरडीए) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार दहा सेवा दि. १ फेब्रुवारीपासून प्रारंभ करण्यात आल्या आहे.यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे. नागरिकांची शासकीय कामे घरबसल्या ऑनलाइन व्हावी, यासाठी "पीएमआरडीए'च्या माध्यमातून सेवा सुविधा ऑनलाइन करण्यात येत आहे.

शासनाच्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान आणि विहित कालमर्यादित देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंमलात आला आहे. या अंतर्गत नागरिकांना घरबसल्या ऑनलाइन शासकीय सेवा देण्याच्या दृष्टीने शासनाचे निर्देश आहे. त्या अनुषंगाने १० सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. सेवा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या https://www.pmrda.gov.in या संकेत स्थळावर नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. .

बांधकाम परवानगी, जोता मोजणी प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, झोन दाखला, भाग नकाशा, वाटप भूखंडाचे गृहयोजनेतील सदनिकांचे हस्तांतरण करणे, वाटप भूखंडावर गृह योजनेतील सदनिकांवर वारस नोंद करणे, वाटप भूखंडावर गृहयोजना सदनिकांवर कर्जासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे, प्राथमिक अग्निशमन ना हरकत दाखला, अंतिम अग्निशमन ना हरकत दाखला आदी कागदपत्रे द्यावी लागणार आहेत.

# शनिवार पेठेत घरफोडी; सात लाखांचा ऐवज लंपास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शनिवार पेठेतील मंदार लॉज परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये सायंकाळी चोरट्याने बंद सदनिकेचा कडीकोयंडा तोडून सुमारे सात लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. तर, अन्य एका सदनिकेचा कडी कोयंडा तोडण्याचा प्रयत्न केला.

**क्राईम**

या प्रकरणी सरस्वती अपार्टमेंट येथे राहणाऱ्या ५६ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मंगळवारी (४ फेब्रुवारी) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला नोकरी करतात. त्या मंदार लॉजच्या मागील सरस्वती अपार्टमेंटमध्ये राहतात. ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी त्यांची सदनिका कुलूप लावून बंद होती. त्यावेळी अज्ञात चोरट्याने सदनिकेच्या बाहेरील लोंखडी ग्रीलच्या दरवाजाची कडी कोयंडा आणि कुलूप तोडून, आतील लाकडी दरवाजा उघडला. त्यानंतर घरात प्रवेश करून सहा लाख ९७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोकड चोरून नेली. दरम्यान, चोरट्याने याच अपार्टमेंटमधील अन्य एका बंद सदनिकेच्या दरवाजाचा कडी कोयंडा चोरी करण्याच्या उद्देशाने तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात यश आले नाही.

# नाशिक रेल्वेच्या जुन्या मार्गाला केंद्राचा 'ग्रीन सिग्नल?

**विषय**

### 'जीएमआरटी' आणि रेल्वेच्या तंत्रज्ञांची संयुक्त बैठक होणार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा मूळ आरेखनानुसारच व्हावी, यासाठी जीएमआरटी आणि रेल्वेच्या तंत्रज्ञांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन केली. यावेळी त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत हा रेल्वे प्रकल्प मध्य रेल्वे करणार हे स्पष्ट करीत संयुक्त बैठक आयोजित करण्याचे मान्य केले.

गेल्या काही वर्षांपासून पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने तयार केलेला डीपीआर केंद्रीय कॅबिनेटच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत होता. मात्र अंतिम क्षणी खोडदच्या जीएमआरटी प्रकल्पाने आक्षेप घेतल्याने रेल्वेमंत्री वैष्णव यांनी या प्रकल्पाचा डीपीआर रद्द करुन नव्याने आखणी करण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनास दिले होते. त्यानुसार या सेमी हायस्पीड रेल्वेच्या मार्गात बदल करुन अहिल्या नगर, शिर्डी मार्गे नाशिक असा नवा मार्ग प्रस्तावित करण्यात येत असल्याचे रेल्वे प्रशासनाने जाहीर केले होते. मात्र या नवीन मार्गाला खासदार डॉ. कोल्हे यांनी विरोध दर्शवत जीएमआरटीच्या तंत्रज्ञांनी तोडगा काढावा अन्यथा जीएमआरटी प्रकल्प स्थलांतरित करण्याची मागणी केली होती.

पुणे ते अहिल्या नगर, शिर्डी मार्गे नाशिक या रेल्वे मार्गास खेड, आंबेगाव, जुन्नरसह नगर जिल्ह्यातील संगमनेरसह अनेक गावांतील शेतकरी व लोकप्रतिनिधींचा विरोध असून मूळ मार्ग बदलल्यास आंदोलन करण्याची भूमिका घेतली आहे. मूळ रेल्वेमार्ग हा या भागातील जनतेची भाग्यरेषा बदलणारा असून आजवर विकासापासून वंचित राहिलेल्या या भागाचा विकास या रेल्वेमार्गामुळे होणार आहे, ही भूमिका खासदार डॉ. कोल्हे यांनी सातत्याने मांडली आहे.

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू असून खासदार डॉ. कोल्हे यांनी आज रेल्वेमंत्री वैष्णव यांची भेट घेऊन पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा मूळ मार्ग बदलू नये अशी मागणी केली. त्याचबरोबर महारेल, रेल्वे आणि जीएमआरटी तंत्रज्ञांची संयुक्त बैठक आयोजित करुन तोडगा काढण्याची मागणी केली. यावेळी वैष्णव यांनी हा प्रकल्प मध्य रेल्वे करणार असल्याचे स्पष्ट करतानाच प्रकल्पात कोणतीही राजकीय अडचण येणार नाही असे आश्वासन दिले. तसेच मध्य रेल्वे आणि जीएमआरटीच्या तंत्रज्ञांची संयुक्त बैठक आयोजित करण्याचे मान्य केले.



"या भागातील विकासाचा हक्क अबाधित राहावा आणि शेतकऱ्यांना आर्थिक विकासाची संधी मिळावी, ही सर्वांची भावना आहे. त्यामुळे पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प मूळ आरेखनानुसारच व्हावा आणि लवकर कार्यान्वित व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पाठपुरावा करावा असे माझे आवाहन आहे"
**— डॉ. अमोल कोल्हे** खासदार, शिरुर लोकसभा मतदारसंघ

## At a Glance

### डॉ. जानकी अम्मल व्याख्यानमालेचे आयोजन

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा.टि.एस. महाबळे संग्रहालय येथे डॉ. जानकी अम्मल व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. वनस्पतीशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शारदा शक्ती, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक ८ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी १०:३० दुपारी १.०० या वेळेत दोन तज्ञांची व्याख्याने सदर व्याख्यानमालेत होणार आहे.


डॉ. ई. जानकी अम्मल या 'भारतीय वनस्पती सर्वेक्षण संस्था' (बोटॅनिकल सर्वे ऑफ इंडिया) या संस्थेच्या प्रथम महिला निदेशक होत्या. ७ फेब्रुवारी २०२५ हा त्यांचा ४२ वा स्मृतिदिन आहे. त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी 'डॉ. जानकी अम्मल यांच्या जीवनकार्याचे स्मरण' या विषयावर सर्वांसाठी उपयुक्त ठरेल अशी एक व्याख्यानमाला विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाने आयोजित केली आहे. या वनस्पती जतन व शेतकरी हक्कांशी निगडित, दिल्लीस्थित केंद्र सरकारी संस्थेचे अध्यक्ष व प्रसिद्ध वैज्ञानिक असलेले डॉ. त्रिलोचन मोहपात्रा 'भारतीय कृषी जैवविविधता व तिची उपयुक्तता' या विषयावर या व्याख्यानमालेत बोलणार आहेत तर BSI चे सध्याचे महानिदेशक डॉ. ए. ए. माओ 'वनस्पतीशास्त्रातील डॉ. जानकी अम्मल यांचे योगदान' या विषयावर बोलणार आहेत.

प्रा. डॉ. ए. बी. नदाफ व समन्वयक डॉ. अंजली कुलकर्णी तसेच डॉ. शेखर मांडे (विज्ञानभारती, राष्ट्रीय अध्यक्ष) व डॉ. लीना बावडेकर (शक्ती, राष्ट्रीय सचिव ) यांचा आयोजनात सहभाग आहे.

# हवाई वाहतूकीची वेगवान 'झेप'...!

## भारताची नेत्रदिपक 'भरारी'; २०४७ पर्यंत जगाच्या क्षितिजावर आपलाच दबदबा



भारतीय हवाई क्षेत्रात महिला पायलटचे प्रमाण २५ टक्के किमान करण्यासाठी आम्ही लक्ष्य ठेवले आहे. भारताकडे ड्रोन निर्मितीची चांगले कौशल्य आणि क्षमता असून सध्या ३० हजार ड्रोन आहेत. २०४७ पर्यंत ही संख्या तीस लाखांपर्यंत जाईल.जगात सर्वाधिक वेगाने हवाई वाहतूक क्षेत्र भारतामध्ये विकसित होत असून, दरवर्षी १० ते १२ टक्के विमान प्रवासी वाढत आहेत."

**— राममोहन नायडू,** केंद्रिय हवाई वाहतूक मंत्री

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** "हवाई क्षेत्रात भारताने नेत्रदीपक भरारी घेतली असून, २०४७ पर्यंत भारत जगाच्या क्षितिजावर आपला दबदबा निर्माण करेल. पूर्ण भारतीय बनावटीचे प्रादेशिक हवाई उड्डाण वाहतूक सुरू करण्यासाठी हवाई मंत्रालय प्रयत्नशील आहे. सध्या विमानाचे ३० ते ३५ टक्के समभाग देशांतर्गत निर्माण होत आहेत. हे प्रमाण वाढवण्यासाठी आगामी पाच वर्षाचा रोडमॅप तयार करण्यात आला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने हवाई वाहतूक सुरळीत करण्यासह विविध उपाययोजना राबविण्यासाठी संशोधनावर भर दिला जाईल," असे मत केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी व्यक्त केले.

दी एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियातर्फे दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद आणि ७३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राममोहन नायडू बोलत होते. पाषाण रस्त्यावरील डॉ. एपीजे अब्दुल कलाम ऑडिटोरियममध्ये 'विकसित भारतासाठी एरोस्पेस क्षेत्रातील आव्हाने' या संकल्पनेवर ही राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. प्रसंगी संयुक्त अरब अमिराती येथील अबुधाबी स्कुल ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन डॉ. तय्यब कमाली, 'इसरो'चे माजी चेअरमन डॉ. एस. सोमनाथ, 'डीआरडीओ'चे माजी चेअरमन व सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सतीश रेड्डी, सचिव जेष्ठ शास्त्रज्ञ जेया संथी, महासंचालक प्रा. प्रतीक किशोर, 'डीआरडीओ' 'एचईएमआरएल'चे संचालक डॉ. ए. पी. दास, 'एआरडीई'चे संचालक अकांती राजू, सहयोगी संचालक एम. व्ही. रमेश कुमार आदी उपस्थित होते. यावेळी सोसायटीच्या स्मरणिकेचे प्रकाशन केंद्रीय मंत्री नायडू यांच्या हस्ते करण्यात आले.

राममोहन नायडू म्हणाले, "एअरोस्पेस क्षेत्रात घडत असलेल्या बदलांचा फायदा सिव्हिल एव्हीएशन क्षेत्रास होत आहे. एरोनोटीकल सोसायटीचे ५० हजार शास्त्रज्ञ असून ते विविध विभागात काम करतात. देशाला नवीन आकार देण्याचे काम एरोनोटीकल सोसायटी देत आहे. या क्षेत्रात प्रत्येक आव्हान ही आपली संधी मानून त्यादृष्टीने काम केले पाहिजे. विमानतळांची संख्या मागील दहा वर्षात दुप्पट झाली आहे. पुढील पाच वर्षांत ५० नवीन विमानतळ, तर २०४७ पर्यंत २०० विमानतळ विकसित करण्यात येतील. नवी मुंबई, नोयडा विमानतळ काम अंतिम टप्प्यात आले आहे.

डॉ. तय्यब कमाली यांनी सांगितले, "एरोस्पेससह विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानामुळे बदल घडत आहेत. त्यातील समस्याचा दबाव सर्वांवर आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर विविध क्षेत्रात होऊ लागला आहे. रुग्णांचे आजार निदान करणे आणि शस्त्रक्रिया यात एआयमुळे अचूकता आली आहे. वॉशिंग्टनमध्ये प्रवासी विमान आणि हेलिकॉप्टर धडकल्याची घटना नुकतीच घडली; पण त्याजागी एआय वापर झाला असता, तर घटना टळू शकली असती."

डॉ. एस. सोमनाथ म्हणाले, "इसरोमध्ये काम करताना एरोनोटीकल सोसायटीकडे आम्ही आकर्षित झालो. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वात आम्हाला काम करण्याची संधी मिळाली. देशभरातील एरोस्पेसमध्ये काम करणारे सर्व तज्ज्ञ एकत्रित आले आहेत. एरोस्पेस क्षेत्र हे बदलत्या काळात 'आत्मनिर्भर भारत' विकसित करण्यासाठी पूरक आहे. युवकांनी या क्षेत्रात आकर्षित होऊन काम करावे. कौशल्य आधारित मनुष्यबळ त्यासाठी निर्माण केले गेले पाहिजे. स्टार्टअप, संशोधनावर भर दिला पाहिजे."

डॉ. सतीश रेड्डी म्हणाले, "स्वातंत्र्यानंतर १९४८ मध्ये एरोनोटीकल सोसायटीची स्थापना झाली. आज देशभरात २२ शाखा त्याच्या झाल्या असून एरोनोटीकल संदर्भात विविध काम करत आहे. 'विकसित भारतमध्ये एरोस्पेस क्षेत्रातील आव्हाने' याबाबत चर्चा या परिषदेत करण्यात येत आहे. विकसित भारत अंतर्गत प्रादेशिक ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट बनवण्याचे आमचे स्वप्न आहे. हे एअरक्राफ्ट देशाला इतर ठिकाणी निर्यात देखील करता येईल. एरोस्पेस मध्ये देशाला अग्रेसर करण्यासाठी सर्वांचे एकत्रित प्रयत्न गरजेचे आहे."

या परिषदेत हवाई क्षेत्राशी संबंधित नागरी हवाई उड्डाण, स्पेस व्हेइकल्स, सॅटेलाईट्स, एरो इंजिन्स, मिसाईल सिस्टिम्स, लढाऊ विमाने व एरोस्पेस, ड्रोन्स, हेलिकॉप्टर्स अशा विविध विषयांवर चर्चासत्रात तज्ज्ञ, शास्त्रज्ञ यांनी मार्गदर्शन केले. स्टार्टअप आणि उद्योग यांच्यातील संवाद सत्राचे, विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाचे प्रदर्शन, तसेच विविध स्मृती व्याख्याने या परिषदेत आयोजित करण्यात आली आहेत.

# जलशुध्दीकरणासाठी राबविणार 'अमृत' योजना



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजारामुळे खडबडून जागे झालेल्या महापालिका प्रशासनाने सिंहगड रस्ता भागात शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी अमृत योजनेचा आधार घेतला आहे. थेट खडकवासला धरणातूनच पाणी उचलून या भागाला पाणी पुरवठा केला जाणार आहे.

जीबीएस हा आजार दुषित पाण्यामुळेच होत असल्याचा अहवाल राष्ट्रीय विषाणू संस्थेने (एनआयव्ही) दिला आहे. एनआयव्हीच्या अहवालामुळे आता महापालिका प्रशासनाने सिंहगड रस्ता भागातील जीबीएस बाधित ग्रस्त भागात पाणी पुरवठा करण्याविषयी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. स्थानिक आमदार भीमराव तापकीर यांनी यासंदर्भात काही सुचना केल्या आहेत. खडकवासला धरणातून थेट पाणी उचलून या भागात पुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी या भागात टाकी उभी करण्यासाठी तीन जागांची पाहणी केली आहे. त्याबाबत आमदार तापकीर यांनी सुचना केल्या आहेत. सध्या या भागाला वडगांव जलशुद्धीकरण केंद्रातून पाणी पुरवठा होत आहे. तो पुरेसा नाही, यामुळे स्वतंत्र टाकी उभारण्याचा विचार महापालिका प्रशासन करीत आहे. अमृत योजनेत २२ ठिकाणी पाणी पुरवठा योजना राबविल्या जाणार आहेत. या भागाचा यात समावेश केला जाईल असे, महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी सांगितले.

### अठरा हजार बाटल्यांचे वाटप

बाधित क्षेत्रात शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी काही उपाययोजना केल्या जात आहे. यामध्ये १८ हजार क्लोरीन बॉटल घरोघरी वाटप केल्या जात आहे. काही सोसायटींच्या कार्यालयात त्या दिल्या जात आहे. महापालिकेकडे सुमारे तीस हजार बाटल्या आल्या आहेत. दहा लिटर पाण्यात सहा ते सात इतके थेंब टाकण्यात यावेत असे आवाहन केले जात आहे.

### पाण्याचे नमूने घेण्यासाठी हवा विशिष्ठ कंटेनर

- एनआयव्हीने केलेल्या सुचनानुसार महापालिकेला पाण्याचे नमूने घ्यावे लागणार आहेत. त्यासाठी विशिष्ठ कंटेनरची पाणी पुरवठा विभागाने मागणी केली असून, तो मिळण्यास दहा दिवस कालावधी लागणार आहे. टँकर विहिरी तपासणी सुरू असून पुढील काळात तपासणी सुरू राहील. 3ppm प्रमाण नुसार पाणी वाटप सुरू आहे. आत्तापर्यंत १६९ सँपल तपासणी केली.

## आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये

# 'इनर्व्ह ९.०' राष्ट्रीय हाकेथॉनचे आयोजन

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एआयटी) पुणे येथे 'इनर्व्ह ९.०' या भारतातील सर्वात मोठ्या विद्यार्थी-प्रेरित राष्ट्रीय हाकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ७ व ८ फेब्रुवारी २०२५ या दोन दिवशी 'एआयटी'च्या ओपन सोर्स सॉफ्टवेअर क्लबतर्फे ही हाकेथॉन आयोजिली असून, यामध्ये युवा तंत्रज्ञ नावीन्य, सहयोग आणि प्रत्यक्ष समस्यांवर उपाय शोधण्यासाठी एकत्र येणार आहेत.




या हाकेथॉनला जोश सॉफ्टवेअर, उडचलो, क्लाउडफ्लेअर, अकॉप्स, सहाना सिस्टिम्स यांसारख्या उद्योग क्षेत्रातील प्रमुख कंपन्यांचे सहकार्य मिळाले असून, यामुळे उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होत आहे. वास्तविक समस्यावर आधारित स्पर्धकांनी नाविन्यपूर्ण दृष्टिकोनातून उपाय शोधायचे आहेत.

भारतभरातील ९,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी २,५०० पेक्षा अधिक संघांद्वारे या भव्य स्पर्धेसाठी नोंदणी केली होती. प्राथमिक फेरींमधून ३०-३५ संघ निवडले असून, ते ७ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या ग्रँड फिनालेमध्ये सहभागी होतील. स्पर्धेदरम्यान तंत्रज्ञान तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना नव्या कल्पनांचा विस्तार करण्यास ते उपयुक्त ठरेल. कठोर मुल्यमापन प्रक्रियेद्वारे सर्वोत्तम संघ निवडले जातील. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी बक्षीस वितरण समारंभ होईल. 'एआयटी'चे चेअरमन प्रमुख अतिथी असतील.

'एआयटी'चे संचालक ब्रिगेडियर अभय भट, सहसंचालक कर्नल एम. के. प्रसाद व प्राचार्य डॉ. बी. पी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली क्लबच्या फॅकल्टी-इन्चार्ज प्रा. वैशाली इंगळे व विद्यार्थ्यांची टीम हाकेथॉनच्या आयोजनात परिश्रम घेत आहे.

### रिक्षा- डंपरच्या धडकेत एक ठार

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** रिक्षा आणि डंपरची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात रिक्षातील एक प्रवाशी ठार झाला असून, दुसरा गंभीर जखमी झाला आहे. कात्रज जुन्या बोगद्यातून पुढे मांगडेवाडी परिसरात बुधवारी (५ फेब्रुवारी) दुपारी दीडच्या सुमारास हा अपघात घडला. या अपघातामध्ये अर्जुन राय यांचा मृत्यू झाला असून विजयकुमार यादव गंभीर जखमी झाला आहे. सरोजकुमार सदाय (वय ३८ रा. वेळू ता. भोर जि. पुणे) यांनी तक्रार केली आहे. त्यानुसार रिक्षा आणि डंपर चालकांवर गुन्हा दाखल केला आहे. डंपर चालकाने बेदरकारपणाने डंपर चालवला. तर, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी रिक्षामध्ये बसवून रिक्षाचालकाने भरधाव वेगाने रिक्षा चालविली.

# 'सूर्यदत्त जीवनगौरव पुरस्कार' जाहीर; आज वितरण

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त देण्यात येणारे 'सूर्यदत्त जीवनगौरव पुरस्कार' व सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' घोषित करण्यात आले आहेत. परमवीरचक्र विजेते सुभेदार मेजर संजय कुमार, ज्येष्ठ मूर्तीशास्त्र अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर, प्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगावकर, अवकाश शास्त्रज्ञ प्रा. डॉ. नरेंद्र भंडारी, सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक सीए डॉ. अशोककुमार पगारिया, नीलकंठ ज्वेलर्सला घरोघरी पोहचविणारे दिलबाग सिंग बीर, वैद्यकीय सामाजिक सेवा प्रदान करणारे डॉ. सदानंद राऊत, उद्योजक मयूर वोरा, मयूर शाह यांना 'सूर्यदत्त जीवनगौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती 'सूर्यदत्त'चे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी दिली.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "यंदाचा 'सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' पर्यावरण अभ्यासक पद्मश्री चैत्राम पवार, ज्येष्ठ अभिनेत्री जया प्रदा व स्मिता जयकर, क्रस्ना डाइग्नोस्टिकचे राजेंद्र मुथा, जागतिक व्यापार तज्ज्ञ सागर चोरडिया, इस्त्राईलचे भारतातील कॉऊंसेल जनरल कोब्बी शोषणी, ॲड. शेखर जगताप, सहकार तज्ज्ञ डॉ. शिवाजीराव डोळे, वैद्यकीय सामाजिक सेवा प्रदान करणारे डॉ. राजेश पारसनीस, प्रेरक वक्ते राहुल कपूर जैन, उद्योजक इंद्रनील चितळे, सामाजिक कार्यकर्ते किशोर खाबिया, कृषी उद्योजक सुनील वाघमोडे यांना, तर 'सूर्यदत्त नॅशनल यंग अचिव्हर अवॉर्ड' स्टार्टअप आणि उद्योजकतेसाठी जैनम व जीविका जैन यांना देण्यात येणार आहे, असेही प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी नमूद केले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया पुढे म्हणाले, "येत्या शुक्रवारी (दि. ७ फेब्रुवारी २०२५) सायंकाळी ५.३० वाजता बंतारा भवन, मुंबई-पुणे महामार्ग, बाणेर, पुणे येथे या पुरस्कारांचे सन्मानपूर्वक वितरण करण्यात येणार आहे.

# कोलवडी-साष्टे गावच्या स्वच्छतेसाठी कचरा गाडीची भेट



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**वाघोली :** कोलवडी-साष्टे(ता. हवेली) ग्रामपंचायतीच्या हद्दीत होत असलेल्या शहरीकरणामुळे नागरिकांच्या कचरा व्यवस्थापनाची समस्या गंभीर होत आहे.या समस्येचे गांभीर्य ओळखून कोलवडी-साष्टे ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच विनायक गायकवाड यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने पाठपुरावा करून मागणी केल्यानंतर आदर पूनावाला क्लीन सिटी संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत या ग्रामपंचायतीसाठी कचरा गोळा करणारी गाडी उपलब्ध करून दिली आहे.

सरपंच विनायक गायकवाड सह ग्रामपंचायत यांच्याकडे आदर पुनावाला क्लीन सिटीचे सी.ओ.मल्हार करवंदे,पवन बडगुजर,रमेश हांगे,मंगेश औताडे यांनी ही कचरा गाडी सुपूर्त केली.

नागरिकांच्या घरगुती व व्यावसायिक कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायतीकडे साधनांची कमतरता होती.आदर पूनावाला क्लीन सिटीचे सीईओ मल्हार यांच्या प्रयत्नांमुळे ही गाडी उपलब्ध झाली आहे.कचरा गाडीच्या उपलब्धतेमुळे गावातील रस्ते व चौकांमध्ये कचरा साठणार नाही.

# एमआयटी डब्ल्यूपीयूच्या 'कॉसमॉस क्लब' चा प्रथम वर्धापन दिन साजरा

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या विश्वरूप दर्शन आर्यभट्ट वेधशाळेच्या कॉसमॉस ॲस्ट्रॉनॉमी क्लबच्या वतीने नुकतेचे सहा अब्ज प्रकाशवर्ष दूर असलेल्या 'पिल्लर्स ऑफ क्रिएशन, इगल नेबुला' (गरूड तेजोमय निर्मितीचे स्तंभ) चा फोटो काढले. आज या फोटोची एक प्रतिमा एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. विश्वनाथ दा. कराड यांच्या हस्ते तत्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर माऊलीच्या मूर्तीस अर्पण केला. 'कॉसमॉस क्लब' ह्या विद्यार्थी-शिक्षक क्लबचा आज प्रथम वर्धापन दिन साजरा करण्यात आला.




यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस, प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, प्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ. दीपक रानडे आणि गिरीश दाते उपस्थित होत.

या प्रसंगी विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले," अखिल ब्रह्मांड हे ईश्वराचे प्रतिरूप आहे. हे तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वरांनी प्रतिपादलं होतं. आपल्या असामान्य बुद्धिमत्तेने आणि योगसामर्थ्याने विश्वाचे गुह्यज्ञान उलगडून सांगणाऱ्या ज्ञानेश्वर माऊलींना ईगल नेब्यूलाचे छायाचित्र सादर करून कॉसमॉस क्लबच्या विद्यार्थ्यांनी अतिशय औचित्यपूर्ण कार्य केले आहे."

या वेळी विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ फिजिक्सचे विभाग एचओडी प्रसाद जोगळेकर, विभाग प्रमुख प्रा. अनघा कर्णे आणि विद्यार्थी टीमधील विद्यार्थी प्रतिनिधी ओजस धुमाळ, रोहित देशमुख, नमन अगरवाल, श्रेष्ठ गुप्ता, मल्हार झाडकर, अस्मित राय, पायल मोदी, वरूण नायर, अर्पणा सुब्रमण्यम, इमॅन्युअल आनंदन उपरणं, सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर खगोल निरीक्षणात रस असणाऱ्या पुणेकर नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने' विश्वरूप दर्शन आर्यभट वेधशाळे'ला भेट द्यावी असे आवाहनही प्रा. कराड यांनी केले.

### "बापूज सर्व्हिसेस"चे बापू पोतदार यांचे निधन

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**पुणे :** शंकर केशव तथा बापू पोतदार (वय ८१) यांचे आज, गुरुवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी व मुले, सुना असा परिवार आहे. "बापूज सर्व्हिसेस" या नावाने पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्याच्या व्यवसायाची त्यांनी ४० वर्षांपूर्वी पुण्यात सुरुवात केली. या स्वच्छ अभियान उपक्रमांत त्यांनी अनेक नामवंत संस्थांची कामे केली आहेत. सुमारे ५ हजार पेक्षा अधिक हौसिंग सोसायट्यांना त्यांनी सेवा दिली आहे. राष्ट्रीय सिख संगत, नगर मित्र मंडळ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा सर्व सामाजिक संस्थांमध्ये ते अखेरपर्यंत सक्रीय होते. जनसेवा सहकारी बँकेचे ते माजी संचालक होते.

# महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिन

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** नागरिकांना शासनाच्या विविध योजना उपलब्ध करून देण्यासाठी तसेच त्यांच्या स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिवस आयोजित करण्यात यावा, असे परिपत्रक जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी जारी केले आहे.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरिता मुख्यमंत्री यांनी सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. त्याअंतर्गत राज्याच्या प्रशासनात १०० दिवसात प्राधान्याने करावयाच्या बाबींबाबत सविस्तर सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने हे परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

क्षेत्रीय कार्यालयांमध्ये नागरिकांचे प्रश्न विहित मुदतीत व कायदेशीर पद्धतीने सुटले नाहीत तर नागरिक जिल्हास्तरीय कार्यालयाकडे दाद मागतात. प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी नागरीक जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये तसेच इतर जिल्हास्तरीय कार्यालयांमध्ये वारंवार हेलपाटे मारतात व तक्रारींचे प्रमाण त्यामुळे वाढीस लागते ही बाब प्रकर्षाने निदर्शनास आलेली आहे.

क्षेत्रीय कार्यालयांमध्ये नागरिकांचे प्रश्न विहित मुदतीत सुटले तर नागरीकांचे जिल्हास्तरावर येण्याचे प्रमाण घटून त्यांच्या दैनंदिन अडचणी कमी होण्यास मदत होते. यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर होते.

# "गौरीशंकर"मधून उलगडणार प्रतिशोधाची अनोखी कथा

## नवा चित्रपट

**'गौरीशंकर'या चित्रपटातली कथा आहे गौरी आणि शंकर यांच्या प्रेमाची... दुर्दैवानं त्यांच्या प्रेमात एक संकट निर्माण होते. त्याच्यावर आलेल्या संकटाचा प्रतिशोध घेण्याचा प्रयत्न या आशयसूत्रावर'गौरीशंकर' हा चित्रपट बेतला आहे. नव्या दमाचे कलाकार हे या चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे.**

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** आजवर चित्रपटांतून प्रतिशोधाच्या वेगवेगळ्या कथा मांडल्या गेल्या आहेत. आता 'गौरीशंकर' या आगामी चित्रपटातून प्रतिशोधाची नवी कथा उलगडणार आहेत. नव्या दमाचे कलाकार असलेला "गौरीशंकर" हा चित्रपट २८ फेब्रुवरीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून नुकतेच या चित्रपटाचे मोशन पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले आहे.

मुव्ही रूट प्रस्तुत आणि ऑरेंज प्रोडक्शन निर्मिति संस्थेअंतर्गत 'गौरीशंकर' या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून विशाल प्रदीप संपत हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. हरेकृष्ण गौडा यांनी चित्रपटाचं दिग्दर्शन, रोशन खडगी यांनी छायाचित्रण केले आहे.संकेत कोळंबेकर यांनी लिहिलेल्या गीतांना अमित जवळकर यांनी संकलन, प्रशांत निशांत यांचे सुमधुर संगीत लाभले आहे. या चित्रपटात हरेकृष्ण गौडा, दक्षिणा राठोड, काव्या (कविता) सूर्यवंशी वसानी, राहुल जगताप या नवोदित कलाकारांच्या दमदार भूमिका आपल्याला पहायला मिळणार आहेत.






'गौरीशंकर' या चित्रपटातली कथा आहे गौरी आणि शंकर यांच्या प्रेमाची... दुर्दैवानं त्यांच्या प्रेमात एक संकट निर्माण होते. त्याच्यावर आलेल्या संकटाचा प्रतिशोध घेण्याचा प्रयत्न या आशयसूत्रावर 'गौरीशंकर' हा चित्रपट बेतला आहे. नव्या दमाचे कलाकार हे या चित्रपटाचं वैशिष्ट्य आहे. त्यामुळे एक थरारक, रोमांचक मनोरंजक कथानक मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी 'गौरीशंकर' प्रदर्शित होण्याची रसिकप्रेक्षकांना अजुन थोडी वाट पहावी लागणार आहे.

# पुण्यातील विद्यार्थ्यांकडून स्मार्ट व्हीलचेअरचे अनावरण

**शिक्षण आणि नवोन्मेषाचा ऐतिहासिक टप्पा**



**पुणे :** टेकव्हिजन २०२५, सलाम बॉम्बे फाउंडेशनच्या STEM उपक्रमाने एड्युकॉन्क्लेव्ह २.० मध्ये महत्वपूर्ण छाप सोडली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित या कार्यक्रमात, प्रधान वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या (भारत सरकार) अंतर्गत पुणे नॉलेज क्लस्टर यांच्या सहकार्याने, आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम सादर करण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ मिळाले.

> अनुष्का देशमुख आणि अनुष्का पिंगुळ, पुणे यांनी दृष्टीदोष असलेल्या लोकांसाठी 'थर्ड आय' हे व्यक्तीच्या शरीरावर घालण्याजोगे अडथळा शोधक उपकरण तयार केले आहे. पारंपरिक काठी केवळ समोरचे अडथळे ओळखते, परंतु त्यांच्या उपकरणामुळे सर्व दिशांमधील अडथळे लहान कंपनांद्वारे लक्षात येतात. "हे केवळ एक उपकरण नाही—हे स्वातंत्र्य आहे."
> **— अनुष्का देशमुख**

### समाजोपयोगी नवोन्मेष

प्रदर्शनातील प्रमुख प्रकल्पांपैकी एक होता कृषीबॉट, एक रिमोट-कंट्रोल फर्टिलायझर स्प्रेइंग सोल्युशन, जो दिंडोरी, नाशिकच्या आदित्य पिंगळे आणि त्याचे सहकारी अभिजित पवार व परशराम पिंगळ यांनी विकसित केला आहे. आदित्यने आपल्या शेतकरी काकांना २० लिटरच्या फवारणीच्या बाटल्या वाहून नेण्यामुळे होणारा त्रास पाहिला आणि हा भार कमी करण्याचा निर्धार केला. "आता शेतकरी अगदी ३ किमी अंतरावरूनदेखील मोबाईलद्वारे आपल्या शेतीमध्ये खत फवारू शकतात," असे आदित्यने सांगितले.

रस्ते सुरक्षा लक्षात घेऊन मुंबईच्या क्रांती नाईक आणि हर्षल यांनी अल्कोहोल डिटेक्टरसह हेल्मेट तयार केले आहे, जे चालकाच्या श्वासातून मद्य आढळल्यास बीप करून सतर्क करते. "आम्हाला आशा आहे की भविष्यात हे उपकरण सक्तीचे होईल आणि त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होईल," असे क्रांती म्हणाली.

### STEM क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी यशवंतराव चव्हाण अकादमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन (YASHADA) चे उप संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांचे कौतुक केले. "मी विशेषतः नगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी रोबोटिक्स प्रकल्प सादर केल्याचे पाहून प्रभावित झालो," असे ते म्हणाले.

> टेकव्हिजन फक्त संधींबद्दल नाही, तो परिणामांबद्दल आहे. हे विद्यार्थी संधींची वाट पाहत नाहीत ते त्या निर्माण करत आहेत."
> **— गौरव अरोरा,** सलाम बॉम्बे फाउंडेशनचे मुख्य विकास अधिकारी

- **प्रदर्शनास १०० हून अधिक STEM शिक्षकांनी भेट दिली**
- **पुण्यातील १४ सरकारी आणि अनुदानित शाळांमधील १०००+ विद्यार्थ्यांचा सहभाग**
- **हे विद्यार्थी हँड्स-ऑन STEM शिक्षणामुळे त्यांचे जीवन कसे बदलत आहे, याचा उत्कृष्ट प्रत्यय होता.**

> स्मार्ट व्हीलचेअर, जो पुण्याच्या प्रथमेश सोनवणे आणि सार्थक अर्जुन यांनी विकसित केला आहे. रिमोट नेव्हिगेशन आणि अडथळा ओळखण्याच्या तंत्रज्ञानासह, हे उपकरण दिव्यांग व्यक्तींना मुक्तपणे हालचाल करण्यास मदत करते. "आता शारीरिक मर्यादा कोणालाही थांबवू शकत नाहीत,"
> **— प्रथमेश सोनवणे**

पुणे नॉलेज क्लस्टरच्या CEO डॉ. प्रिया नगराज यांनी सांगितले की, "आपण तंत्रज्ञानाचा उपयोग जबाबदारीने आणि नैतिकतेच्या चौकटीत करत आहोत याची खात्री करणे ही आपली जबाबदारी आहे. यंदाच्या 'ट्रान्सफॉर्मिंग STEM एज्युकेशन' या थीम अंतर्गत डिजिटल साधनांचा उपयोग आणि शिक्षणातील त्यांचे प्रभावी उपयोजन यावर विचार केला जात आहे."

# चीन-अमेरिका 'टॅरिफ वॉर'चा भारताला फायदा



न्यू यार्कः अमेरिका आणि चीन यांच्यात सुरू झालेल्या द्विपक्षीय शुल्कयुद्धामुळे जग चिंतेत आहे. एकीकडे हे मुक्त व्यापाराचे जागतिक तत्त्वज्ञान नष्ट करू शकते, तर दुसरीकडे व्यापारयुद्धाची व्याप्ती जगभर पसरू शकते. भारतासाठी ही एक फायदेशीर संधी आहे आणि ते जगाच्या आणि विशेषतः अमेरिकेच्या गरजा चीनपेक्षा चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकतात हे सिद्ध करण्याची संधी आहे.

उच्च शुल्कामुळे चिनी वस्तूंच्या अमेरिकेत निर्यातीवर बंदी घातल्याने भारताला अमेरिकेत निर्यात वाढवण्याचा मार्ग मोकळा होईल. जागतिक व्यापार तज्ज्ञांचे म्हणणे आहे, की डोनाल्ड ट्रम्प यांच्या शेवटच्या कार्यकाळात जेव्हा अमेरिकेने चीनवर विविध प्रकारचे निर्बंध लादले होते, तेव्हाही भारत हा चौथ्या क्रमांकाचा फायदा घेणारा देश होता.

### निर्यातदारांना संधी

भारतीय निर्यातदारांना अमेरिका आणि चीनमधील व्यापार युद्धाचा फायदा अमेरिकन बाजारपेठेत त्यांची निर्यात वाढवण्यासाठी होईल अशी अपेक्षा आहे. सत्तेवर परत आल्यानंतर, ट्रम्प यांनी चीनमधून आयातीवर कठोर शुल्क लागू करण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली. प्रचारातील वचन पूर्ण केले; परंतु अमेरिकन ग्राहकांसाठी वाढत्या किमतीची भीती वाढवली. भारतीय निर्यातदारांनी असेही म्हटले आहे, की चीनमधून आयातीवर मोठ्या प्रमाणावर शुल्क आकारल्याने चीनमधून अमेरिकेतील निर्यातीवर परिणाम होईल. कारण यामुळे अमेरिकन बाजारपेठेत त्यांच्या वस्तूंच्या किमती वाढतील. त्यामुळे त्यांना बाजारात टिकून राहणे कठीण होईल.

### भारत इलेक्ट्रॅानिक्सची भरारीची तयारी

एका अहवालानुसार, चीनवर शुल्क लादण्याची अंतिम मुदत जवळ आल्याने ट्रम्प हे शी जिनपिंग यांच्याशी चर्चा करण्याचा विचार करत आहेत. दरम्यान, ट्रम्प यांनी चिनी आयातीवर शुल्क लादल्यानंतर भारत इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीला प्रोत्साहन देण्याची तयारी करत आहे. 'फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशन'चे महासंचालक अजय सहाय यांनी म्हटले आहे, की या संधीमुळे भारतीय निर्यातीसाठी संधी निर्माण होऊ शकतात. कारण, चिनी वस्तूंच्या उच्च किंमती टाळण्यासाठी अमेरिकन इतर देशांकडून पुरवठादार शोधतील. २०२१-२४ मध्ये अमेरिका भारताचा सर्वात मोठा व्यापार भागीदार होता हे लक्षात घ्यावे.

# भारतातील वीस टक्के कुटुंबे शेअर बाजाराशी जोडलेले



**मुंबई:** भारतीय कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल गेल्या दशकात सहा पटीने वाढले आहे. भारतातील प्रत्येक पाच कुटुंबांपैकी एक कुटुंब आता शेअर बाजाराशी जोडले गेले आहे. 'एनएसई'ने आपल्या एका अहवालात ही माहिती दिली आहे.

'एनएसई' च्या अहवालांनुसार, शेअर बाजारातील गुंतवणुकीशी जोडलेल्या खात्यांची संख्या २१ कोटींच्या पुढे गेली आहे, त्यापैकी १८ कोटींहून अधिक डिमॅट खाती आहेत. 'एनएसई'च्या आकडेवारीनुसार, अवघ्या पाच महिन्यांत दोन कोटी गुंतवणूकदार शेअर बाजारात सामील झाले. 'एनएसई' ने आपल्या अहवालात म्हटले आहे, की २०२४ मध्ये २.३२ कोटी नवीन गुंतवणूकदार सामील झाले, जे एका वर्षातील आतापर्यंतचे सर्वोच्च आकडा आहे.

### संपत्तीत ४० लाख कोटींची वाढ

शेअर बाजारात गुंतवणूक करून भारतीय कुटुंबांच्या उत्पन्नावरही या अहवालात प्रकाश टाकण्यात आला आहे. गेल्या पाच वर्षांत भारतीय कुटुंबांच्या संपत्तीत ४० लाख कोटी रुपयांची आणि गेल्या तीन वर्षांत २८ लाख कोटी रुपयांची वाढ झाल्याचे अहवालात म्हटले आहे. एकट्या २०२४ मध्ये देशांतर्गत गुंतवणूकदारांनी १३.२ लाख कोटी रुपयांची संपत्ती जमा केली. 'एनएसई'च्या मते, संपत्तीचा हा अंदाज स्टॉक गुंतवणूक आणि म्युच्युअल फंड या दोन्हींद्वारे सूचीबद्ध कंपन्यांमधील वैयक्तिक होल्डिंगमध्ये वार्षिक बदलावर आधारित आहे.

### गुंतवणूकदारांचा वाढलेला विश्वास

'एनएसई' च्या मते, बाजारातील चढउतारानंतरही भारतीय गुंतवणूकदारांनी शेअर बाजारांवर विश्वास दाखवला आहे. 'एनएसई' ने सांगितले, की सप्टेंबर २०२४ पर्यंत, वैयक्तिक गुंतवणूकदार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे भारतीय शेअर बाजाराचा १७.६ टक्के हिस्सा राखतात. मागील वर्षांच्या तुलनेत या आकडेवारीत लक्षणीय वाढ झाली आहे. हे विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांच्या (एफपीआय) भागीदारीइतकेच आहे. 'एफपीआय' होल्डिंग्स २०२१ मध्ये वैयक्तिक होल्डिंगसपेक्षा ७.१ टक्क्यांनी जास्त होते.

### देशांतर्गत चलनामुळे चालना

अहवालात पुढे म्हटले आहे, की 'एफपीआय' निधी काढत आहेत; परंतु मजबूत देशांतर्गत चलनांमुळे बाजार स्थिर राहिला आहे. अधिक गुंतवणूकदारांनी बाजारात प्रवेश केल्यामुळे आणि त्यांची कमाई वाढतच राहिल्याने भारतीय कुटुंबांचा इक्विटीमधील सहभाग आणखी वाढण्याची अपेक्षा आहे, असे 'एनएसई'ने आपल्या अहवालात म्हटले आहे.


# एटीएममधून पैसे काढणे महागणार

**मुंबईः** एटीएममधून पैसे काढणाऱ्या लोकांसाठी रिझर्व्ह बँक मोठा बदल करण्याच्या तयारीत आहे. एटीएममधून रोख रक्कम काढणे लवकरच महाग होऊ शकते. रिझर्व्ह बँक एटीएम इंटरचेंज फी आणि मोफत पैसे काढण्याच्या मर्यादेपेक्षा जास्त शुल्क वाढविण्याचा विचार करत आहे.

सध्या, रिझर्व्ह बँक एका महिन्यात पाच वेळा पैसे काढण्याची सुविधा मोफत देत होती; परंतु आता या पाच व्यवहारांची मर्यादा ओलांडण्यासाठी रिझर्व्ह बँक शुल्क आणि एटीएम इंटरचेंज फी वाढवण्याचा विचार करत आहे.

### किती वाढणार शुल्क?

या प्रकरणाची माहिती असलेल्या लोकांना उद्धृत करून, अहवालात म्हटले आहे, की, 'एनपीसीआय' ने विनामूल्य मर्यादा पाच वेळा गाठल्यानंतर रोख पैसे काढण्याचे शुल्क सध्याच्या २१ रुपयांवरून २२ रुपये करण्याची शिफारस केली आहे. याशिवाय 'एनपीसीआय'ने रोख व्यवहारांसाठी एटीएम इंटरचेंज शुल्क १७ रुपयांवरून १९ रुपयांपर्यंत वाढवण्याची शिफारस केली आहे. दुसऱ्या बँकेच्या एटीएममधून एका मर्यादेपेक्षा जास्त पैसे काढल्यास इंटरचेंज फी आकारली जाते.ही फी म्हणजे एटीएम सेवा वापरण्याच्या बदल्यात एका बँकेने दुसऱ्या बँकेला दिलेली



फी असते. अहवालानुसार, बँका आणि व्हाईट-लेबल एटीएम ऑपरेटर मेट्रो आणि नॉन-मेट्रो शहरांमध्ये शुल्क वाढवण्याच्या 'एनपीसीआय'च्या शिफारशीशी सहमत आहेत; परंतु भारतीय रिझर्व्ह बँक आणि 'एनपीसीआय'ने अद्याप या प्रकरणावर कोणतीही अधिकृत टिप्पणी केलेली नाही.

### एटीएम खर्चात वाढ

अहवालानुसार, वाढती महागाई आणि कर्ज घेण्याच्या खर्चात गेल्या दोन वर्षांत दीड ते दोन टक्के दराने वाढ, वाहतुकीवरील जास्त खर्च, रोख रक्कम भरून काढणे आणि खर्च यामुळे बिगर मेट्रो शहरांमध्ये एटीएम चालविण्याचा खर्च वेगाने वाढत आहे.

# 'दूध सेवनातील' विषमता कमी करण्याची आवश्यकता !



**यशस्वी श्वेतक्रांतीमुळे आपण जगातील सर्वात मोठे दूध उत्पादक देश बनलो आहोत. मात्र देशातील शहरी व ग्रामीण भागातील गरीब- श्रीमंत यांच्यामध्ये दुधाचे वाटप तसेच त्याचे सेवन असमान पद्धतीने होत असल्याचे निदर्शनास आले आहे. केंद्र सरकारच्या अलीकडच्या " घरगुती वापर खर्च सर्वेक्षणामध्ये" (हाऊसहोल्ड कन्झम्शन एक्स्पेंडिचर सर्व्हे) उच्चवर्गीयांमध्ये दुधाचा अतिवापर तर गोरगरिबांमध्ये तुटवडा असे विषमतेचे चित्र आहे. दूध हे पुर्णान्न असल्याने मागणी-पुरवठ्यातील दरी नष्ट करण्याचे आपल्यासमोर आव्हान आहे. त्याचा घेतलेला वेध.**

गुजरातमधील आनंद डेअरीचे अध्वर्यु व्हर्गीस कुरियन यांच्या प्रेरणेतून सुरु झालेल्या श्वेतक्रांतीमुळे दूध उत्पादन क्षेत्रात आपण मोठी क्रांती केली. त्यामुळे सर्वाधिक लोकसंख्या असलेला भारत हा जगातील आघाडीचा दूध उत्पादक देश बनला आहे. एका बाजूला ही अत्यंत अभिमानास्पद गोष्ट असतानाच दुसरीकडे या दुधाचा वापर व सेवनाबाबत शहरी व ग्रामीण भागातील श्रीमंत- गरिबांमध्ये मोठी दरी निर्माण झाल्याचे या पाहणीतून लक्षात आले आहे. मागणी आणि पुरवठा याचे योग्य संतुलन साधले गेलेले नाही.

आपल्या आहारामध्ये दुधाचे स्थान अनन्य साधारण आहे. आपण दुधाला पूर्णान्न मानतो. त्याच्या सेवनामुळे आपल्याला प्रथिने ( प्रोटीन्स), कॅल्शियम, व्हिटॅमिन डी आणि अन्य सूक्ष्म द्रव्यांचा शरीराला समतोल पुरवठा केला जातो. आपल्या शरीरातील हाडे व सांधे मजबूत करण्यासाठी तसेच दात स्नायू तयार करण्यासाठी कॅल्शियम व प्रोटीन युक्त पदार्थ खाणे महत्त्वाचे असते त्यामुळे भारतीयांच्या आहारात दूध व दुग्धजन्य पदार्थांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. घन अन्न पचवण्यासाठी पोषणाचा प्राथमिक स्त्रोत म्हणजे दूध आहे.

गेल्या दहा वर्षात भारतातील दुधाचे उत्पादन लक्षणीयरीत्या वाढले आहे. दूध उत्पादनाच्या बाबतीत उत्तर प्रदेश मध्ये सर्वाधिक म्हणजे ३८ दशलक्ष मॅट्रिक टन दुधाचे उत्पादन केले गेले. त्या खालोखाल राजस्थानचा क्रमांक लागतो. २०२४ या वर्षात भारतातील एकूण दूध उत्पादन २३९ दशलक्ष मेट्रिक टनांपेक्षा जास्त होते. तसेच २०२४ या वर्षामध्ये भारताने सर्वाधिक गाईचे दूध वापरले. सुमारे ८९ दशलक्ष मेट्रिक टन दुधाचे सेवन भारताने केले असून त्या खालोखाल युरोपियन युनियन मधील देशांमध्ये दुधाचे सेवन केले गेले. आपल्याकडे दूध सेवनातील विषमता किंवा विभाजन पुढील महत्त्वाच्या घटकांवर आधारित आहे. त्यात प्रादेशिक विभाजन, ग्रामीण विरुद्ध शहरी विभाजन, सांस्कृतिक आणि आहारातील विभाजन, दुग्धजन्य पर्याय व प्राधान्य याचा वाटा मोठा आहे. आर्थिक स्तरानुसार विभाजनाचा विचार केला तर संपन्न कुटुंबे हे अधिक प्रमाणात पॅकबंद, सेंद्रिय (ऑर्गेनिक) दूध आणि आरोग्यवर्धक दुग्धजन्य पदार्थ वापरतात. याऊलट निम्न-आर्थिक स्तरातील कुटुंबे हे स्थानिक डेअरीतून किंवा खुले दूध घेतात आणि किंमतीमुळे त्यांचे सेवन तुलनेने कमी असते. सांस्कृतिक आणि आहारातील विभाजन लक्षात घेतले तर शाकाहारी व मांसाहारी आहार घेणाऱ्यांमध्ये खूप फरक आहे. शाकाहारी समाजातील लोक दूध आणि दुग्धजन्य पदार्थ अधिक प्रमाणात घेतात, तर मांसाहारी लोक तुलनेने कमी प्रमाणात दूध घेतात. तसेच दक्षिण भारत आणि ईशान्य भारतातील काही लोकांमध्ये लॅक्टोज असहिष्णुता अधिक असल्याने ते कमी दूध सेवन करतात. त्याचप्रमाणे आरोग्य जागरूकता आणि शाकाहाराच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे सोया, बदाम, ओट्स आणि नारळाचे दूध हे पर्याय मोठ्या शहरांमध्ये लोकप्रिय होत आहेत.



संपूर्ण भारतामध्ये दुधाचे सर्वाधिक उत्पादन हे ग्रामीण भागामध्ये केले जाते. मात्र ग्रामीण भागातच त्याचे सेवन खूप कमी आढळते. एवढेच नाही तर विविध सामाजिक समूहांचा विचार करता अनुसूचित जाती-जमातींमध्ये दरडोई दुधाचे सेवन हे चार लिटर पेक्षाही कमी आहे.राजस्थान पंजाब किंवा हरियाणा या राज्यामधील घरांमध्ये दरडोई ३३३ ते ४२१ ग्रॅम दुधाचे सेवन दररोज केले जाते असे आकडेवारीवरून दिसते. छत्तीसगड ओरिसा आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये हे दरडोई दूध सेवनाचे दररोजचे प्रमाण केवळ ७५ ग्रॅम ते १७१ ग्रॅम इतके कमी आहे.

शहरी भागातील उच्च वर्गीयांमध्ये किंवा श्रीमंत वर्गामध्ये दूध व दुग्धजन्य पदार्थाचे सेवन हे शिफारस केलेल्या प्रमाणाच्या जवळ जवळ दुप्पट आहे. त्यामध्ये आईस्क्रीम किंवा मिल्कशेकसारख्या गोड पदार्थांचा समावेश मोठ्या प्रमाणावर दिसत आहे. याचा दुष्परिणाम म्हणजे या वर्गामध्ये अतिपोषण, लठ्ठपणा, शरीरात जास्त चरबी निर्माण होणे व अन्य असंसर्गजन्य रोगाचे प्रमाण वाढलेले दिसत आहे.

- प्रा. नंदकुमार काकिर्डे

### जागरूकता करणे आवश्यक

- केंद्र सरकारने या सर्वेक्षणाची तातडीने गंभीर दखल घेऊन सर्व राज्यांना योग्य प्रमाणात दुधाचे किंवा दूध भुकटीचे वाटप केले जाईल याची दक्षता घेतली पाहिजे. ज्या राज्यांमध्ये दुधाचे उत्पादन सर्वाधिक आहे तेथील ग्रामीण भागामध्ये त्याचे समतोल वाटप कशा प्रकारे होईल यासाठी कार्यक्षम योजना आखल्या पाहिजेत त्याला आर्थिक पाठबळ दिले पाहिजे. दूध सेवनाबाबत सर्व स्तरांवर तसेच विविध महिला संघटना, बालवाड्या, अंगणवाड्या, डॉक्टर वर्ग, प्रसारमाध्यमे यांच्या माध्यमातून समतोल आहार व दूध सेवनाबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

### वाटप प्रामाणिकपणे होत नाही

- देशातील तरुण मुले किंवा गर्भवती महिला किंवा स्तनपान करणाऱ्या महिलांमध्ये दुधाचा वापर जास्त होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वृद्ध व्यक्तींमध्येही दुधाचे सेवन जास्त प्रमाणात होणे आवश्यक आहे. आज देशामध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना देशभर राबवली जात आहे.त्याचप्रमाणे बालकांना पोषणयुक्त आहार शाळांमधून दिला जातो. मात्र प्रत्यक्षात देशभरातील बालकांना, महिलांना दुधाचे वाटप प्रामाणिकपणे, योग्य रितीने होताना दिसत नाही ही खेदाची गोष्ट आहे.

# केळीने रेल्वेला केले मालामाल



**जळगावः** केळीने जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मालामाल केले आहे. जळगावची केळी साता समुद्रापार पोहचली आहे. केळी उत्पादनात आघाडीवर असलेल्या रावेर तालुक्यातून एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यांच्या कालावधीत २९ रॅक शेतमाल भरण्यात आला. तो केवळ दिल्लीच्या मार्केटला नेला असून एक लाख १४ हजार ६७५ क्विंटल एवढा शेतमाल होता. त्याच्या वाहतुकीमधून रेल्वेला ३ कोटी ४५ लाख ८७ हजार ५७७ रुपयाचे उत्पन्न मिळाले. यामध्ये रावेर व निंभोरा या दोन रेल्वे मालधक्क्यांचा समावेश आहे.

देशात सर्वाधिक केळीचे उत्पादन घेणाऱ्या जळगाव जिल्ह्यात रावेर तालुका आघाडीवर आहे. केळीच्या हंगामात आवक बेसुमार वाढते. त्यामुळे रोड वाहतुकीतून परराज्यातील बाजारपेठांमध्ये केळी कमी वेळेत व कमी खर्चात पाठवणे शक्य होत नाही. अशावेळी शेतकऱ्यांच्या मदतीला रेल्वे नेहमीच धावते. रेल्वेच्या माध्यमातून जलद आणि तुलनेत कमी खर्चात मालाची निर्यात करणे सोपे झाले आहे. केळी वाहतुकीतून रेल्वेसुद्धा मोठा महसूल मिळाला आहे.

### रेल्वेला पावणेचार कोटींचे उत्पन्न

गेल्या वर्षी २०२३ मध्येही ३४ रॅकच्या माध्यमातून १ लाख २३ हजार ६९० क्विंटल शेतमाल वाहतूक केला होता. त्यामधून रेल्वेला ३ कोटी ७३ लाख ६ हजार ७१६ रुपयाचे उत्पन्न मिळाले होते. तो हंगामदेखील एप्रिल ते सप्टेंबरापर्यंतचा होता. त्यानंतर कुठलाही माल रेल्वेने वाहतूक केला नाही. उत्पादन जास्त असल्यामुळे केळी शेतात पडून राहते. त्यामुळे परिणाम होऊन भाव कमी मिळतो. यातून शेतकरी नाडला जातो. त्यावर रेल्वेने उपाय केला आहे.

### रेल्वेमधून केळी दिल्लीला

या वेळी फळ बागायतदार सोसायटीच्या माध्यमातून रेल्वेतून केळी दिल्ली व उत्तर भारतात पाठवण्यात आली. दिल्ली स्थानकावर शेतमाल पोहोचल्यास तेथील स्थानिक व्यापारी उत्तर प्रदेश, हिमाचल, कुल्लू मनाली व इतर भागात केळी विक्री करतात. दरवर्षी मार्च महिन्यापासून नवती केळीच्या कापणीला सुरुवात होते, तर एप्रीलमध्ये कापणीचे प्रमाण वाढते. उन्हात वाहतूक करताना केळी काळी पडून खराब होण्याची भीती असते. रस्ते मार्गाने वाहतूक करण्यास अधिक वेळ लागतो. त्यामुळे ट्रकमध्ये भरलेल्या मालात वरचा माल काळा पडून नुकसान होते. म्हणून एप्रिलपासून परिस्थिती व आवक पाहून रेल्वेमधून केळी दिल्लीला रवाना केली जाते.

संपादकीय विशेष

# घूमजावची वेळ

कोणाचेही न ऐकता काही व्यक्तींना निर्णय घेण्याची सवय असते. परिणामांचा विचार न करता निर्णय घेतले आणि नंतर ते अंगलट आले, की घूमजाव करायचे, ही अनेकांची पद्धत असते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरही कॅनडा, चीन आणि मेक्सिकोवर आयातशुल्क लागू करण्याची घोषणा केल्यानंतर अवघ्या २४ तासांत घूमजाव करण्याची वेळ आली.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यापारी संतुलनाच्या नावाखाली चीन, मेक्सिको आणि कॅनडातून आयात होणाऱ्या वस्तूंच्या आयातशुल्कात वाढ केली. या निर्णयाविरोधात कोणीही सूडबुद्धीने कारवाई केल्यास शुल्क आणखी वाढवले जाईल, अशी धमकीही ट्रम्प यांनी दिली आहे. 'रिसर्च अँड इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर डेव्हलपिंग कंट्रीज' (आरआयएस) नुसार, चीन, मेक्सिको आणि कॅनडा हे अमेरिकेच्या व्यापार तुटीत सर्वाधिक योगदान देतात. कॅनडा हा अमेरिकेला कच्च्या तेलाचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. जानेवारी ते नोव्हेंबर दरम्यान कॅनडाने अमेरिकेला ६१ टक्के कच्च्या तेलाचा पुरवठा केला. कॅनडा, मेक्सिको आणि अमेरिका या देशांच्या अर्थव्यवस्था एकमेकांशी खोलवर जोडलेल्या आहेत. एका अंदाजानुसार, या तिन्ही देशांमध्ये दररोज सुमारे दोन अब्ज डॉलर्सच्या वस्तूंची खरेदी-विक्री होते. 'पीटरसन इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल इकॉनॉमिक्स'ने जानेवारीमध्ये सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे, की कॅनडा आणि मेक्सिकोवर २५ टक्के शुल्क लागू केल्याने केवळ या दोन देशांमध्येच नव्हे, तर अमेरिकेतही वाढ मंदावेल आणि महागाई वाढेल. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी ट्रम्प यांच्या निर्णयाला प्रत्युत्तर दिले. १५५ अब्ज डॉलरच्या अमेरिकन वस्तूंवर २५ टक्के शुल्क लावण्याचा पवित्रा त्यांनी घेतला. १२५ अब्ज डॉलर किमतीच्या वस्तूंवरचे आयातशुल्काचे दर पुढील २१ दिवसांत लागू होतील. यामध्ये अमेरिकन बिअर, वाईन, बोरबॉन, फळं आणि फळांचे रस, भाज्या, परफ्यूम, कपडे आणि शूज, गृहोपयोगी वस्तू, खेळाचं सामान, फर्निचर, लाकूड आणि प्लास्टिक यांचा समावेश होता. चीनने म्हटले आहे, की अमेरिका चुकीच्या पद्धती वापरत आहे. चीनने जागतिक व्यापार संघटनेत अमेरिकेविरुद्ध दाद मागण्याचा इशारा दिला आहे. 'आयआरएस'च्या मते, सध्या चीन अमेरिकेला सर्वाधिक निर्यात करतो आणि आयात कमी करतो. मेक्सिको आणि कॅनडाचीही हीच परिस्थिती आहे. त्यामुळे अमेरिकेचे व्यापारात नुकसान होत आहे. म्हणजेच चीनमुळे अमेरिकेला सर्वात मोठी व्यापारी तूट सहन करावी लागत आहे. या यादीत मेक्सिको दुसऱ्या तर कॅनडा तिसऱ्या क्रमांकावर आहे. अमेरिकेच्या व्यापार तुटीत भारताचा एकूण वाटा ३.२ टक्के आहे. भारतातही दरवाढीबाबत गदारोळ सुरू झाला आहे. राजकारणापासून आर्थिक वर्तुळात अशी चर्चा आहे, की ट्रम्प भारतासोबतच्या व्यापार तुटीबाबत काही पाऊल उचलू शकतील का? ट्रम्प यांनी अलीकडेच 'ब्रिक्स' देशांना धमकी दिली होती. या गटाचा भाग असलेल्या चीनवरही कारवाई करण्यात आली आहे. या गटात भारताचाही समावेश आहे.. गेल्या टर्ममध्ये ट्रम्प यांनी स्टील आणि ॲल्युमिनियमच्या आयातीवर शुल्क लादले होते. भारताने हार्ले-डेव्हिडसन बाइक्सच्या आयातीवरील शुल्क कमी केलं होते. ट्रम्प सातत्याने शुल्क वाढवण्याच्या धमक्या देत असले, तरी अमेरिका भारताच्या मोठ्या बाजारपेठेकडे दुर्लक्ष करू शकत नाही. अमेरिकन ई-कॉमर्स कंपन्या, बँका, वित्तीय सेवांसह तंत्रज्ञान कंपन्यांना भारतात प्रचंड रस आहे. 'सोशल नेटवर्किंग' कंपन्यांचाही भारत हा सर्वात मोठा आधार आहे. मोदी आणि ट्रम्प यांच्यात अमेरिकेत बैठक होणार आहे. दोन्ही नेत्यांमधील बैठकीत अमेरिकेच्या व्यापारातील तूट भरून काढण्यासाठी नवीन मार्ग निघू शकतो. संरक्षण क्षेत्रातही भारताला अमेरिकेच्या पाठिंब्याची गरज आहे. भारताला या क्षेत्रात विविधतेसह सर्वोत्तम शस्त्रे हवी आहेत. त्याचबरोबर पेट्रोलियम क्षेत्रातही आखाती देशांपेक्षा अमेरिकेकडून चांगल्या ऑफर्स मिळाल्यास प्रगती होऊ शकते.

ट्रम्प यांच्या घोषणेनंतर अनेक अर्थतज्ज्ञांनी अमेरिकेलाही या निर्णयाचा फटका बसू शकतो, महागाई वाढू शकते आणि बेरोजगारी वाढेल, असे इशारे दिले. त्यानंतर ट्रम्प यांना आपल्या निर्णयाच्या परिणामांची जाणीव झाली. ट्रम्प यांनी मेक्सिकोपाठोपाठ कॅनडावर २५ टक्के शुल्क लागू करण्याची त्यांची योजना पुढे ढकलण्याची घोषणा केली आहे. अगोदर शनिवारपासून वाढीव आयातशुल्क लागू करण्याची घोषणा त्यांनी केली;परंतु त्या देशांतूनही इतकी कडवट प्रतिक्रिया येईल आणि त्यातून अमेरिकेचेच नुकसान होईल, असे त्यांनी गृहीत धरले नसावे. अमेरिकेच्या संभाव्य आयातशुल्क वाढीच्या घोषणेनंतर भारताने लगेच अर्थसंकल्पात अमेरिकेतून आयात होणाऱ्या वस्तूंवरचे आयातशुल्क कमी करून लोटांगण घातले. मोदी यांच्या दौऱ्याच्या अगोदर अमेरिका भारतावर वाढीव आयातशुल्क लावणार नाही, अशी व्यवस्था करण्यात आली. असे असले, तरी ट्रम्प यांचा स्वभाव पाहता ते कधीही काहीही करू शकतात. भारतासारख्या मोठ्या देशाच्या तुलनेत लहान असलेल्या कॅनडा आणि मेक्सिकोने मात्र ट्रम्प यांना जशास तसे उत्तर दिल्याने ट्रम्प यांना आपल्या निर्णयाची अंमलबजावणी एक महिना पुढे ढकलावी लागली आहे. कॅनडात निवडणुका होणार आहेत. अमेरिका आता कॅनडा हा स्वतंत्र देश नसून आपले ५१ वे राज्य आहे, असे मानतो. ट्रम्प यांची आक्रमक विस्तारवादी भूमिका रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यासारखीच आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांच्याबाबत देशात नाराजी आहे. त्यांचा कारभारही चांगला नाही. असे असले, तरी त्यांनी ट्रम्प यांना दिलेले उत्तर बाणेदारपणा दाखवून देणारे आहे. ट्रम्प यांचे मित्र एलन मस्क यांनी तर कॅनडाच्या निवडणुकीत ट्रुडो यांचा पराभव करण्याची शपथ घेतली आहे. असे असताना ट्रुडो यांनी लोटांगण न घालता अमेरिकेला धडा शिकवला. मेक्सिकोनेही तसेच केले. चीनने अमेरिकेच्या 'टॅरिफ वॉर'ला जागतिक व्यापार संघटनेत आव्हान देण्याचा तसेच अमेरिकेतून आयात होणाऱ्या वस्तूंवर ट्रम्प यांच्याइतकेच वाढीव आयातशुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. निर्णयाला स्थगिती देताना कॅनडा आणि मेक्सिकोने सीमेवरील सुरक्षा सुधारण्यासाठी पावले उचलण्याचे आणि अमली पदार्थांच्या तस्करीवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याचा साळसूदपणा अमेरिकेने आणला. कॅनडा आणि मेक्सिकोशी अमेरिका सर्वाधिक व्यापार करतो. ट्रम्प यांनी शुल्क लागू करण्याची घोषणा केल्यानंतर दोन्ही देशांनी प्रत्युत्तराच्या कारवाईबाबत चर्चा केली होती. कॅनडाचे म्हणणे आहे, की ते सीमेपलीकडून होणाऱ्या फेंटॅनाइल ड्रगची तस्करी रोखण्याच्या प्रयत्नांवर देखरेख ठेवण्यासाठी एका अधिकाऱ्याची नियुक्ती करील. त्याचबरोबर मेक्सिकोनेही ट्रम्प यांच्याशी झालेल्या करारानुसार आपले १० हजार सैनिक सीमेवर पाठवण्याची तयारी दर्शवली आहे.

# जोमाने वाढली क्रेडिट कार्डस आणि पर्यटक

आर्थिक आकडेवारीच्या अनुषंगाने काही रोचक तथ्ये अलिकडे समोर आली. गेल्या पाच वर्षांमध्ये क्रेडिट कार्डांचा वापर दुप्पट झाल्याचे यावेळी दिसून आले. देशात मोबाईल डाटा महाग होत असताना इस्रायलमध्ये मोबाईल डेटा सर्वात स्वस्त असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, अध्यात्मिक पर्यटकांच्या संख्येत 21 टक्क्यांनी वाढ झाल्याची तसेच परदेशी शिक्षणावरच्या कराचा बोजा कमी झाल्याचे स्पष्ट करणारी आकडेवारी पुढे आली.

सरत्या आठवड्यामध्ये आर्थिक आकडेवारीच्या अनुषंगाने काही रोचक तथ्ये समोर आली. गेल्या पाच वर्षांमध्ये क्रेडिट कार्डांचा वापर दुप्पट झाल्याचे या वेळी दिसून आले. देशात मोबाईल डाटा महाग होत असताना इस्रायलमध्ये मोबाईल डेटा सर्वात स्वस्त असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, अध्यात्मिक पर्यटकांच्या संख्येत 21 टक्क्यांनी वाढ झाल्याची तसेच परदेशी शिक्षणावरच्या कराचा बोजा कमी झाल्याचे स्पष्ट करणारी आकडेवारी पुढे आली.

गेल्या काही दशकांमध्ये क्रेडिट कार्डचा वापर झपाट्याने वाढला आहे. रिझर्व्ह बँकेच्या अहवालात याचा स्पष्ट पुरावा देण्यात आला आहे. या अहवालानुसार गेल्या पाच वर्षांमध्ये क्रेडिट कार्डची संख्या दुपटीने वाढली आहे. आता ही संख्या वाढून अंदाजे १०.८० कोटी झाली आहे तर डेबिट कार्डची संख्या स्थिर आहे. अहवालानुसार, डिसेंबर २०१९ मध्ये ५.५३ कोटी क्रेडिट कार्ड अस्तित्वात होते. डिसेंबर २०२४ मध्ये ही संख्या १०.८० कोटी झाली. डेबिट कार्डची संख्या डिसेंबर २०१९ मध्ये ८०.५३ कोटी होती. डिसेंबर २०२४ मध्ये ती वाढून ९९.०९ कोटी रुपये झाली आहे. गेल्या दशकात भारतात डिजिटल पेमेंट खूप वेगाने वाढले, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०१३ मध्ये एकूण २२२ कोटी डिजिटल व्यवहार झाले. त्याची एकूण रक्कम ७७२ लाख कोटी रुपये होती. २०२४ मध्ये ही संख्या २०,७८७ कोटी रुपये व्यवहार आणि २,७५८ लाख कोटी रुपये अशी वाढली आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये डिजिटल पेमेंटची संख्या ६.७ पट आणि मूल्य १.६ पटीने वाढले आहे. रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे की त्यांनी सीमापार पेमेंट सुधारण्यासाठी यूपीआयला इतर देशांच्या जलद पेमेंट सिस्टीमशी जोडण्याचे काम केले आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये भारत आणि सिंगापूर जोडले गेले. याशिवाय भारताच्या ॲप्सद्वारे आता भूतान, फ्रान्स, मॉरिशस, नेपाळ, सिंगापूर, श्रीलंका आणि सारख्या देशांमध्येदेखील पेमेंट केले जाऊ शकते.

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर्ज घेऊन आपल्या मुलांना परदेशात पाठवणाऱ्या पालकांप्रती पूर्ण औदार्य दाखवले आहे. कर्ज घेऊन परदेशात शिकणाऱ्या मुलांच्या महाविद्यालयीन फी भरण्यावर 'टीसीएस' म्हणजेच स्रोतावरील कर कपात रद्द केली आहे. याआधी एका वर्षात कॉलेज फीसाठी सात लाखांपेक्षा जास्त रक्कम पाठवण्यावर ०.५ टक्के कर आकारला जात होता. कर्ज न घेता परदेशात पैसे पाठवल्यास टीसीएस २० टक्के कपात करत राहील.**

क्रेडिट कार्ड

महेश देशपांडे
अर्थतज्ज्ञ

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर्ज घेऊन आपल्या मुलांना परदेशात पाठवणाऱ्या पालकांप्रती पूर्ण औदार्य दाखवले आहे. कर्ज घेऊन परदेशात शिकणाऱ्या मुलांच्या महाविद्यालयीन फी भरण्यावर 'टीसीएस' म्हणजेच स्रोतावरील कर कपात रद्द केली आहे. याआधी एका वर्षात कॉलेज फीसाठी सात लाखांपेक्षा जास्त रक्कम पाठवण्यावर ०.५ टक्के कर आकारला जात होता. कर्ज न घेता परदेशात पैसे पाठवल्यास टीसीएस २० टक्के कपात करत राहील. आपल्या मुलांना परदेशात शिकवण्यासाठी कर्ज घेणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे; पण आयुष्यभराची बचत किंवा मालमत्ता किंवा दागिने विकून आपल्या मुलांना परदेशात पाठवणाऱ्यांना दिलासा मिळालेला नाही. कॉलेजच्या फीसाठी परदेशात पैसे पाठवल्यास वीस टक्के 'टीसीएस' कापले जाईल; मात्र कर्ज न घेता परदेशी कॉलेजांमध्ये फी भरण्याची 'टीसीएस'ची मर्यादा वाढवण्यात आली आहे.




जगातील सर्वात स्वस्त मोबाईल इंटरनेट डेटाच्या बाबतीत भारत पहिल्या दहा देशांमध्ये सामील आहे; परंतु पहिल्या स्थानावर नाही. केबल को. युके. च्या अहवालानुसार, इस्रायलमध्ये सर्वात स्वस्त मोबाइल डेटा उपलब्ध आहे. तिथे एक जीबी डेटाची किंमत फक्त १.७० रुपये आहे. हा अभ्यास जून ते सप्टेंबर २०२३ दरम्यान ५,६०० हून अधिक मोबाइल डेटा प्लॅनच्या आधारे करण्यात आला. त्याच वेळी सर्वात महाग इंटरनेट फॉकलँड आइसलँडमध्ये आहे. तिथे एक जीबी डेटाची किंमत सुमारे ३,३४० रुपये आहे. दरम्यान, स्वस्त मोबाईल डेटाच्या बाबतीत पाकिस्तान भारताच्या पुढे आहे. इंटरनेट वापरताना बरेच लोक स्वस्त डेटा योजना शोधतात. बऱ्याच लोकांना वाटते की सर्वात स्वस्त इंटरनेट भारतात आहे; परंतु हे खरे नाही. वास्तविक, इस्रायलमध्ये इंटरनेट सर्वात स्वस्त आहे. या यादीत इटली दुसऱ्या स्थानावर आहे. तिथे एक जीबी डेटाची किंमत सुमारे आठ रुपये आहे. यामध्ये फिजी (0.08 डॉलर), सॅन मारिनो (0.09 डॉलर) आणि कंबोडिया (0.12 डॉलर) या देशांनंतर पाकिस्तान सहाव्या स्थानावर आहे.


पाकिस्तानमध्ये एक जीबी डेटा सुमारे 11 रुपयांमध्ये उपलब्ध आहे. यानंतर भारताचा क्रमांक लागतो. पाकिस्तानसारख्या देशात मोबाईल डेटा स्वस्त असण्याचे कारण म्हणजे बहुतांश लोकांचे उत्पन्न कमी आहे. त्यामुळे टेलिकॉम कंपन्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी स्वस्त डेटा प्लॅन देऊ करतात. पाकिस्तानमधील डेटा नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर भारताच्या तुलनेत कमी विकसित आहे. हे कंपन्यांना कमी खर्चात डेटा सेवा प्रदान करण्यात मदत करते. पाकिस्तानी रुपयाचे मूल्य भारतीय रुपयाच्या तुलनेत कमी असल्यामुळेही डेटाच्या किमती कमी दिसतात.

अध्यात्मिक हेतूने भारतात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत 21.4 टक्के वाढ झाली आहे. 'ॲटलिस' या व्हिसा प्रोसेसिंग प्लॅटफॉर्मने जारी केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. या वाढीचे मुख्य कारण म्हणजे लाखो पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या महाकुंभ आणि इतर मोठ्या धार्मिक कार्यक्रमांचा प्रभाव. अहवालानुसार, सुमारे ४८ टक्के आध्यात्मिक भेट व्हिसा अर्ज हे प्रमुख धार्मिक कार्यक्रम आणि महाकुंभ सारख्या तीर्थयात्रेशी जोडलेले आहेत. सध्या सुरू असलेला महाकुंभ हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक कार्यक्रमांपैकी एक आहे. त्यासाठी कोट्यवधी भाविक उपस्थित आहेत. हा कार्यक्रम दर १४४ वर्षांनी एकदा होतो आणि भारताच्या समृद्ध आध्यात्मिक वारशाशी जोडले जाण्याची अनोखी संधी प्रदान करतो.

अमेरिका आणि ब्रिटनसारख्या देशांमधून अध्यात्मिक पर्यटकांच्या संख्येत अनेक पटींनी वाढ झाली आहे. हे पर्यटक जीवन बदलून टाकणाऱ्या अस्सल अनुभवांच्या शोधात भारतात येतात. अहवालानुसार, अध्यात्मिक प्रवाशांमध्ये स्त्रिया प्रमुख भूमिका बजावत आहेत. तरुण पिढी आता पारंपरिक पर्यटनापासून दूर जात असून अध्यात्मिक आणि अर्थपूर्ण प्रवासांना प्राधान्य देत आहे, हे प्रवासाचे स्वरूप बदलण्याचे लक्षण आहे. महाकुंभसारख्या घटना आणि भारताच्या अध्यात्मिक वारशाबद्दल वाढती जागतिक रूची यामुळे भारत अध्यात्मिक पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनले आहे. चांगल्या पायाभूत सुविधा आणि प्रवासाच्या बदलत्या ट्रेंडमुळे भारत पुढील वर्षांमध्ये आध्यात्मिक प्रवासाचे केंद्र राहण्याची शक्यता आहे.

# हिमालयाची सावली; त्यागमूर्ती माता रमाई

आज ७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!




## राशीभविष्य

- **मेष** : गैरसमजातून वाद-विवाद संभवतात. माता-पित्याची चिंता राहील. नोकरीत सन्मानाचे योग आहेत.
- **वृषभ** : व्यवसायात मोठी प्राप्ती होईल. नोकरीच्या प्रयत्नात यश येईल. सार्वजनिक क्षेत्रात विचारानं रहावं.
- **मिथुन** : पूर्वीच्या गुंतवणुकीचे उचित लाभ घेता येतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. प्रकृती सांभाळा.
- **कर्क** : डोळ्यांचे विकार संभवतात. वाहनात बिघाड त्रासदायक ठरेल. व्यवसायातील प्राप्तीत वाढ होईल.
- **सिंह** : आर्थिक फसवणूक संभवते. कौटुंबिक कलह वेळीच दूर करावे. व्यवसायात अडचणी येतील.
- **कन्या** : भाग्योदयाचा कालावधी आहे. प्रकृतीच्या तक्रारी दूर होतील. स्थावर, वाहन सौख्य लाभणार आहे.
- **तूळ** : विवाहाच्या प्रयत्नांना यश लाभेल. लहान मुलांबाबत चिंता राहील. सरकारी कामं मनाजोगी होतील.
- **वृश्चिक** : उत्कर्षाच्या संधी लाभतील. मुलाखतीत यश लाभेल. व्यावसायिक कर्जाला चालना मिळेल.
- **धनु** : कामाचा वेग वाढेल. कौटुंबिक सौख्य लाभणार आहे. बँकांची कामं मार्गी लागणार आहेत.
- **मकर** : अचानक धनलाभाचे योग आहेत. खेळाडू, कलावंतांना उत्तम लाभ होईल. पतप्रतिष्ठा वाढणार आहे.
- **कुंभ** : व्यवसायात मोठी गुंतवणूक होईल. आतापर्यंतचे प्रयत्न फलद्रुप होतील. कोर्ट प्रकरणं मार्गी लागतील.
- **मीन** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. छोटा-मोठा प्रवास घडेल. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.

सल्ला मोलाचा

## बॅकलेस कपडे वापरताय?

सध्या बॅकलेस अथवा डिप नेकवाल्या ब्लाऊजची फॅशन आहे. हे पेहराव हटके लूक देऊन जातात. नियमितपणे स्क्रबिंग केल्यास पाठीच्या त्वचेची डेड स्किन निघून आकर्षकता वाढण्यास मदत होते. ✻ लेमन स्क्रब – हा स्क्रब तयार करण्यासाठी सॉल्ट क्रिस्टल लिंबाच्या रसात मिसळा. त्यात ऑलिव्ह ऑईलचे काही थेंब टाका. आता हलक्या हातानं हा स्क्रब पाठीवर चोळा. यामुळे पाठीवरची सगळी धूळ आणि डेड स्कीनचा लेअर निघून जाईल. ✻ कॉफी स्क्रब – मूठभर कॉफीच्या बिया आणि ब्राऊन शुगर एकत्र बारीक करून घ्या. लावण्याआधी यात एक चमचा मध आणि एक चमचा ऑलिव्ह ऑईल मिसळा. या स्क्रबनं पाठ स्वच्छ करा. ✻ ऑरेंज आणि शुगर स्क्रब – गुलाबाच्या पाकळ्या, संत्र्याच्या सुकलेल्या साली आणि साखर एकत्र बारीक करून घ्या. वापरण्याच्या आधी या मिश्रणात मध आणि ऑलिव्ह ऑईल मिसळा. पाठीच्या त्वचेसाठी हा उत्तम स्क्रब आहे. ✻ कॉफी आणि अल्मड स्क्रब – एक कप कॉफी, एक चमचा मीठ आणि एक चमचा दालचिनी पावडर एकत्र करा. वापरण्याआधी त्यात बदाम तेलाचे काही थेंब मिसळा. यात अन्य औषधी तेलांचा वापरही करता येईल. हे मिश्रणही पाठीसाठी उत्तम स्क्रबचं काम करतं.

## ७ फेब्रुवारी

दिनविशेष

- १९३७ : १९१२ चं नोबेल मिळवणारे अमेरिकी मुत्सदी एलिहू रूट यांचं निधन.
- १९९२ : भारतामध्ये तयार झालेली शक्ती ही पहिली पाणबुडी नौदलात दाखल.
- २०१३ : 'व्हीआयपीं' ऐवजी महिलांना सुरक्षा द्या, सर्वोच्च न्यायालयाचे बोल.
- २०१४ : ज्येष्ठ उद्योगपती आणि आरबीजी समुहाचे अध्यक्ष रमेश भालचंद्र गरवारे यांचं निधन.
- २०१६ : मुंबईतील २६/११ हल्ल्यातील आरोपी डेव्हिड हेडलीची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उच्च न्यायालयात साक्ष.

महत्त्वपूर्ण काही...

## आता स्मार्ट इन्शुलिन

आपल्या देशात मधुमेहींचं वाढतं प्रमाण ही मोठी चिंताजनक बाब ठरत आहे. या संदर्भात सातत्यानं संशोधन सुरू आहे. टाईप वन मधुमेहींच्या शरीरात इन्शुलिन नैसर्गिकरित्या तयार होत नाही किंवा त्यांचं शरीर नैसर्गिकरित्या तयार झालेल्या इन्शुलिनचा वापर करू शकत नाही. त्यामुळे त्यांना इन्शुलिनच्या इंजेक्शनवर अवलंबून राहावं लागतं. अशा रूग्णांचा त्रास कमी करण्यासाठी 'मॅसाच्युसेट्स इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी'च्या संशोधकांनी प्रयोगशाळेत स्मार्ट इन्शुलिनचा शोध लावला. नेहमीच्या इन्शुलिनवर रासायनिक प्रक्रिया करून हे स्मार्ट इन्शुलिन तयार करण्यात आलं. हे आठवड्यातून एकदा घेतलं तरीही टाईप वन मधुमेहींच्या रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात राहण्यात मदत होईल, अशी शास्त्रज्ञांना आशा आहे. रक्तातली साखरेची पातळी वाढली की स्मार्ट इन्शुलिन सुरू होईल आणि ती नियंत्रणात आली की ते बंद होईल अशा प्रकारे याची रचना करण्यात आली आहे. टाईप वन मधुमेहींच्या दृष्टीने हा महत्त्वाचा शोध अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

## पंचांग

**शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. १०, नक्षत्र : रोहिणी
चंद्रराशी : वृषभ, ऐंद्र योग,
सूर्योदय : ७.१०, सूर्यास्त : ६.३४

## फॉरवर्डस

कधी कधी केवळ आठवणींची सोबतही महत्त्वाची ठरते.
**रख लो दिलमें संभालकर थोडी सी यादे हमारी,**
**रह जाओगे जब तन्हा...**
**बहुत काम आयेंगे हम!**

आरोग्यमंत्र

## गिळताना त्रास होतोय?

आरोग्यविषयक काही समस्या सर्वसाधारण मानल्या जातात. याच कारणांमुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष होण्याचीही शक्यता असते. गिळताना त्रास होणं ही अशीच सर्वसाधारण समस्या असली तरी ते जंतूसंसर्ग किंवा ॲलर्जीचं लक्षण असू शकतं. गिळताना तीव्र स्वरूपाच्या वेदना होत असतील किंवा खाताना, पिताना, श्वास घेताना अडथळे येत असतील तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. सर्दी, फ्लू, जुनाट कफ, घशाचा जंतूसंसर्ग, टॉन्सिल्स ही यामागची सर्वसाधारण कारणं असू शकतात. मानेजवळ आलेली सूज, घशाला दुखापत होणं, कानांचा जंतूसंसर्ग, मोठ्या आकाराच्या गोळ्या घेणं, वेफर्स किंवा इतर पदार्थ चुकीच्या पद्धतीने गिळणं यामुळे काही काळासाठी गिळायला त्रास होऊ शकतो.

गिळताना वेदना होत असतील तर काही गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यात छातीचा जंतूसंसर्ग, बॅक्टेरिया किंवा विषाणूंमुळे झालेल्या जंतूसंसर्गाने गंभीर स्वरूप धारण करणं, तोंडाची चव जाणं, मानेला सूज आल्याने डोक्याच्या हालचालींवर मर्यादा येणं, गिळताना वेदना होण्यासोबत जंतूसंसर्ग झाला तर ताप, थंडी, डोकेदुखी, कोरडा खोकला, घाम येणं, टॉन्सिल्स लाल होणं अशी लक्षणं दिसू शकतात. लहान मुलांना गिळताना तसंच श्वास घ्यायला त्रास होणं, घशाला सूज अशी लक्षणं दिसली तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. प्रौढांमध्ये तोंड उघडायला त्रास होणं, गिळायला त्रास होणं, घशात तीव्र स्वरूपाच्या वेदना, श्वास घ्यायला त्रास ही लक्षणं असतील तर डॉक्टरांकडे जायला हवं.



वाचा तर खरं

हील्स आणि टाय या ॲक्सेसरीज व्यक्तिमत्त्वाला डौल देणाऱ्या आहात. याच्या शोधाच्या कथाही रंजक आहेत. पूर्वी इराणी सैन्य घोड्यांवरुन युद्धभूमीवर जात असे. तेव्हा कमी उंचीमुळे काही समस्या उद्भवत असत. तेव्हा १७०१ मध्ये उंच टाचेच्या बुटांचा शोध लागला. कालांतराने अशी पादत्राणे महिलांमध्ये लोकप्रिय झाली. टाय अथवा बो ची सुरुवातदेखील सैनिकांनीच १६६० मध्ये केली. फ्रान्समधील सैनिकांनी टाय बांधण्यास सुरुवात केली. नंतर तेथील श्रीमंत लोकांनीही त्याचा अवलंब सुरू केला. आहे ना रंजक कथा?

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# विकास कामे, प्रकल्पांचे ई-भूमिपूजन व लोकार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी चिंचवड :** मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड, म्हाळुंगे औद्योगिक पोलीस संकुल व पोलीस विश्रामगृह देहुरोड, पुणे पोलीस अधीक्षक या इमारतींचा भुमीपूजन तसेच प्रेमलोक पार्क, चिंचवड येथील पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय मधील शिवनेरी सभागृहाचे उद्घाटन करण्यात आले. पिंपरी येथील भूखंडावरील मध्यवर्ती अग्निशामक केंद्र आणि अग्निशामक प्रबोधिनी इमारत, आकुर्डी प्राधिकरण येथील हेडगेवार भवनजवळील अग्निशमन केंद्र, पवना नदीवरील मामुर्डी ते सांगवडे दरम्यान जोडणाऱ्या पुलाच्या कामाचे भूमीपूजन तसेच मधुबन हॉटेल ते इंदिरा रोड, २४ मी. डी.पी रस्ता, सिल्व्हर स्पून हॉटेल ते इंदिरा रोड १८ मीटर डी.पी रस्ता तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणाऱ्या वाकड शिवेपर्यंतचा १८ मीटर रुंदीच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

स्मार्ट सिटीच्या वतीने जीआयएस आधारित ईआरपीअंतर्गत कोअर ॲप्लिकेशन (सॅप). नॉन कोअर ॲप्लिकेशन, ई-ऑफिस (डीएमएस) आणि भौगोलिक माहिती प्रणालीमध्ये विकसित केलेल्या संगणक प्रणाली, तालेरा रुग्णालय नवीन इमारत, शहरातील विविध ठिकाणी 'वेस्ट टू वंडर'टाकाऊ वस्तूंपासून निर्मित केलेल्या टिकाऊ कलाकृती, महापालिकेच्या विविध प्रशासकीय इमारतीवर बसविण्यात आलेल्या रुफ टॉप सोलर प्रणालीचे लोकार्पण तसेच सिटी हब फॉर डेटा अँड कम्युनिकेशन उपक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे स्वयंचलित होर्डिंग शोध व सर्वेक्षण प्रणाली उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्यावतीने मुलांना गुन्हेगारी वृत्तीपासून दूर ठेवण्यासाठी दिशा उपक्रमाअंतर्गत घेण्यात आलेल्या फुटबॉल स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान करण्यात आले. सायबर गुन्हेगाराचा तपास करणाऱ्या तसेच दहशतवाद विरोधी पथकातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

श्री. सिंह यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत करण्यात येणारी विविध विकासकामे आणि प्रकल्पाबाबत माहिती दिली. तर श्री. चोबे आणि श्री.देशमुख यांनी नवीन इमारतीबाबत प्रास्तविकात माहिती दिली. उपस्थित मान्यवरांचे आभार अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी यांनी मानले.



# आर्थिक विवंचनेतील रक्षकांवर उपासमारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** परिवहन खात्याच्या जिवावर वाहनांची चाके रस्त्यावर धावतात. पण, शासनाच्या निष्काळजीपणामुळे परिवहन कार्यालयाच्या सुरक्षेची जबाबदारी असनाऱ्यांचे संसार मात्र, रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे. त्याचे झाले ते असे, पिंपरी-चिंचवड परिवहन कार्यालयाच्या सुरक्षेची मदार खांद्यावर पेलणाऱ्या सुरक्षा रक्षकांचे वेतन तब्बल तीन वर्षांपासून रखडले आहे. त्यामुळे मोठ्या आर्थिक विवंचनेतील त्या रक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे. संसाराचा गाढा हाकण्यासाठी पगार द्या हो अशी आर्त हाक ते देत आहेत. मोशी प्राधिकरणातील पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मागणीनुसार शासनाच्या पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने तीन वर्षांपूर्वी परिवहन कार्यालयाच्या सुरक्षिततेसाठी खाजगी तत्वावर चार सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली होती.

### महागाईच्या जमान्यात आर्थिक पिळवणूक

● मार्च २०२२ पासून आजपर्यंत तब्बल तीन वर्षांपासून ते रक्षक वेतानापासून वंचित आहेत. त्यामुळे कष्ट करूनही परिवहन शासनाच्या जबाबदार सर्वच विभागाकडून त्यांची सध्यातरी आर्थिक पिळवणूक होतं आहे. महागाईच्या जमान्यात त्यांची मोठी थट्टा सुरु असल्याचा आरोप होतोय.

# विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता कौशल्यांचा विकास व्हावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या बाबूरावजी घोलप महाविद्यालयात संस्थेचे संस्थापक कै बाबूरावजी घोलप साहेब स्मृती सप्ताहानिमित्त वाणिज्य विभाग आयोजित 'वाणिज्य उद्योजक मेळावा' आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी स्व. राजीव गांधी प्रतिष्ठान, पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष संदेश नवले, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संगीता जगताप, उपप्राचार्या व वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. वंदना पिंपळे, कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. अमृता इनामदार आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचा प्रमुख हेतू विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता कौशल्यांचा विकास व्हावा हा होता. सदर कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक संदेश नवले यांनी विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास व्हावा यासाठी नेतृत्व, संवाद कौशल्य, धोका पत्करण्याची तयारी इत्यादी बाबी अंगीकारणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ संगीता जगताप यांनी वस्तू /सेवांच्या गुणवत्तेसोबतच नाविन्याचा ध्यास आणि स्पर्धकांचा अभ्यास केल्याशिवाय आपला व्यवसाय यशस्वी होऊ शकत नाही असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. वंदना पिंपळे यांनी नवुद्योजक घडण्यासाठी वस्तू / सेवांचा वाजवी दर, वेळेचे व्यवस्थापन, समस्या निराकरण कौशल्य, सांघिक कौशल्य अंगीकारणे आवश्यक आहे असे सांगितले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंग महाविद्यालयीन विकास अधिकारी डॉ. अर्जुन डोके, परीक्षा अधिकारी डॉ. नरसिंग गिरी, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विजय घाडगे, शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. विद्या पाठारे, वनस्पती शास्त्र विभागातील डॉ. मनीषा शेवाळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वाणिज्य विभागातील डॉ मनीषा त्र्यंबके, प्रा सुषमा सोनार, डॉ. रश्मी भूयान, प्रा अरबाज सय्यद, प्रा प्रवीण खाडे, प्रणित पावले, अवधेश यादव, श्रीमती मालन साळुंके यांनी परिश्रम घेतले. सदर स्टॉल्सला महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी भेट दिली, विविध पदार्थांचा आस्वाद घेतला आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

**वाणिज्य उद्योजक मेळावा** — कै बाबूरावजी घोलप साहेब स्मृती सप्ताहानिमित्त

### खाद्यपदार्थांची रेलचेल; २३ प्रकारचे स्टॉल्स

● या उपक्रमाअंतर्गत वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी इडली चटणी,कोल्ड कॉफी, चाट, मोमोस, सँडविच चे वेगवेगळे प्रकार, फ्राईड राईस, डोसा, चटणी, केक, मेथीचे पराठे, ढोकळा, तसेच मोत्यापासून तयार केलेल्या वस्तू इत्यादी विविध प्रकारचे स्टॉल लावलेले होते. कार्यक्रमामध्ये पदवी आणि पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना २३ प्रकारचे स्टॉल्स लावलेले असून त्यात ६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



# २८ वर्षांनंतर घंटागाडी चा 'आव्वाज'

## ३५३ सफाई कर्मचारी होणार कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेत सन १९९७ पासून कार्यरत असलेल्या घंटागाडी सफाई कामगारांच्या लढ्याला अठ्ठावीस वर्षांनंतर यश आले आहे. या कामगारांना कायम करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाने २० ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निकालाविरोधात महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे ३५३ सफाई कामगारांचा महापालिकेत कायम होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिकेने १९९७ ते २००० पर्यंत ३५३ कामगारांची सफाई कामासाठी नियुक्ती केली. मात्र या सर्वच कामगारांना महापालिकेने कामगार म्हणून नियुक्ती न देता ठेकेदार म्हणून नियुक्ती दिली. हे सर्वच कामगार ठेकेदार म्हणूनच महापालिकेच्या घंटागाडीवर स्वतःच काम करत आहेत. ठेकेदार म्हणून नियुक्त असल्याने महापालिकेत कायम करता येत नसल्याचे महापालिकेद्वारे सांगण्यात आल्यावर या कर्मचाऱ्यांनी कामगार संघटनेद्वारे पुण्याच्या औद्योगिक न्यायालयात १९९९ ला दावा दाखल केला.

३० जानेवारी २०२३ ला औद्योगिक न्यायालयाने घंटागाडी कामगारांना महापालिकेत कायम करण्याचा दुबार निकाल दिला. या विरोधात पुन्हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उच्च न्यायालयात दावा दाखल केला. उच्च न्यायालयाने २० ऑगस्ट २०२४ रोजी घंटागाडी कामगारांच्या बाजूने निर्णय देत त्यांना कायम करण्याचा आदेश महापालिकेला दिला होता. मात्र या निकाला विरोधातही पुन्हा महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला होता.

संग्रहित छायाचित्र



पिंपरी-चिंचवड महापालिकेने १९९७ ते २००० पर्यंत ३५३ कामगारांची सफाई कामासाठी नियुक्ती केली. मात्र या सर्वच कामगारांना महापालिकेने कामगार म्हणून नियुक्ती न देता ठेकेदार म्हणून नियुक्ती दिली.

### कायम झाल्यास कामगारांना लाभ

● घंटागाडी कामगारांना पेन्शन योजना लागू होणार.
● लाडपागे योजनेअंतर्गत निवृत्त झालेल्या सफाई कामगारांच्या मुलांना महापालिकेत नोकरी मिळणार.
● महापालिकेच्या वैद्यकीय सुविधेचा लाभ घंटागाडी कामगारांना घेता येणार.
● कायम असलेल्या कामगारांसाठीचे इतर लाभही या कामगारांना मिळणार.

### २८ वर्षांनंतर लढ्याला यश

● या दाव्यासही पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघ, पीसीएमसी युनियन आणि कामगारांनी विरोध करत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र महापालिकेचा हा दावा सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी ३ फेब्रुवारी २०२५ रोजी फेटाळल्याने घंटागाडी सफाई कामगारांना महापालिकेला २८ वर्षांनंतर महापालिकेत कायम करावे लागणार आहे.

# टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता सील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेने एक लाखांपुढील थकबाकीदारांच्या निवासी आणि बिगरनिवासी अशा जप्त केलेल्या ४३ मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया दोन वेळा राबविली. मात्र, दोन्ही वेळा या मालमत्तांच्या मालकांनी आणि लिलावात खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी महापालिकेशी कोणत्याही प्रकारचा संपर्क केला नाही. त्यामुळे २२१ कोटी ५४ लाखांच्या मालमत्तांसाठी तिसऱ्यांदा लिलाव राबविण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावली आहे. तिसऱ्या लिलावात मालक अथवा मालमत्ता खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी प्रशासनाशी संपर्क न साधल्यास या मालमत्ता नाममात्र बोलीवर महापालिकेकडे जमा करण्यात येणार आहेत.

वारंवार आवाहन करूनही कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता करसंकलन कार्यालयाने लाखबंद (सील) करून जप्त केल्या आहेत. त्यानंतरही मालमत्ताधारकांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने महापालिकेने त्या मालमत्तांचा लिलाव जाहीर केला होता. ४३ मालमत्तांची यादी प्रसिद्ध केली. त्यात २३ निवासी व २० बिगरनिवासी मालमत्ता आहेत. मालमत्ताधारकांकडे एक ते आठ लाखांपर्यंतची थकबाकी आहे. त्यात प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक, संस्था, व्यक्ती यांच्या निगडी, आकुर्डी, चिंचवड, वाल्हेकरवाडी, पिंपरी भाजी मंडई, मोरवाडी, दापोडी, कासारवाडी, चोविसावाडी, चऱ्होली, वडमुखवाडी, संतनगर, मोशी, किवळे, मामुर्डी, रावेत, दिघी, बोपखेल, वाकड येथील मालमत्ता आहेत.

महापालिकेने ४३ मालमत्तांचे लिलाव मूल्य जाहीर केले होते. निवासी, बिगर निवासी मालमत्तांचे मूल्य एक कोटीपर्यंत आहे.

पान १ वरून

## दादांचा रौद्रावतार!

व्यक्त केली. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून म्हाळुंगे औद्योगिक पोलीस संकुल बांधण्यात आले आहे. याचा मनस्वी आनंद आहे, असे सांगून ते म्हणाले, उद्योग क्षेत्राच्या वाढीसाठी राज्य शासन प्रयत्न करत असताना उद्योगधंद्याला राज्यात त्रास होता कामा नये. उद्योजकांकडून प्राप्त तक्रारीची दखल घेऊन कडक कारवाई करावी. गुन्हेगारी वृत्तीला आळा घालण्याकरिता मकोका सारखी कारवाई केली पाहिजे.

# परदेशीय स्थलांतर सुरक्षित करणार

सध्या संबंधित मंत्रालयांशी सल्लामसलत करण्याच्या टप्प्यात असून लवकरच तो जनतेच्या अभिप्रायासाठी उपलब्ध करून देण्यात येईल, असे मंत्रालयाने समितीला कळवले आहे. या विधेयकातील महत्त्वाच्या बाबींवर सल्लामसलत करण्याच्या गरजेवर समितीने भर दिला असून जागतिक स्थलांतराचे बदलते वास्तव प्रतिबिंबित करणाऱ्या स्थलांतर कायद्यातील सुधारणा वर्षभरात पूर्ण करण्याची विनंती केली आहे.

अमेरिकेतील बेकायदा स्थलांतरितांवर कारवाई चा एक भाग म्हणून १०४ भारतीय नागरिकांना अमेरिकेत परत पाठविण्यात आले आहे. यामध्ये हरियाणा आणि गुजरातमधील ३३, पंजाबमधील ३०, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातील प्रत्येकी ३ आणि चंदीगडमधील २ जणांचा समावेश आहे. याशिवाय १९ महिला आणि १३ अल्पवयीन मुलांचाही या गटात समावेश असून त्यात एक चार वर्षांचा मुलगा आणि दोन मुली (वय पाच व सात वर्षे) यांचा समावेश आहे.


## काँग्रेसकडून सबका साथची अपेक्षा चुकीची: मोदींचा घणाघात


एकाच गोष्टीला हाताळण्यातच खर्ची पडले आहे, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.आमचे विकासाचे मॉडेल 'राष्ट्र प्रथम'... २०१४ नंतर देशाने आम्हाला सेवा करण्याची संधी दिली. मी देशातील जनतेचा आभारी आहे, त्यांनी आम्हाला सलग तिसऱ्यांदा सेवा करण्याची संधी दिली आहे. 'राष्ट्र प्रथम' हे आमचे विकासाचे मॉडेल आहे. देशातील जनतेने आमच्या विकास मॉडेलची चाचणी घेतली आहे, ते समजून घेतले आहे आणि पाठिंबा दिला आहे, असेही पंतप्रधान यावेळी म्हणाले. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सहाव्या दिवशी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या धन्यवाद प्रस्तावावर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यसभेत बोलले. यावेळी त्यांनी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यासह काँग्रेसवर टीका केली.

## मुख्यमंत्र्यांची कुरघोडी

आखत्यारीमध्ये घेण्याचा पवित्रा मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे.
गेल्या काही महिन्यांपासून परिवहन मंत्री यांचे काही निर्णय आणि परिवहन खात्यामध्ये वाढत असलेला असंतोष चर्चेमध्ये होता.
अनेक बाबतीत भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यानंतर परिवहन मंत्र ने त्याबाबत स्पष्ट भूमिका घेतली नाही त्यामुळे राज्यात नाराजी वाढत होते.
या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

## सोन्याचा नवा उच्चांक





खरेदीचा समावेश आहे, ४९७४ टनांच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचली. त्यामुळं एकूण मूल्य ३८२ अब्ज डॉलर इतक झालं. अधिकृत अहवालानुसार, सलग तिसऱ्या वर्षी, केंद्रीय बँकांची खरेदी १००० टनांपेक्षा जास्त झाली. कारण, चौथ्या तिमाहीत खरेदी लक्षणीयरीत्या वाढली. ज्यामुळं मध्यवर्ती बँकांची वार्षिक एकूण रक्कम १०४५ टन झाली.

## क्रीडा समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचे निधन

समीक्षक घडवला. द्वारकानाथ संझगिरी हे सिव्हिल इंजिनीअर होते. मुंबई महापालिकेत ते उच्च पदावर कार्यरत होते. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी १२ वाजता शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. अनेक दिग्गज मंडळीसोबत त्यांनी क्रिकेटमधील आठवणी, किस्से आणि प्रसंग यावर कार्यक्रम केले.

महाराष्ट्राच्या क्रिकेट प्रेमाची ख्याती जगभर पोहोचवणारा आणि मिरवणारा आवाज या खेळातील संज्ञेप्रमाणेच अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे द्वारकानाथ संझगिरी आज निमाले, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी द्वारकानाथ संझगिरी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोकसंदेशात मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात, महाराष्ट्राचे क्रिकेट प्रेम सर्वश्रुत आहे. पण या प्रेमाची जगभर ख्याती मिरवण्याची किमया संझगिरी यांनी साधली. क्रिकेट सामन्यांचे ओघवत्या शैलीतील त्यांच्या वृत्तांकनांचा चाहता वर्ग मोठा आहे. त्यांचे क्रिकेट समीक्षण रसरशीत आणि तितकेच रोमांचक असे. क्रिकेटशिवाय नाटक, चित्रपटांचे लेखन यांसह अनेकविध क्षेत्रात त्यांनी मुशाफिरी केली. क्रिकेट या खेळावर त्यांनी अखेरपर्यंत निस्सीम प्रेम केले. त्यांच्या निधनाने एक उत्कट क्रीडाप्रेमी, क्रिकेट विषयीच्या लेखन-समीक्षणाने मराठी साहित्यात मोलाची भर घालणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेलंय. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांचे चाहते, कुटुंबीयांच्या आम्ही दुःखात सहभागी आहोत, असे नमूद करून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक, लेखक द्वारकानाथ संझगिरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## पवार-भुजबळ मतभेदाचे अंतर कमी होतेय

निमंत्रण उशिरा दिल्याबद्दल त्यांनी दिलगिरी देखील व्यक्त केली असेहीआज सांगितले .
छगन भुजबळ यांनी पक्ष आणि पवार यांच्या विरोधामध्ये वक्तव्य करणे थांबवलेले असून या दोघांमध्ये आता सुसंवाद होत असल्याचे दिसून येत आहे.

# ज्येष्ठ नागरिक कलावंतांचा सत्कार




**पिंपरी** चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषालीताई मरळ तसेच पीसीएमसी समाज विकास विभागातील संगीता इंद्राक्षे आणि विशाल शेंडगे यांच्या हस्ते सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह स्वीकारताना बाळकृष्ण चौधरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे सौदागर :** पिंपरी - चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने घेण्यात आलेल्या " संगीत सरीता " या गीत गायन स्पर्धेत पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे सदस्य बाळकृष्ण चौधरी आणि शशिकांत लोकरस यांच्यासह विशेष प्राविण्य मिळवलेल्या २६ ज्येष्ठ कलावंतांना प्रशस्तीपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. वल्लभनगर येथील मंगलसेन बहेल विरंगुळा केंद्र येथे बुधवार दि. ५ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषालीताई मरळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागातील अनिकेत सातपुते, संगीता इंद्राक्षे , विशाल शेंडगे तसेच साई हॉस्पीटलचे डॉ. रवी केरळकर आणि डॉ. गुरमीत कौर उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ नागरिक महासंघाचे ईश्वरलाल चौधरी, अरुण बागडे, हेमचंद जावळे, शांताराम सातव, बाळकृष्ण गायकवाड, माधव अडसुळे, सुनिता कोकाटे, विजय शिनकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. स्पर्धेतील यशस्वी सहभागाबद्दल चौधरी आणि लोकरस या दोन ज्येष्ठ कलावंतांचे पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने सचिव सखाराम ढाकणे तसेच अशोक येळंमकर आणि प्रेमलाल लांजेवार यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून विशेष अभिनंदन केले.

### २६ ज्येष्ठ कलावंतांना प्रशस्तीपत्र आणि स्मृतीचिन्ह

● पिंपरी - चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने घेण्यात आलेल्या " संगीत सरीता " या गीत गायन स्पर्धेत पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे सदस्य बाळकृष्ण चौधरी आणि शशिकांत लोकरस यांच्यासह विशेष प्राविण्य मिळवलेल्या २६ ज्येष्ठ कलावंतांना प्रशस्तीपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.



#रा

## At a Glance

### आचारसंहितेच्या उल्लंघनाचे हजारांहून अधिक गुन्हे

**नवी दिल्ली :** दिल्लीत आचारसंहितेच्या उल्लंघनाचे १,०९० हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आचारसंहितेची अंमलबजावणी झाल्यानंतर ७ जानेवारी ते ५ फेब्रुवारी या कालावधीत हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### सिंध प्रांतातील ६० हून अधिक भाविक सहभागी

**महाकुंभ नगर :** सोशल मीडियावर पाहिलेल्या महाकुंभाच्या भव्यतेने भारावून गेलेल्या पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील ६८ हिंदू भाविकांचा समूह गुरुवारी या पवित्र कुंभमेळ्यात दाखल झाला. त्यापैकी जवळपास ५० जणांचा हा महाकुंभाचा पहिलाच अनुभव आहे.

### काही तासांतच नववधू फरार

**हमीरपूर (हिमाचल प्रदेश) :** लग्नाच्या काही तासांतच वधू पैसे आणि दागिने घेऊन फरार झाल्यानंतर साही गावातील एका तरुणाने लग्नात फसवणूक केल्याची तक्रार पोलिसांत दाखल केली आहे. आपल्यासोबत फसवणूक झाल्याचा आरोप करत वधू जितेश शर्मा याने बलदेव शर्मा नावाच्या व्यक्तीने लग्नासाठी त्याच्याकडून १ लाख ५० हजार रुपये घेतल्याचा आरोप केला आहे.

# हद्दपारीची प्रक्रिया नवीन नाही...

## परराष्ट्रमंत्री जयशंकर यांची प्रतिक्रिया, यापूर्वीही झाली घुसखोरांची पाठवणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**नवी दिल्ली :** बेकायदेशीर स्थलांतरितांना भारतात परत आणण्याबाबत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी प्रथमच प्रतिक्रिया दिली आहे. बेकायदा नागरिकांना परत घेण्याची जबाबदारी देशांची आहे, असे ते म्हणाले. अमेरिकेत बेकायदा स्थलांतरित घोषित करण्यात आलेले १०० हून अधिक भारतीय बुधवारी पंजाबमधील अमृतसरला परतले. विरोधक ही भारतात परतण्याच्या मार्गांना कडाडून विरोध करत आहेत. आपले नागरिक परदेशात बेकायदा वास्तव्यास असल्याचे आढळल्यास त्यांना परत घेण्याची जबाबदारी सर्व देशांची आहे. हद्दपारीची प्रक्रिया नवीन नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. अमेरिकेतून लष्करी विमानाने १०४ भारतीय परतले आहेत. हे विमान बुधवारी श्री गुरु रामदास जी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले.

परराष्ट्रमंत्री म्हणाले, 'अमेरिकेकडून हद्दपारीचे काम इमिग्रेशन अँड कस्टम एन्फोर्समेंट (आयसीई) करत आहे. आयसीई ज्या एसओपीवर काम करते ते २०१२ पासून लागू आहेत. ती बांधली गेल्याचे सांगितले जाते. आम्हाला आयसीईकडून सांगण्यात आले आहे की महिला आणि मुलांना बांधले गेले नव्हते.'

काँग्रेस खासदार रणदीप सिंह सुरजेवाला यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना परराष्ट्र मंत्री म्हणाले की, आम्हाला माहिती आहे की काल १०४ लोक भारतात परतले आहेत. आम्हीच त्यांच्या राष्ट्रीयत्वाची पुष्टी केली आहे... हा नवा मुद्दा आहे, असे समजू नये. हा याआधी घडलेला घटना आहे.

परराष्ट्रमंत्र्यांनी २००९ ते २०२५ या काळात पाठवलेल्या लोकांची माहितीही सभागृहात दिली. २००९ मध्ये ७३४, २०१० मध्ये ७९९, २०११ मध्ये ५९७, २०१२ मध्ये ५३०, २०१३ मध्ये ५५०, २०१४ मध्ये ५९१, २०१५ मध्ये ७०८, २०१६ मध्ये १३०३, २०१७ मध्ये १०२४, २०१८ मध्ये ११८०, २०१९ मध्ये ११८०, २०१९ मध्ये २०४२ असे हद्दपार करण्यात आले आहे.

अमेरिकेत बेकायदेशीररित्या राहणाऱ्या भारतीयांना ज्या पद्धतीने हद्दपार केले जात आहे, त्याबद्दल विरोधी पक्षाच्या अनेक खासदारांनी गुरुवारी सरकारवर टीका केली आणि स्थलांतरितांना मिळणाऱ्या वागणुकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. प्रवासादरम्यान त्यांना हात-पाय हथकडी लावण्यात आली होती आणि अमृतसर विमानतळावर उतरल्यानंतरच ती काढली गेली, असा दावा निर्वासितांनी केला आहे.

# गुंतवणूकदारांची सावध भूमिका, बाजारात घसरण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ट्रेड वॉरची चिंता कायम असताना आरबीआयच्या पतधोरण निर्णयापूर्वी गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतली. परिणामी भारतीय शेअर बाजारात आज गुरुवारी (दि. ६) सलग दुसऱ्या दिवशी घसरण झाली. सेन्सेक्स २१३ अंकांनी घसरून ७८,०५८ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक ९२ अंकांच्या घसरणीसह २३,६०३ वर स्थिरावला.

आज विशेषतः रियल्टी आणि एफएमसीजी शेअर्समध्ये विक्री दिसून आली. निफ्टी रियल्टी २.१ टक्के घसरला. बीएसई मिडकॅप ०.८ टक्के घसरला. तर स्मॉलकॅप सपाट पातळीवर बंद झाला.

बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज ६ फेब्रुवारी रोजी २.०५ लाख कोटींनी कमी होऊन ४२५.१४ लाख कोटींवर आले. ५ फेब्रुवारी रोजी एकूण बाजार भांडवल ४२७.१९ लाख कोटींवर होते. याचाच अर्थ गुंतवणूकदारांच्या संपत्तीत आज २.०५ लाख कोटींची घट झाली.

सेन्सेक्सवरील ३० पैकी १० शेअर्स आज हिरव्या रंगात बंद झाले. तर २० शेअर्स घसरणीसह बंद झाले. सेन्सेक्सवर भारती एअरटेल, टायटन, एनटीपीसी, एसबीआय, आयटीसी, टाटा स्टील, पॉवर ग्रिड हे शेअर्स १ ते २ टक्के घसरले. तर अदानी पोर्ट्स, इन्फोसिस, टेक महिंद्रा, ॲक्सिस बँक हे शेअर्स तेजीत राहिले.

निफ्टीवर ट्रेंटचा शेअर्स ८ टक्के घसरला. त्याचबरोबर भारत इलेक्ट्रॉनिक्स, भारती एअरटेल, टायटन, ओएनजीसी हे शेअर्स २ ते ३ टक्के घसरले. तर सिप्ला, अदानी पोर्ट्स, आयटीसी हॉटेल्स, डॉ. रेड्डीज, एचडीएफसी लाईफ हे शेअर्स १ ते २.५ टक्क्यांपर्यंत वाढले.

आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या पहिल्या पतधोरण निर्णयाकडे गुंतवणूकदारांचे लक्ष लागले आहे. ते उद्या पतधोरण जाहीर करतील. हा निर्णय बाजाराची पुढील दिशा निश्चित करू शकतो, असे बाजारातील विश्लेषकांचे म्हणणे आहे. आरबीआयकडून रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची कपात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# काश्मीर मुक्त करणार; हाफिज सईदच्या मुलाची दर्पोक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** २००८ च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोटांचा सूत्रधार दहशतवादी हाफिज सईदचा मुलगा तल्हा याने काश्मीर मुक्त करण्याची दर्पोक्ती केली आहे. पाकिस्तानातील लाहोर मध्ये एका रॅलीदरम्यान तल्हा यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दलही वादग्रस्त वक्तव्य केले होते. हाफिज सईद सध्या पाकिस्तानच्या तुरुंगात आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, ५ फेब्रुवारी रोजी लाहोरमध्ये झालेल्या सभेत तल्हा याने काश्मीरला कोणत्याही किंमतीवर भारतापासून मुक्त करण्याचा निर्धार केला. हाफिज याची तुरुंगातून सुटका करावी, अशी मागणीही त्यांनी केली. जनतेला संबोधित करताना तल्हा याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल अपशब्द उच्चारले. त्याचबरोबर पंतप्रधान मोदींवर आपल्या वडिलांची प्रतिमा मलिन केल्याचाही आरोप त्याने केला.



पाकिस्तान सरकारने आपल्या धोरणाचा फेरविचार करावा आणि वडिलांची सुटका करावी, अशी मागणी तल्हा याने केली आहे. विशेष म्हणजे, पाकिस्तानात २०२४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत तल्हा याने लाहोरच्या एनए १२२ मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्याला पाकिस्तानच्या मरकजी मुस्लीम लीग अर्थात पीएमएमएलने उमेदवारी दिली होती. या पक्षाला हाफिज सईदचा पाठिंबा असल्याचे अहवालात म्हटले आहे. या निवडणुकीत तल्हा याला २०४१ मते मिळाली आणि तो पराभूत झाला.

जमात-उद-दावाचा संस्थापक हाफिज सईद हा २६/११ च्या मुंबई बॉम्बस्फोटांसह भारतातील अनेक दहशतवादी हल्ल्यांचा मास्टरमाइंड मानला जातो. अनेक प्रकरणात त्यांनी ७८ वर्षे पाकिस्तानच्या तुरुंगात काढली आहेत. तसेच २०२२ मध्ये त्याला अतिरिक्त ३१ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती. 2012 मध्ये अमेरिकेने हाफिज सईदवर एक कोटी डॉलरचे बक्षीस जाहीर केले होते.

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाचे स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमेरिकेतून बळजबरीने भारतात पाठवलेल्या बेकायदा स्थलांतरितांवरून भारतात संसदेपासून गल्लीपर्यंत गदारोळ सुरू आहे, तर दुसरीकडे ट्रम्प यांच्या या निर्णयाचे अमेरिकेत कौतुक होत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या दोन आठवड्यांत सुमारे ५,७०० बेकायदा स्थलांतरितांना बळजबरीने देशाबाहेर काढून त्यांच्या देशात पाठविण्यात आल्याची आकडेवारी होमलॅण्ड सिक्युरिटी विभागाने (डीएचएस) जाहीर केली आहे.

माजी राष्ट्राध्यक्षांच्या कारकिर्दीत अमेरिकेतून मोठ्या प्रमाणात बेकायदा स्थलांतरितांची हकालपट्टी झाली आहे, परंतु निवडणुकीत प्रथमच ट्रम्प यांनी बेकायदा स्थलांतर आणि सीमा सुरक्षा हा प्रमुख मुद्दा बनवला आणि सरकार आल्यास त्यांना बळजबरीने हद्दपार करण्याचे आश्वासन दिले.

२० जानेवारी रोजी दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारने आतापर्यंत १२१ देशांमधील ५,६९३ नागरिकांना सक्तीने हद्दपार केले आहे. सीमेवर किती बेकायदा स्थलांतरितांना हद्दपार करण्यात आले आणि किती जणांना अटक करण्यात आली, याची आकडेवारी अमेरिका प्रथमच दररोज सोशल मीडियावर अपडेट करत आहे.

### सर्वात जास्त कारवाई केव्हा?

- डीएचएसच्या आकडेवारीनुसार, ट्रम्प प्रशासनाच्या कार्यकाळात २० जानेवारी ते ३ फेब्रुवारी या दोन आठवड्यांत १२१ देशांमध्ये ५,६९३ नागरिकांना हद्दपार करण्यात आले आहे. माजी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या कार्यकाळात नोव्हेंबर २०२४ पर्यंत निर्वासितांचा मासिक आकडा ४८,९७० होता, जो दर आठवड्याला सरासरी १२,२०० इतका होता. सरकारी आकडेवारीनुसार, जानेवारी २०२१ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत ४६ लाखांहून अधिक लोकांना अमेरिकेतून जबरदस्तीने हद्दपार करण्यात आले. ज्यात मार्च २०२२ मध्ये सर्वाधिक १,४७,०८० लोक होते.
- बायडेन यांच्याआधी ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात एकूण २१ लाख लोकांना हद्दपार करण्यात आले होते. ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात सर्वाधिक मासिक हकालपट्टी ऑक्टोबर २०२० मध्ये झाली होती, जेव्हा ९१,१२० बेकायदेशीर स्थलांतरितांना जबरदस्तीने त्यांच्या मायदेशी परत पाठविण्यात आले होते. त्याचप्रमाणे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या दोन कार्यकाळात एकूण ५३ लाख लोकांना अमेरिकेतून हद्दपार करण्यात आले होते. ओबामांच्या अध्यक्षपदाच्या पहिल्या पाच वर्षांची मासिक आकडेवारी उपलब्ध नाही, परंतु २००९ मध्ये म्हणजे ओबामांच्या कार्यकाळाच्या पहिल्या वर्षी ९,७३,९३७ लोकांना हद्दपार करण्यात आले, जे त्यांच्या एकूण आठ वर्षांच्या कार्यकाळातील सर्वाधिक आहे.



# राऊत यांच्या सल्ल्याची गरज नाही; प्रविण दरेकर यांनी फटकारले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वर्षा निवासस्थानी राहायला का जात नाही, अशा प्रकारचे विधान केले होते. त्याला भाजप विधानपरिषद गटनेते प्रविण दरेकर यांनी प्रत्युत्तर दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संजय राऊत यांच्यासारख्या महान सल्लागाराच्या सल्ल्याची आवश्यकता नाही. ते स्वतः निर्णय घ्यायला सक्षम आहेत. संजय राऊत वास्तुशास्त्रज्ञ किंवा ज्योतिषी असतील त्यांनी तो धंदा करावा. मुख्यमंत्र्यांना सल्ला देण्याच्या फंदात पडू नये, असे प्रविण दरेकर म्हणाले.

माध्यमांशी बोलताना संजय राऊत यांनी केलेल्या वक्तव्याची दरेकर यांनी चिरफाड केली. ते म्हणाले कि, "संजय राऊत दिल्लीत किती जागा लढवताहेत माहित नाही. जिथे आपले अस्तित्व नाही, उमेदवार नाही, आयजीच्या जीवावर बायजी उधार असेच संजय राऊत यांचे चालू आहे. दिल्लीत त्यांचा संबंध काय? पराभव त्यांना समजून आलेला आहे. त्या पराभवाचे विश्लेषण त्यांनी आतापासूनच करायला सुरुवात केलीय. काँग्रेस आणि आपची ते काळजी करताहेत मग शिवसेनेचे काय? त्यांनी उबाठा भक्कम, सक्षम करण्याची काळजी घ्यावी. परंतु ते शरद पवारांसाठी कामं करताहेत, असे राऊत यांच्या वक्तव्यातून दिसून येतेय."

# मोदी यांनी ट्रम्प यांचा प्रचार केला नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत कोणत्याही उमेदवाराचा प्रचार केला नाही, असा आरोप परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी गुरुवारी राज्यसभेत काँग्रेसकडून वारंवार खोटी विधाने केल्याचा आरोप केला.

जयशंकर यांनी राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात हे वक्तव्य केले. काँग्रेस सदस्य सय्यद नसीर हुसेन म्हणाले की, 'पंतप्रधानांनी परदेशात राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत उमेदवाराचा प्रचार केल्याचे आम्ही प्रथमच पाहिले. आता तेथे त्यांचे सरकार स्थापन झाले आहे.' हुसेन अमेरिकेत बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या भारतीयांच्या हद्दपारीचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न करत होते. यावर परराष्ट्रमंत्री जयशंकर म्हणाले की, सदस्य (हुसेन) आपल्या पक्षाच्या भूमिकेखाली खोटे विधान करत आहेत. ते म्हणाले की, पंतप्रधानांनी कोणत्याही उमेदवाराचा प्रचार केला नाही आणि काँग्रेस पक्ष वेळोवेळी अशी विधाने करत आहे.

विशेष म्हणजे विविध राज्यांतून १०४ बेकायदा स्थलांतरितांना घेऊन अमेरिकेचे लष्करी विमान बुधवारी अमृतसरला पोहोचले. डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने बेकायदा स्थलांतरितांवरील कारवाईचा भाग म्हणून हद्दपार केलेल्या भारतीयांची ही पहिलीच तुकडी होती. यामध्ये हरियाणा आणि गुजरातमधील ३३, पंजाबमधील ३०, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातील प्रत्येकी तीन आणि चंदीगडमधील दोन जणांचा समावेश आहे.

## ड्रोन हल्ला...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



खार्किव
युक्रेनमधील खार्किव येथे रशियाने केलेल्या ड्रोन हल्ल्यात युक्रेनचे मोठे नुकसान झाले.

# निंबाळकर बंधूंच्या निवासस्थानी छापे सुरूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** फलटणमधील निंबाळकर बंधूंच्या निवासस्थानी बुधवारी प्राप्तिकर विभागाने धाडी टाकल्यात असून, जवळपास १७ तास चौकशी करण्यात आलीय. सलग दुसऱ्या दिवशी चौकशी सुरूच असल्याची माहिती रघुनाथराजे नाईक-निंबाळकरांनी दिलीय. तपास यंत्रणेवर कोणता दबाव असेल, असं वाटत नाही आणि असला तरी त्यात काहीही सापडू शकत नाही.

त्यांचा रॉंग नंबर लागला आहे. प्रत्येक गोष्टीचा आमच्याकडे हिशेब आहे. हा केवळ एक प्रक्रियेचा भाग असून जे झाले ते चांगलेच झाले. किमान साप म्हणून भुई धोपटणे तरी बंद होईल, अशी प्रतिक्रिया रघुनाथराजे नाईक-निंबाळकरांनी गुरुवारी माध्यमांना दिली.

फलटणच्या निंबाळकर बंधूंच्या मुंबई, पुणे आणि फलटणमधील निवासस्थानी इन्कम टॅक्स विभागान बुधवारी पहाटे धाडी टाकल्या. काल सकाळी सहा वाजता सुरू झालेली चौकशी रात्री १२ वाजेपर्यंत सुरू होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशीही चौकशी सुरूच आहे.

याविषयी बोलताना संजीवराजे नाईक-निंबाळकर यांचे बंधू रघुनाथराजे यांनी ही कारवाई केवळ एक प्रक्रियेचा भाग आहे. तपास यंत्रणेवर कोणाचा दबाव असेल, असं वाटत नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलंय.

# तामिळनाडूत शिक्षकांचे राक्षसी कृत्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कृष्णगिरी :** तामिळनाडूच्या कृष्णागिरीमधील बारगुर येथील शाळेच्या आवारात १३ वर्षीय विद्यार्थीनीवर ३ शिक्षकांनी अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी (डीईओ) तिन्ही आरोपी शिक्षकांना निलंबित केले आहे. तसेच त्यांना लैंगिक गुन्ह्यांपासून बाल संरक्षण कायद्याच्या (पोस्को) विविध कलमांखाली त्यांना अटक केली आहे. संशयित आरोपी शिक्षकांना १५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. अशी माहिती कृष्णगिरीचे जिल्हाधिकारी सी दिनेश कुमार यांनी दिली.

पीडित मुलगी ३ जानेवारीपासून शाळेत येत नव्हती, त्यानंतर शाळेने तिच्या घरी जाऊन प्रत्यक्ष चौकशी केली. त्यानंतर ही घटना उघडकीस आली यानंतर शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मुलीच्या पालकांनी बारगुर ऑल वुमन पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पीडितेला आवश्यक समुपदेशन देण्यात आले आहे आणि प्रकरणाची चौकशी सुरू आहे. पोलिस स्टेशनच्या शिफारशीनुसार, पीडितेच्या पालकांनी बाल सुरक्षा अधिकाऱ्यांशी संपर्क साधला.

# साजित रशिदी यांनी केले भाजपला मतदान

**भाजपच्या नावाखाली मुस्लिम बांधवांमध्ये विरोधी पक्षांकडून भीती निर्माण केले जात आहे, असा आरोप करत मुस्लिम मतदार भाजपला मतदान करत नाहीत, ही समजूत खोटी ठरविण्यासाठी मी भाजपला मतदान केले आहे. मी माझा व्हिडिओही व्हायरल केला आहे, असे ऑल इंडिया इमाम असोसिएशनचे अध्यक्ष साजित रशिदी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभेसाठी बुधवार, ५ फेब्रुवारी रोजी मतदान झाले. यानंतर माध्यमांशी बोलताना ऑल इंडिया इमाम असोसिएशनचे अध्यक्ष साजित रशिदी म्हणाले की, मुस्लिम मतदार भाजपला मतदान करत नाहीत, असा समज विरोधी पक्षांकडून पसरवला गेला आहे. हा समज खोटा ठरवत मी भाजपला मतदान केले आहे. भाजपच्या नावाखाली मुस्लिमांमध्ये भीती निर्माण केली जाते म्हणून मी माझा व्हिडिओही व्हायरल केला आहे.





मी भाजपमध्ये सहभागी झालेलो नाही....

भाजप सत्तेत आल्यास ते मुस्लिमांचे हक्क हिरावून घेतील, अशी भीती विरोधी पक्षांकडून मुस्लिम बांधावांच्या मनावर बिंबवली जात आहे. मी भाजपला मतदान केले याचा अर्थ मी भाजपमध्ये सामील झालो आहे, असे नाही. तसेच मी भाजपला शरण आलो आहे, असेही याचा अर्थ होत नाही. भाजपचे धोरण मुस्लिमांविरोधात असेल तर मी त्याला विरोध करेन, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### ... तर आम्ही भाजपला सवाल करू

- भाजपच्या हाती विकलो गेलो आहे, असा आरोप माझ्यावर होत आहे. मी कोणत्याही भाजप नेत्याला भेटलेलो नाही. माझ्यावर अनेक खटले दाखल आहेत. मी भाजपला मतदान करण्यामागील एकमेव हेतू हा मुस्लिमांच्या मनातून भाजपबाबतची भीती काढून टाकणे आहे. आमच्याविरुद्ध धोरण राबवले गेले तर आम्ही भाजपविरुद्ध सवाल उपस्थित करू, असेही साजित रशिदी यांनी स्पष्ट केले.

» Selected

## पाडेगांव येथील शाळेस आयडीबीआय बँकेकडून संगणक भेट



**नीरा :** पाडेगांव (ता. खंडाळा) येथील जिल्हा परिषद शाळेला आयडीबीआय बँकेच्या सीएसआर निधीतून शिक्षणाचे सक्षमीकरण आणि विकास या उपक्रमांतर्गत दोन संगणक संच व एक पोर्टेबल साऊंड मशीन आयडीबीआय बँकेचे पुणे विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक अशुतोष कुमार, पुण्याचे महाव्यवस्थापक सिध्दार्थ कुमार, पुणे विभागाचे प्रादेशिक समन्वयक ध्रूव श्रीवास्तव, नीरा शाखेचे शाखाधिकारी श्रीनिवास पाटील, स्वप्निल डोईफोडे, भरत माने आदींच्या उपस्थितीत भेट देण्यात आले. यावेळी आयडीबीआय बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक अशुतोष कुमार यांनी, ७५ वर्ष जुनी असलेल्या शाळेच्या इमारतीची छान ठेवलेली देखभाल तसेच शाळेचा परिसर स्वच्छ, सुंदर व आकर्षक असल्याने शाळेचे खुप कौतुक केले. शाळेला शताब्दी वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी पाडेगांवचे माजी सरपंच विजय धायगुडे, हरिश्चंद्र माने, शंकरराव मर्दाने,संतोष माने, रघुनाथ धायगुडे, सचिन माने, दत्तात्रय धायगुडे , शामराव पायगुडे, विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते. निलम मेमाणे यांनी प्रास्ताविक केले. रविंद्र गायकवाड यांनी सुत्रसंचालन केले, तर आभार परशुराम माने यांनी मानले.

## हभप रोहिणीताई गडकरी यांना समाज भूषण पुरस्कार



**ओतूर :** नगर जिल्ह्यातील महिला कीर्तनकार आणि प्रवचनकार ह.भ.प. कु.रोहिणीताई गडकरी महाराज (रा. सुलतानपुर, ता अकोले, जि. अहिल्यानगर) यांना घारगाव याठिकाणी एका विवाह सोहळ्यात बेरड, बेडर रामोशी नोकरदार समिती महाराष्ट्र राज्य व तसेच जुन्नर तालुका रामोशी समाज बांधव ग्रुप यांच्या वतीने समाज भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. सन्मान चिन्ह व शाल श्रीफळ त्यांना देण्यात आले. यावेळी त्यांच्या मातोश्री बेबीताई गडकरी यांना देखील कर्तबगार आई म्हणून देखील शाल व श्रीफळ गौरवण्यात आले. रामोशी समाजाच्या शैक्षणिक, वैचारिक आणी विशेषता सामाजिक कामात ज्या मान्यवर लोकांनी योगदान दिले, अशांना दरवर्षी समाज भूषण पुरस्कार दिला जातो. या कार्यक्रमाप्रसंगी राजेंद्र गडकरी, गायत्री पतसंस्थेचे संचालक वसंत शिरतर, अशोक भंडलकर, सुरेश शिरतर, सामाजिक कार्यकर्ते, जयवंत शिरतर तसेच सुदर्शन मंडले आदी उपस्थित होते.

## लोक आंदोलन न्यासच्या जिल्हाध्यक्षपदी प्रकाश पाचारणे



**खेड :** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या लोक आंदोलन न्यासच्या पुणे जिल्हा अध्यक्ष पदी राजगुरुनगर येथील प्रकाश पाचारणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. न्यासच्या कार्याध्यक्षा कल्पना इनामदार यांनी बुधवारी (दि. ५) पाचारणे यांना नियुक्ती पत्र दिले. राज्य सचिव अशोक सब्बन, विश्वस्त दत्ता अवारी यांसह राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष यावेळी उपस्थित होते. पुणे जिल्हा व खेड तालुक्यात विविध प्रकारच्या आंदोलनात सक्रिय सहभाग आणि त्या माध्यमातून भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी यांच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी प्रकाश पाचारणे यांनी कामकाज केले आहे. माहिती अधिकार, लोकसेवा हक्क कायदा, दप्तर दिरंगाई अशा अनेक कामात पाचारणे यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

# क्रीडा स्पर्धेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये खेळाडूवृत्ती, संघभावनेची निर्मिती

### महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडास्पर्धेचे बारामतीमध्ये थाटात उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** 'वीज क्षेत्रासारख्या अत्यंत धकाधकीच्या क्षेत्रामध्ये राज्यातील तीन कोटींपेक्षा अधिक ग्राहकांना वीज सेवा देण्यासाठी सांघिकता अत्यंत महत्वाची आहे. दरवर्षीच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये खेळाडूवृत्ती व संघभावना निर्माण होते व तेच अभिप्रेत आहे' असे प्रतिपादन महावितरणच्या कोकण विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी केले.



बारामती येथील विद्यानगरीच्या क्रीडा संकुलात बुधवारी (दि. ५) राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटक म्हणून जगदाळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे प्रादेशिक संचालक व आयोजन समितीचे अध्यक्ष भुजंग खंदारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य अभियंते सर्वश्री राजेंद्र पवार, ज्ञानेश कुलकर्णी, सुनील काकडे, स्वप्नील काटकर, चंद्रमणी मिश्रा, ज्ञानदेव पडळकर, धर्मराज पेठकर, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) भुषण कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार, आयएसएमटी कंपनीचे किशोर भापकर, विद्या प्रतिष्ठानचे डी. एस. पवार, सहमुख्य औदयोगिक संबंध अधिकारी ललीत गायकवाड यांची उपस्थिती होती.

या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत महावितरणच्या १६ परिमंडलाच्या संयुक्त आठ संघातील सुमारे ११५० महिला व पुरुष खेळाडू सहभागी झाले आहेत. या खेळाडूंनी संचलन करून पाहुण्यांना मानवंदना दिली. तर बारामती परिमंडलातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी लोककला नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यावेळी महावितरणमधील आंतरराष्ट्रीय खेळाडू प्रतिक वाईकर, अमित जाधव, गुलाबसिंग वसावे, अमोल गवळी, दत्तात्रेय ठाकूर, नीलेश बनकर आदींचा गौरव करण्यात आला. तसेच बारामती परिमंडलातील पाच दिव्यांग कर्मचाऱ्यांना दूचाकी वाहन वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजन समितीचे कार्याध्यक्ष व मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी केले. सूत्रसंचालन मृदूला शिवदे, श्री. रोहित राख, श्री. सुशांत कांबळे यांनी केले. या क्रीडा स्पर्धेत २२ क्रीडा प्रकारातील सामने रंगणार असून येत्या शनिवारी (दि. ८) समारोप होणार आहे. १०० मीटर धावस्पर्धेत मसाणे, अंबादे प्रथम - अतिशय चुरशीच्या १०० मीटर धावस्पर्धेत पुरुष गटात साईनाथ मसाणे (सांघिक कार्यालय-भांडूप) यांनी बाजी मारत सुवर्णपदक जिंकले. तर गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) यांना रौप्यपदक मिळाले. महिला गटात श्वेतांबरी अंबादे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) यांनी सुवर्णपदक पटकावले तर मेघा झुणघरे (कल्याण-रत्नागिरी) यांनी रौप्यपदक मिळवले. विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते सुवर्ण व रौप्यपदक प्रदान करण्यात आले.

## भाटघर व नीरा देवधरमध्ये पुरेसे पाणी

**भोर :** भोर तालुक्यातील भाटघर व नीरा देवघर धरणात अनुक्रमे ७७.१२ तर, ६८.२८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. भाटघर धरणाच्या पॉवर हाऊसमधून १७६४ क्युसेक तर नीरा देवघर धरणाच्या पॉवर हाऊसमधून ७५० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे.


भोर तालुक्यातील पश्चिम भागात यंदा दमदार पाऊस झाल्याने दोन्ही धरणे ऑगस्टमध्ये भरली. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दोन्ही धरणात जास्तीचा पाणीसाठा शिल्लक आहे. गतवर्षी ४ फेब्रुवारी रोजी भाटघर धरणात ६१.८२ टक्के तर नीरा देवघर धरणात ४८.३६ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. मात्र, गतवर्षीच्या तुलनेत यंदा भाटघर धरणात जवळपास १६ टक्के तर नीरा देवघर धरणात २० टक्के अधिकचा पाणीसाठा शिल्लक आहे. डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दोन्ही धरणात ९९ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. मागील दोन महिन्यात भाटघर धरणातून २२ टक्के तर नीरा देवघर धरणातून ३१ टक्के पाण्याचा विसर्ग झाला आहे. दोन्ही धरणात असलेला उपलब्ध पाणीसाठा पुढील चार महिन्यांसाठी योग्य नियोजन करून वापरणे आवश्यक आहे. दोन्ही धरणातील पाण्याचा भोर,बारामती, इंदापूर, पुरंदर, फलटण, खंडाळा, माळशिरस, पंढरपूर, सांगोला या तालुक्यांसाठी उपयोग होत असतो.

# गव्हाला बसतोय उन्हाचा चटका

### उन्हाचा चटका वाढत असल्याने पिकांच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाल्हे :** पुरंदर तालुक्यातील वाल्ह्यासह परिसरात मागील १५ दिवसांपासून वातावरण बदल होऊन उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढत असल्याने याचा फटका रब्बी हंगामातील बहुतांश पिकांना बसत आहे. उशीरा पेरणी केलेले गहू, हरभरा, ज्वारी, मका या पिकांमधील दाणे परिपक्व होण्यासाठी थंडीची आवश्यकता असताना उन्हाचा चटका वाढत असल्याने या पिकांच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत होत आहे.



यावर्षीही वाल्हे व परिसरात मान्सूनपूर्व व मान्सून पाऊस अल्प प्रमाणात पडला होता. मात्र, पिंगोरी, कवडेवाडी खो-यांमध्ये तसेच दौंडज खिंड तसेच सह्याद्रीच्या पर्वत रागांच्या परिसरात संततधार पाऊस पडल्याने वाल्हे गावातून वाहणा-या दोन्ही ओढ्यातून यावर्षी पाणी वाहिले होते. यामुळेच ओढा व परिसरातील विहिरी, बोअरवेल यांच्या पाणीपातळीत समाधानकारक वाढ झाली होती. यामुळेच मागील वर्षापेक्षा यावर्षी वाल्हे व परिसरात गहू पिकांचा पेरा, पोषक वातावरण असल्याने व उपलब्ध पाणीसाठ्यावर यंदा रब्बी पिकांची पेरणी वाढली.

मागील काही महिन्यात बदलत्या हवामानाचा मोठा फटका रब्बी हंगामातील पिकांना बसला होता. अचानक वाढत असलेले ऊन यामुळे गहू उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. तसेच पिकांनाही या बदलत्या वातावरणाचा फटका बसण्याची शक्यता आहे.

मागील दोन महिन्यांत पिकांना पोषक अशी थंडी पडत होती. या थंडीने पीके जोमात आली असून अचानक उन्हाचा चटका वाढल्याने गव्हाच्या पिकांला या वाढत्या तापमानाचा फटका बसण्याची शक्यता आहे.

**मागील वर्षीदेखील फटका**

- मागील वर्षीदेखील उष्णतेच्या लाटेमुळे गव्हाच्या उत्पादनात मोठी घट झाली होती. यावर्षीही आता वाल्हे परिसरात तापमानात मागील १५ दिवसांपासून उन्हाचा चटका वाढत चालला आहे. यामुळे गहू उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

## डिंभे धरणात बुडून बिबट्याचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** बोरघर (ता. आंबेगाव) परिसरांतील डिंभे धरणपाणलोट क्षेत्रातील पाण्यामध्ये बिबटया मृतावस्थेत आढळून आला. वनविभागाकडून शवविच्छेदन करून त्याच्यावर डिंभे रोपवाटिका येथे नियमानुसार अंत्यसंस्कार करण्यात आले. असल्याची माहिती घोडेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर यांनी दिली.

बोरघर परिसरामध्ये वनरक्षक सी. के. केदारी गस्ती घालत असताना त्यांना दुपारच्या दरम्यान पाण्यामध्ये बिबट्या मृतावस्थेत आढळून आला. त्यांनी त्वरीत घोडेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर यांना दूरध्वनीवरून माहिती दिली. त्यानंतर वनवरिक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर, वनरक्षक एन. एस. विरणक, जी.डी. इथापे, वनपाल एन. एच. गिन्हे, एस. के मुंढे, एस. यु. गायकवाड यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. बिबट्या पाण्यात बुडाल्याने मृतावस्थेत आढळला.



त्यामुळे बिबटयाची शिकार किंवा बिषबाधा झाली आहे काय? त्याचे सर्व अवयव सुस्थित असल्याची खात्री पशुवैदयकीय अधिकारी डी. किदार्ले व वनअधिकारी यांनी पाहणी केल्यानंतर तसे काही आढळून आले नाही. बिबट्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाले असल्याचे पशुवैदयकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

बिबट हल्ला, बिबट मृत्यू अशा घटना घडल्यास किंवा वन्यप्राणी अडचणीत सापडल्यास घोडेगाव वनपरिक्षेत्र कार्यक्षेत्रातील वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांच्याशी त्वरीत संपर्क करण्याचे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर यांनी केले आहे.

# सरपंच परिषदेच्या अध्यक्षपदी पोखरकर आणि पाचारणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुका सरपंच परिषदेच्या अध्यक्षपदी वाळद गावचे सरपंच मनोहर पोखरकर यांची तर महिला अध्यक्षपदी तिन्हेवाडी गावच्या सरपंच प्रतीक्षा पाचारणे यांची बिनविरोध निवड झाली.

खेड तालुक्यातील सरपंच परिषदेची बैठक नुकतीच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात सरपंच परिषदेचे राज्याचे प्रसिद्धीप्रमुख संजय जगदाळे, जिल्हा मार्गदर्शक कुंडलिक कोहिनकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या बैठकीत सरपंच परिषदेचे अध्यक्ष महिला अध्यक्ष आणि परिषदेतील पदांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. यावेळी जेष्ठ मार्गदर्शक भाऊसाहेब पवार, भास्कर जगदाळे, संतोष पाचारणे आदी मान्यवर उपस्थित होते. खेड तालुका सरपंच परिषदेचे नवनिर्वाचीत पदाधिकारी पुढील प्रमाणे :- अध्यक्ष - मनोहर पोखरकर (वाळद) , महिला अध्यक्षा :- प्रतीक्षा पाचारणे (तिन्हेवाडी), उपाध्यक्ष :- सीताराम गुजर (दौंडकरवाडी), वैभव गावडे (गाडकवाडी), महिला उपाध्यक्ष :- भाग्यश्री चव्हाण (वडगाव पाटोळे), महिला बाल कल्याण समिती तालुका अध्यक्षः- सुमित्रा चांभारे ( सुपे सातकरवाडी), कार्याध्यक्ष :- चंद्रकांत बारणे (दोंदे), सरचिटणीस :- पंढरीनाथ कोहिनकर (कोहिनकरवाडी), सचिव :- संतोष गोरडे (गोसासी), संपर्कप्रमुख :- चंद्रकांत भालेराव (येनिये खुर्द), प्रवक्ते :- बाळासाहेब गोपाळे (चिखलगाव), समन्वयक :- रामचंद्र सोनवणे (पत्रकार ), प्रसिद्धीप्रमुख :- रोहिदास होले (पत्रकार ), खजिनदार :- दीपक कालेकर (गुंडाळवाडी), सल्लागार :- मारुती सातकर (सातकरस्थळ), द्वारकानाथ टिचगे(रेटवडी), संघटक :- तानाजी भोकटे ( खरपुड ), गणेश मुळे (कोहीनकरवाडी) यावेळी सरपंच सोनल टोपे (वाकी बुद्रुक), मुदिता देखणे (शिरोली), सुनीता येळवंडे (निघोजे), दत्तात्रय राऊत (मोहकल),अर्चना साबळे (वाघु), दत्तात्रय देशमुख (देशमुखवाडी), शंकर मोरमारे (टोकावडे), प्रदीप शिंदे(औंढे) आदी उपस्थित होते.



खेड तालुका सरपंच परिषदेचे अध्यक्ष मनोहर पोखरकर, महीला अध्यक्षा प्रतीक्षा पाचारणे यांचा सन्मान करताना संजय जगदाळे, जिल्हा मार्गदर्शक कुंडलिक कोहिनकर व इतर.

> खेड तालुक्यातील सर्व सरपंचाना प्रशिक्षण दिले जाईल. तालुक्यात सरपंचाच्या मदतीने अनेक गावे आदर्श गाव करण्याचा प्रयत्न केला जाईल. सरपंच प्रश्नासाठी एकजुटीने आवाज उठवू, आगामी काळात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतील.
>
> - मनोहर पोखरकर, सरपंच वाळद

# अपघाताचे प्रमाण कमी करण्याची जबाबदारी प्रत्येकाची

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** रस्त्यांवरील अपघाताचे प्रमाण कमी करणेसाठी समाजातील प्रत्येक घटकांनी जबाबदारीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. उपप्रादेशिक परिवहन परिवहन विभागाच्या वतीने राबवीत असलेल्या रस्ता सुरक्षा अभियानात पत्रकार संघाने पुढे येऊन केलेली जनजागृती मोलाची आहे. रस्त्यावर होणाऱ्या अपघाताची संख्या पहाता दर ४ मिनिटाला १ व दरदिवशी सुमारे ४७४ हून अधिक व्यक्ती अपघातात मृत्युमुखी पडत आहेत. त्याचे गांभीर्य आपल्याला कळत नाही. समाजातील ३ टक्के भाग हा अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्या व्यक्तींचा आहे, हे अत्यंत निराशाजनक व दुर्दैवी आहे, असे मत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी व्यक्त केले.



बारामती तालुका ग्रामीण पत्रकार संघ व उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बारामती यांच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत डोर्लेवाडी (ता. बारामती) येथे चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा व स्लो मोटर सायकल स्पर्धा व बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी निकम बोलत होते.यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती अशोक नवले,सरपंच सुप्रिया नाळे,सहेली फौंडेशन बारामतीच्या अध्यक्षा रोहिणी आटोळे, राष्ट्रवादी युवक कॉग्रेस जिल्हा सरचिटणीस अविनाश काळकुटे, न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचे मुख्याध्यापक अर्जुन माने, प्राथमिक केंद्र शाळेचे मुख्याध्यापक जालिंदर बालगुडे, बारामती तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमनाथ भिले, सचिव

### नव्या जोमाने दौंड तालुक्यात कुस्ती ने घेतली भरारी

# कर्मयोगी कुस्ती केंद्रातील मल्लांची चमकदार कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगांव :** कुस्ती हा खेळ दौंड तालुक्यातून जवळपास हद्दपार होण्याच्या मार्गावर होता. आमदार राहुल कुल हे १० वर्षांपूर्वी तालुका अध्यक्ष झाले व कुल यांच्या रूपाने या कुस्तीला तालुक्यात अभय मिळाला व पुन्हा नव्या जोमाने दौंड तालुक्यात कुस्ती ने भरारी घेतली. व दौंड च्या मल्लानी राज्यपातळी पर्यंत मजल घेतली. या वर्षी च्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत पै.अक्षय चव्हाण याने ७४ किलो वजन गटात सुवर्ण पदक तर पै. निखिल कदम याने ७० किलो वजन गटात रौप्य पदक प्राप्त केल्याने पारगांव येथील कर्मयोगी कुस्ती केंद्र या ठिकाणी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



कर्मयोगी कुस्ती केंद्र या ठिकाणी पै. अक्षय चव्हाण व पै. निखिल कदम यांचा सत्कार करताना मान्यवर.

या वेळी सर्जेराव जेधे, माऊली ताकवणे, मारूती बोत्रे, मच्छिंद्र ताकवणे, रमेश बोत्रे, संजीव ताकवणे, रवींद्र बोत्रे, शामराव ताकवणे, मानसिंग बोत्रे, मच्छिंद्र बोत्रे आदी मान्यवर उपस्थित होते. पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाची दौंड तालुक्याला महत्वाची अशी माऊली ताकवणे यांना जिल्हा उपाध्यक्ष व पै. प्रदीप बोत्रे यांना सरचिटणीस हि दोन पदे मिळाली आहेत.

> दौंड तालुक्यात तालुका संघ नसल्याने तालुक्यात स्पर्धा घेता येत नव्हत्या. ही बाब ओळखून आमदार राहूल कुल यांनी १० वर्षांपूर्वी तालुका कुस्तीगीर संघाची स्थापना केली व तालुक्यातील मल्लांना कुस्तीस्पर्धेची संधी प्राप्त झाली. त्यामुळे दौंड तालुक्यातील पै.महेश शितोळे हा तालुक्यातील पहिला सुवर्णपदक विजेता ठरला. पै. निखिल कदम हा महाराष्ट्र केसरी स्पर्धेत सलग आठ वेळा पदक विजेता ठरला. पै.तुषार डुबे हा उप हिंदकेसरी झाला व पै. अक्षय चव्हाण हा सलग दोन वेळा ७४ किलो वजन गटात सुवर्ण पदक विजेता ठरला. या मुळे दौंड तालुक्यातील कुस्ती बहराला आली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.
>
> - माऊली ताकवणे, उपाध्यक्ष, पुणे जि. कुस्तीगीर संघ

#रा

## नरवीर उमाजी नाईक यांचे कार्य प्रेरणादायी



**जेजुरी :** इंग्रजांच्या अंधार युगात उमाजी नाईक यांच्यासारखा तेजस्वी सूर्य उदयाला आला. व खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा उभारून त्यांनी देशासाठी प्रथम बलिदान दिले. त्यांचे महान कार्य आजही देशासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन इतिहासकार डॉ. श्रीमंत कोकाटे यांनी केले. आद्य क्रांतिवीर नरवीर उमाजी राजे नाईक यांच्या १९३ व्या बलिदान दिनानिमित नरवीर उमाजी नाईक समाज सुधारक मंडळ महाराष्ट्र राज्याच्या वतीने श्रीक्षेत्र जेजुरी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रसिद्ध लेखक इतिहासकार डॉ. श्रीमंत कोकाटे व मी सावित्री बोलते या एकपात्री नाटकाच्या मुख्य नायिका कविता म्हेत्रे व संघटनेचे अध्यक्ष वसंतराव चव्हाण यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शजेजुरी गडावरील आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या पूर्णाकृती स्मारकाच्या ठिकाणी पुष्पवृष्टी करण्यात आली. आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक सांस्कृतिक भवनामध्ये संघटनेमध्ये गेल्या ३०-४० वर्षांपासून कार्यरत असणारे राम मंडले (सांगली), रघुनाथ गुजले (सोलापूर), कुंडलिक मंडले (कोल्हापूर), सिताराम जेडगुले (अहिल्यानगर), विजय मंडले (नाशिक), जगन माकर, आप्पा माकर (पुणे), संतोषकुमार पाटोळे (सोलापूर), सुरेश मंडले (उस्मानाबाद) यांना पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.

# लगबग श्री म्हाळसाकांत खंडेरायाच्या उत्सवाची

## बुधवारी आणि गुरुवारी मोठ्या उत्साहात यात्रा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** उत्तर पुणे जिल्ह्यातील भाविकांचे कुलदैवत असणारे धामणी (ता. आंबेगाव) येथील श्री म्हाळसाकांत खंडोबा देवाची यात्रा बुधवार (दि. १२) व गुरूवार (दि. १३) रोजी मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. यात्रेची संपूर्ण तयारी अंतिम टप्प्यात आली असून मंदिराकडे येणाऱ्या रस्त्यांची डागडुजी तसेच साईडपट्ट्या भरण्याचे काम चालू आहे.

काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पडलेले खड्डे डांबर टाकून बुजवण्यात आले व रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या साईडपट्ट्या भरून त्यावर पाणी मारून रोलर फिरवून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येत आहे. तसेच मंदिर परिसरात देखील कोणाची गैरसोय होणार नाही याकडे लक्ष देण्याचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने पालखीचा मार्ग तयार करणे असेल किंवा दुकानांसाठी जागा उपलब्ध करून देणे, लाईटची व्यवस्था करणे,



लोणी-धामणी धामणी ( ता.आंबेगाव) येथे पाळणेवाले व्यवसाहिक यात्रेसाठी दाखल झाले आहेत.

आरोग्याच्या दृष्टीने पाण्याच्या टाक्या साफ करणे, पाण्यात टीसीएल टाकणे अशी कामे चालू आहेत. ग्रामपंचायत, यात्रा कमिटी आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने यात्रा सर्वांना सुखकर जावो हाच आमचा मानस आहे, असे यात्रा कमिटीचे अध्यक्ष गजाराम जाधव पाटील, सरपंच रेशमा बोऱ्हाडे व देवस्थानाचे अध्यक्ष प्रकाश जाधव पाटील, सेवेकरी दादाभाऊ भगत यांनी सांगितले.

यात्रा अगदी सहा दिवसांवर आल्याने मंदिर परिसरात विविध दुकानांबरोबर मोठ मोठे पाळणेवाले व्यवसायिक येण्यास सुरुवात झाली असून, हे व्यावसायिक पाळणे उभारण्याच्या लगबगीत दिसत आहेत. तर काही व्यवसायिकांनी आपले पाळणे पूर्णपणे उभारले आहेत. यात्रा काळात भाविक भक्तांना कुठलीच अडचण येणार नाही, याची पूर्ण काळजी देवस्थानच्या वतीने करण्यात आली असल्याचे प्रकाश जाधव पाटील यांनी सांगितले.

## शेअर बाजाराविषयीचे गैरसमज दूर करण्याची आवश्यकता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भिगवण :** शेअर बाजार हा सट्टा आहे, त्यामध्ये गुंतवणुक करण्यासाठी मोठया रक्कमेची आवश्यकता असते, असे अनेक गैरसमज शेअर बाजारविषयी आहेत. सध्या समाजामध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे. सुशिक्षित तरुणांनी योग्य अभ्यास केल्यास शेअर बाजाराच्या माध्यमातून हक्काचा रोजगार मिळु शकतो असे मत कराड (जि. सातारा) येथील शेअर बाजार अभ्यासक राज चव्हाण यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भिगवण येथील अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाच्या वतीने अर्थसाक्षरता या विषयावर आयोजित कार्यशाळेमध्ये 'शेअर बाजार : समज आणि गैरसमज' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज होते तर विदयार्थी कल्याण अधिकारी डॉ. बाळासाहेब काळे, समन्वयक डॉ. गजानन कदम उपस्थित होते.

## इंदू स्कूलच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी रसिक मंत्रमुग्ध



**जेजुरी :** देशभक्तिपर गीते, लोकगीते, बालगीते, लावणी, कोळीगीत, पंजाबी , तेलगू गाणी, गड आला पण सिंह गेला नाटिका, शिक्षक-विद्यार्थी कॉमेडी नाटिका आदी कला सादर करून इंदू इंग्लिश मिडीयम स्कूलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी रसिकांची मने जिंकली. कडेपठार रुरल मेडिकल अँड रिसर्च फौंडेशन, जेजुरी संचलित इंदु इंग्लिश स्कूल, कोळविहीरे या विद्यालयाच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. या वेळी तालुका, जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रिय तसेच विद्यालयात विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष रवींद्र जोशी, डॉ संजय सावंत, यांच्या हस्ते बक्षिसे देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी पुरंदर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष माणिक झेंडे पाटील, जेजुरी उद्योजक संघाचे उपाध्यक्ष पाडुरंग सोनवणे, सचिव राजेश पाटील सर, शकील शेख, हरिश्चंद्र चामे, पुणे जिल्हा व्यसनमुक्त युवक संघटनेचे उपाध्यक्ष आनंद नाईक, सुधाकर टेकवडे, अरविंद शेंडकर, राहुल सावंत, आकाश टेकवडे, इंदुफार्माचे विशाल साळुंके, संजय जाधव, सुजित राणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलम मेमाणे तर आभार जितेंद्र खोपडे यांनी मानले. इंदू स्कूलच्या संस्थापिका इंदुमती कुटे, संस्थापक अध्यक्ष डॉ. रामदास कुटे, सचिव डॉ. मोनाली कुटे, प्राचार्य पुरुषोत्तम रोटे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# भीमाशंकर करंडकाचे विजेतेपद हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** डी. जी. फाऊंडेशन आयोजित आंतरमहाविद्यालयीन भीमाशंकर करंडक स्पर्धा नुकतीच मंचर (ता. आंबेगाव) येथे संपन्न झाली. या स्पर्धेच्या विजेतेपदाचा करंडक येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने पटकाविला. राज्याचे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, सिने अभिनेता आकाश ठोसर, पूर्वा वळसे पाटील यांच्या हस्ते आकर्षक करंडक आणि रोख ५१ हजारांचे बक्षीस देऊन महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला.

भीमाशंकर करंडकांतर्गत एकांकिका स्पर्धेत राजगुरू महाविद्यालयातील 'प्रवास महत्त्वाचा आहे - सुखाचा शोध' या एकांकिकेचा प्रथम क्रमांक आला. उत्कृष्ट दिग्दर्शक व उत्कृष्ट अभिनेता अवधूत धायबर तर उत्कृष्ट नेपथ्यकार म्हणून हर्षल गेडाम यांना गौरविण्यात आले. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक आदित्य हानवटे, गीतगायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक कृतिका वाळुंज आणि वैयक्तिक नृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक प्रचिती नेटके यांनी



पटकाविला.

भीमाशंकर करंडक स्पर्धा जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या प्रचिती नेटके, सूरज पावडे, श्वेता धवसे, हर्षल गेडाम, अवधुत धायबर या विद्यार्थ्यांसह बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांचे आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दिलीप मुळूक, प्रा. अर्चना खांडेभराड यांचे विशेष कौतुक संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्यासह संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, ॲड. राज्याला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक के. आर पाचारणे यांनी केले.

भीमाशंकर करंडक मिळवून देणाऱ्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करताना संस्था व महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घालण्याचे काम केल्याबद्दल सर्व विद्यार्थी कौतुकास पात्र असल्याचे ते म्हणाले.

## नालंदा विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** मंचर परिसरात नावाजलेले इंग्लिश माध्यमाची शाळा म्हणून ओळख असलेल्या नालंदा विद्यालयाचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहाने पार पडले. यावर्षी नालंदा विद्यालयाला वीस वर्ष पूर्ण झाल्याने, स्नेहसंमेलनाचा नवरस हा विषय निवडण्यात आला होता. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रावर आधारित नवरस या विषयावर विद्यार्थ्यांनी विवीध नृत्य सादर करत रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन केले. यावेळी माजी सहकारमंत्री दिलीपरावजी वळसे पाटील, पूर्वाताई वळसे पाटील, पराग कारखान्याचे चेअरमन यशवर्धन डहाके, शरद बँकेचे संचालक अजय घुले, भीमाशंकर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे, सुहास बाणखेले, दत्ता थोरात, अरुणाताई थोरात, मनीषा बेंडे, नालंदा इंग्लिश स्कूलच्या प्रिन्सिपल डॉ. करुणा मनुजा, व्हॉईस प्रिन्सिपल सोजी जेकब, शेवाळवाडी सरपंच माधुरी शेटे, एनसीआरटीचे सीईओ अमरजीत खराडे, प्रसिद्ध युट्युबर मंदार पडवळ हे उपस्थित होते.

यावेळी संस्कार फाउंडेशनच्या वतीने विद्यालयातील चार यशस्वी आणि गुणवंत ,क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानही करण्यात आला या विद्यार्थ्यांचा सन्मान दिलीप वळसे पाटील आणि पूर्वा ताई वळसे पाटील, अजय घुले, यांच्या हस्ते करण्यात आला माननीय दिलीप वळसे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले .तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका डॉक्टर करुणा मनुजा यांचे देखील कौतुक केले. या कार्यक्रमाचे संयोजन आणि व्यवस्थापन विद्यालयाचे समन्वयक सय्यद मुमताज अली यांनी केले. सूत्रसंचालन निवेदक महेश देशपांडे तसेच विद्या बांगर आणि रफत काझी यांनी केले.

## डिंगोरे येथून श्री क्षेत्र शिर्डी पदयात्रा पालखीचे प्रस्थान



**ओतूर :** साई प्रतिष्ठाण, न्यु ओम साई फंड मंडळ, ओमसाई मित्र मंडळ ,साईधाम मंदिर, साईधाम वस्ती, डिंगोरे, ता.जुन्नर, जि.पुणे आयोजीत साईमंदिर डिंगोरे ते थी क्षेत्र शिर्डी पदयात्रा पालखी सोहळ्याचे बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी प्रस्थान झाले असून पालखी सोहळ्याचे हे १३ वर्ष आहे. दि.५ रोजी पालखीचे प्रस्थान होऊन पालखी ओतूर, आळेफाटा, बोटा, घारगाव, चंदनापूरी, सुकेवाडी, कवठेकमळेश्वर,जांभुळवाडी कसारे मार्गे रविवारी दि. ९ रोजी शिर्डी येथे पालखी पोहोचल्यानंतर शिर्डी येथे भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. पालखी परतीच्या प्रवासानंतर रविवारी, दि.१६ रोजी साईधाम वस्ती डिंगोरे येथे साई भंडाऱ्याचा कार्यक्रम होणार असल्याचे संयोजकांनी सांगितले. पालखी प्रस्थान वेळी शिवाजी शेरकर, तान्हाजी लोहोटे, प्रताप लोहोटे, नवनाथ शेरकर, दत्तात्रय शेरकर, गोकुळ आमले, अमर उकिर्डे, नवनाथ फोपसे, बाळशिराम थापेकर, रमेश सुकाळे, अनिल शेरकर, दिलीप उकिर्डे, बाळासाहेब शेरकर, विष्णु शेरकर, रविंद्र लोहोटे, विजय मवाळ, कैलास डुंबरे, खंडू उकिर्डे, बिपीन तांबे, योगेश तांबे, संजय लोहोटे, दत्ता उकिरडे, निलेश ठिकेकर, रूपेश उकिर्डे, प्रकाश सुकाळे, दत्त सेवा भजन मंडळ, भैरवनाथ तरूण झांजपथक घोडेमाळचे पथकासह ४१० भाविक या पायी पालखीत सहभागी झालेले आहेत.

## कोंढापुरी आरोग्य उपकेंद्राच्या उदघाट्नाला मुहूर्त कधी?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** कोंढापुरी, ता. शिरुर येथे आरोग्य उपकेंद्राच्या सुसज्ज इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले आहे. मात्र उदघाट्नाला मुहूर्त मिळत नाही.

पुणे जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या तळेगाव ढमढेरे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत कोंढापुरी आरोग्य उपकेंद्र कार्यरत आहे. येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात एक निवासी समुदाय आरोग्य अधिकारी, दोन आरोग्य सेवक, तीन आशा वर्कर व एक अर्धवेळ आशा वर्कर असे कर्मचारी काम करत असून,येथील आरोग्य उपकेंद्र सध्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या जुन्या इमारतीत आहे.

कोंढापुरी गावची लोकसंख्या सुमारे ४ हजार असून, सहा ते सात हजार लोकसंख्या अतिरिक्त आहे. हे आरोग्य उपकेंद्र बुरुंजवाडी व कोंढापुरी येथील रुग्णांना दैनंदिन उपचारासाठी काम करत आहे.

कोंढापुरी येथे गेल्या सरकारच्या काळात सुमारे एक कोटी तीन लक्ष रुपयांचा निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीला मिळाला होता. उपकेंद्राच्या इमारतीचे काम पुर्ण होऊन सहा महिने झाले आहेत, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे सदर आरोग्य उपकेंद्र सुरू व्हावे याबाबत कोणत्याही उपाययोजना होत नाही, याबाबत ग्रामपंचायतीमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र विद्युतीकरणाचे काम प्रलंबित असून, त्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे ग्रामपंचायतीमार्फत पत्र व्यवहार करण्यात आल्याचे सरपंच अपेक्षा गायकवाड व ग्रामपंचायत सदस्य राहुल दिघे यांनी सांगितले.

## उदघाट्नाच्या प्रतीक्षेत...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



कारेगाव कोंढापुरी, ता. शिरुर येथे उदघाट्नाच्या प्रतीक्षेत असलेली आरोग्य उपकेंद्राची इमारत. छाया - पोपट पाचंगे, कारेगाव.)

# अशोक बाबेल टपाल सेवेतून सेवानिवृत्त



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** ओतूर उपडाक घराच्या अंतर्गत असलेले धोलवड गावचे शाखा डाकपाल अशोक रामचंद बाबेल हे पस्तीस वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्तीचा कार्यक्रम ओतूर पोस्ट ऑफिस मध्ये दिमागदार पद्धतीने संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी रिटायर्ड पी. ए. गायके हे होते.

याप्रसंगी जुन्नर तालुक्यातील विविध गावातील पोस्ट खात्यातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ओतूर पोस्ट ऑफिसचे सब पोष्ट मास्तर पी. एम. उंबरे, जुन्नर पोस्ट ऑफिसचे पोस्ट मास्तर पी. एम. तिखे, धोलवड गावचे सरपंच वैभव नलावडे, आदर्श ग्राम काळवाडी चे सरपंच वामन, धोलवडचे माजी सरपंच शिवाजीराव नलावडे, भगवान नलावडे, विठ्ठल शितोळे, माजी जि.प.सदस्य भानूविलास गाढवे, वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य अवघडे, गुलाबबाई बाबेल, विजय कर्डिले, नारायण कालेकर, पंढरीनाथ डुंबरे, बाळासाहेब जंगम, विवेक घोलप, गंगाधर जाधव, अक्षय ओझरकर, संतोष मुंडे, एम ओ चौधरी, सुरेंद्र बोरकर, विजय लवांडे, प्रतीक बोरा, बबनराव गायकवाड, बंडू अभंग, जे.के.सोनवणे, नारायण सस्ते, घुले, तिखे, दळवी, जावळे, प्रा. रतीलाल बाबेल, संतोष गांधी, सौरभ गांधी, जयप्रकाश बाबेल, सविता बाबेल, अक्षदा बाबेल, गीतांजली गांधी, विजया बाबेल आदि मान्यवर उपस्थित होते.

### हंगामाची सांगता फेब्रुवारी महिन्यातच होणार

# उसाचे गाळप घटण्याची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भवानीनगर :** साखर कारखान्यांच्या यावर्षीच्या गाळप हंगामामध्ये साखर कारखानदारांच्या अपेक्षेपेक्षा गाळप कमी होण्याची शक्यता आहे. साखर कारखान्यांचा यावर्षीच्या गाळप हंगामाची सांगता फेब्रुवारी अखेर पर्यंत होण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षीच्या दुष्काळी परिस्थितीमुळे यावर्षी उसाचे उत्पादन घटले असून, शेतकऱ्यांना देखील अपेक्षेप्रमाणे उसाचे एकरी उत्पादन मिळत नाही. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक गणिते



कोलमडली आहेत. या हंगामामध्ये साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात उसाची उपलब्धता नेहमीपेक्षा कमी असून, त्याबरोबरच उसाचे एकरी उत्पादन घटल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांबरोबरच ऊस तोडणी करणारे मजूर, मजुरांवर नियंत्रण ठेवणारे मुकादम व साखर कारखानदार यांची आर्थिक गणिते बिघडली आहेत. यावर्षीचा गाळप हंगाम कमी दिवसाचा होत असल्यामुळे साखर कारखान्यांनी मुकादमांना दिलेली उचल व मुकादमांनी ऊस तोडणी करणाऱ्या मजुरांना दिलेली उचल फिटणार नसल्याचे मुकादम कडून बोलले जात आहे. त्यामुळे यावर्षी मुकादमांनी मजुरांना दिलेली उचल ही ३० ते ४० टक्के मजुरांकडेच शिल्लक राहणार आहे.

यावर्षी उसाचे एकरी उत्पादन घटल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसलेला आहे. साखर कारखानदारांनी उसाच्या गाळपाचा बांधलेला अंदाज यावर्षी फोल ठरण्याची शक्यता आहे. बांधलेल्या अंदाजापेक्षा किमान तीन ते चार लाखांनी कारखान्यांमध्ये उसाचे गाळप कमी होण्याची शक्यता आहे. साखर कारखान्यांचा एप्रिल ते मे पर्यंत चालणारा गाळप हंगाम यावर्षी फेब्रुवारी अखेरपर्यंत ते मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत चालण्याची शक्यता आहे. गाळप हंगाम शेवटच्या टप्प्यात आल्यामुळे अनेक साखर कारखाने, इतर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात जाऊन आपल्या कारखान्यांमध्ये उसाचे गाळप वाढवण्यासाठी उसाची पळवापळवी करू लागले आहेत. कारखान्यामध्ये अपेक्षित उसाचे गाळप होत नसल्यामुळे अनेक साखर कारखान्यांना आर्थिक फटका सहन करावा लागण्याची शक्यता आहे.

#रा



यश एका रात्रीत मिळत नाही

“मी यशाच्या मागे धावत नाही. मी दैनंदिन दिनचर्या पाळतो, ज्यामुळे मला यश मिळेल. माझ्यासाठी, चॅम्पियन मी आहे. मला वाटते की हे सर्व तुमच्या मनात आहे. मला वैयक्तिकरित्या असे वाटते की तुमच्याशिवाय तुम्हाला साथ देणारे कोणी नाही.” “मी नेहमी म्हणतो की तुम्ही वर्तमानात जगले पाहिजे. मी भाग्यवान आहे की मी २०४ मध्ये इतक्या चॅम्पियनशिप जिंकल्या आहेत. मी दररोज घेत असलेल्या मेहनतीच परिणाम मला नक्कीच मिळणार. एकूणच हा प्रवास तुम्हाला खूप काही शिकवून जातो. तुम्ही काही जिंकता, काही हरता. जर तुम्ही एखाद्या गोष्टीच्या मागे धावत असाल तर ते तुम्हाला नक्कीच सापडेल, पण त्यामागे एक प्रवास असतो. तुम्ही हे एका रात्रीत साध्य करू शकत नाही.” “सध्या माझे संपूर्ण लक्ष एकदिवसीय मालिकेवर आहे. मी सामन्यानुसार प्रगती करत आहे. जेव्हा मी भारताची जर्सी घालतो तेव्हा मला छान वाटते. हे मला आणखी एका स्तरावर जाण्यास मदत करते. — श्रेयस अय्यर




# भारताची विजयी घोडदौड

## श्रेयश, शुभमन, अक्षर यांची जोरदार फटकेबाजी

**नागपुर :** भारतीय संघाने इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेची सुरुवात दणक्यात केली आहे. नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर झालेल्या सामन्यात भारताने ४ विकेट्सने विजय मिळवत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. भारताकडून श्रेयस अय्यर, शुभमन गिल आणि अक्षर पटेल फलंदाजीत चमकले. या सामन्यात इंग्लंडने भारतासमोर २४९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग भारताने ३८.४ षटकात ६ विकेट्स गमावत पूर्ण केला.

भारताकडून सलामीला रोहित शर्मा आणि पहिलाच वनडे सामना खेळणाऱ्या यशस्वी जैस्वालने फलंदाजी केली. पण या दोघांनाही खास काही करता आले नाही. जैस्वालला ५ व्या षटकात जोफ्रा आर्चरने १५ धावांवरच बाद केले. त्यापाठोपाठ पुढच्याच षटकात रोहित शर्माला साकीब मेहमुदने २ धावांवर बाद केले. त्यामुळे भारताची सुरुवात खराब झाली. पण यानंतर उपकर्णधार शुभमन गिलला श्रेयस अय्यरने भक्कम साथ दिली. एक बाजू गिलने सांभाळलेली असताना श्रेयस अय्यरने दुसऱ्या बाजूने वादळी खेळ केला. त्याने चौकार-षटकारांची बरसात करत ३० चेंडूतच अर्धशतक पूर्ण केले. पण अर्धशतकानंतर तो १६ व्या षटकात बाद झाला. त्याने ३६ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह ५९ धावा केल्या. त्याने दोन्ही षटकात जोफ्रा आर्चरविरुद्ध सलग दोन चेंडूत फटकावल्या होत्या.

तो बाद झाल्यानंतर अक्षर पटेल गिलला साथ देण्यासाठी आला. अक्षर आला तेव्हा भारताला विजयासाठी १३० हून अधिक धावांची गरज होती. यावेळी या दोघांनीही अर्धशतके करताना शतकी भागीदारीही केली. त्यामुळे भारतासाठी विजय आणखी सोपा झाला. पण अक्षरला अर्धशतकानंतर ३४ व्या षटकात ५२ धावांवर आदिल राशीदने त्रिफळाचीत केले. तो बाद झाल्यानंतर गिलला साथ देण्यासाठी केएल राहुल आला होता. परंतु, त्याला फार काही करता आले नाही. तो २ धावांवर बाद झाला. त्याच्यानंतर गिलही माघारी परतला. पण तोपर्यंत भारतीय संघ विजयाच्या जवळ पोहचला होता. गिलने ९६ चेंडूत १४ चौकारांसह ८७ धावांची खेळी केली. अखेरीस हार्दिक पांड्या आणि रवींद्र जडेजा यांनी भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

तत्पुर्वी, इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. पण त्यांना पूर्ण ५० षटकेही खेळता आली नाहीत. त्यांचा संघ ४७.४ षटकात २४८ धावांवर सर्वबाद झाला. इंग्लंडकडून फिल सॉल्ट (४३) आणि बेन डकेट (३२) या सलामीवीरांनी ७५ धावांची भागीदारी करत सुरुवात चांगली केली होती. पण ते दोघे बाद झाल्यानंतर कर्णधार जॉस बटलर आणि जेकॉब बेथल यांच्याव्यतिरिक्त इतर फलंदाज फार काही करू शकले नाहीत. बटलरने ५२ धावांची आणि बेथलने ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली. तसेच शेवटी जोफ्रा आर्चरने २१ धावांची नाबाद खेळी केली.

भारताकडून हर्षित राणा आणि रवींद्र जडेजा यांना सर्वाधिक प्रत्येकी ३ विकेट्स मिळाल्या, तर मोहम्मद शमी, अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# खेळांसाठी जगभ्रमण करणारा अनोखा चाहता!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** काही माणसं आपला शौक पूर्ण करण्यासाठी वाट्टेल तितके पैसे खर्च करायला तयार असतात. जगातल्या कोणत्याही कोपऱ्यात जाऊन सामने व क्रीडा स्पर्धांचा आनंद घेतात. उपराजधानीत ओमप्रकाश मुंदडा नावाचे असेच एक चाहते आहेत. मुंदडा यांनी गेल्या ४२ वर्षांमध्ये जगभरात झालेल्या जवळपास सर्वच प्रमुख क्रीडा स्पर्धांचा स्टेडियममध्ये बसून आनंद घेतलेला आहे. टीम इंडियाचे जबरदस्त फॅन असलेले व धंतोली येथे राहणारे ७५ वर्षीय मुंदडा हे व्यवसायाने बिझनेसमन असून, त्यांना स्पोर्ट्स, फोटोग्राफी, प्रवास (ट्रॅव्हलिंग) आणि वाचनाचा भारी शौक आहे. उमेदीच्या काळात ते बॅडमिंटन व टेनिस खेळले होते. या दोन्ही खेळांमध्ये त्यांनी ओडिशा येथील संबळपूर विद्यापीठाचे नेतृत्व केले आहे.

त्या काळात हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्यासोबत ते जवळपास महिनाभर राहिले होते. ऐंशीच्या दशकात व्यवसायाच्या निमित्ताने ते नागपूरात स्थायिक झाले.

# मुक्तांगण इंग्लिश मिडीयम स्कूल संघाला सर्वसाधारण विजेतेपद !



**पुणे :** महाराष्ट्रीय मंडळाच्यावतीने आयोजित आंतर-शालेय मैदानी स्पर्धेत मुक्तांगण इंग्लिश मिडीयम स्कूल संघाने ४८ गुणांसह सर्वसाधारण विजेतेपद तर, महाराष्ट्रीय मंडळ इंग्लिश मिडियम स्कूल, टिळक रोड संघाने ३० गुणांसह उपविजेतेपद मिळवले. महाराष्ट्रीय मंडळाच्या चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत ५२ पेक्षा अधिक शाळांमधील ९५० हून अधिक खेळाडूंना भाग घेतला होता. ८ वर्षाखालील विद्यार्थ्यांसाठी ५० मी. धावणे, लांब उडी, रिले स्पर्धा, १२ वर्षाखालील वयोगटासाठी १०० मी. धावणे, लांब उडी, रिले स्पर्धा अशा मुले आणि मुलांच्या गटामध्ये स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. स्पर्धेचे पारितोषिक वितरण दिशा टुरिजमच्या संचालिका सौ. सुजाता शिंदे, महाराष्ट्रीय मंडळाचे सरचिटणीस रोहन दामले, महाराष्ट्रीय मंडळ शिक्षण विभाग संचालिका व स्पर्धा संयोजिका नेहा दामले, मुख्याध्यापिका निधी सामंत यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिन परदेशी यांनी तर, आभार सुवर्णा टकले यांनी मानले. स्पर्धेत एकूण दिड लाख रूपयांची पारितोषिके देण्यात आली. पहिल्या तीन विजेत्या संघांना मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक देण्यात आले. स्पर्धेला दिशा टुरिजम यांचे प्रायोजकत्त्व लाभले होते.

# ‘लायन्स् प्रीमियर लीग’ नायर ईगल्स्ने उद्घाटनाचा दिवस गाजवला

**पुणे :** लायन्स् डिस्ट्रीक्ट ३२३४डीर तर्फे आयोजित १५ व्या ‘लायन्स् प्रीमियर लीग’ २०२४-२५ टेव्न्टी-२० क्रिकेट स्पर्धेत अमित सिंग याने



केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे नायर ईगल्स् संघाने एसके वॉरीयर्स संघाचा ६ गडी राखून सहज पराभव केला आणि उद्घाटनाचा दिवस गाजवला. सहकानगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूलच्या मैदानावर आजपासुन सुरू झालेल्या या स्पर्धेच्या उद्घाटनाच्या सामन्यामध्ये पहिल्यांदा फलंदाजी करताना एसके वॉरीयर्स संघाचा डाव रंगलाच नाही. त्यांचे आव्हान १७.३ षटकामध्ये ६४ धावांवर संपुष्टात आले. अनिकेत शिर्के याने २० धावांची तर, सागर जाधव याने १३ धावांची खेळी केली. नायर संघाच्या अमित सिंग याने अचूक गोलंदाजी करताना ९ धावांमध्ये ३ गडी टिपले. त्याला संभाजी शिंदे (२-१३) आणि नितेश पटेल (२-१८) यांनी उत्तम साथ दिली. माफक धावांचे लक्ष्य नायर ईगल्स्ने १६.४ षटकामध्ये पूर्ण केले. संघाला विजय मिळवून देताना दिपक नवले याने नाबाद २३ धावांची खेळी केली. अमित सिंग (नाबाद ११ धावा) आणि के. वाघमारे (१० धावा) यांनीसुद्धा धावा जमवून संघविल्या आणि विजयात मोलाचा वाटा उचलला. स्पर्धेचे उद्घाटन लायन्स् डिस्ट्रीक्ट ३२३४डीर डिस्ट्रीक्ट गव्हर्नर ला. विजय सारडा, व्हाईस डिस्ट्रीक्ट गव्हर्नर ला. श्रेयस दिक्षीत, डिस्ट्रीक्ट ऑफिसर ला. राजेंद्र गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लायन्स् डिस्ट्रीक्ट ३२३४डीरचे क्रीडा प्रमुख भुपेंद्र सिंग धुल्लट आणि स्पर्धेचे मार्गदर्शक वसंतभाऊ कोकणे आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्पर्धेचे सहभागी संघातील खेळाडू आणि प्रशिक्षक उपस्थित होते.


# ऑस्ट्रेलियाच्या स्टार ऑल राऊंडरची अचानक निवृत्ती



**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स याचे चॅम्पियन्स ट्रॉफीत खेळणे अवघड होऊन बसलेले असताना कांगारूंना आणखी एक धक्का बसला आहे. त्यांचा स्टार ऑल राऊंडर मार्कस स्टॉयनिस याने अचानक वन डे क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय घेतला आहे. वर्ल्ड कप विजेत्या संघातील सदस्य असलेल्या स्टॉयनिसने वन डे क्रिकेटमधून तात्काळ निवृत्ती घेण्याचा धक्कादायक निर्णय घेतला आहे, परंतु तो ट्वेंटी-२० फॉरमॅटमध्ये राष्ट्रीय संघाकडून खेळणार आहे. स्टॉयनिसचा या महिन्याच्या अखेरीस पाकिस्तान आणि युएईमध्ये सुरू होणाऱ्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठीच्या ऑस्ट्रेलियाच्या प्राथमिक १५ सदस्यीय संघात समावेश केला गेला होता. पण, त्याच्या निवृत्तीमुळे संघात बदल होणार आहे. ३५ वर्षीय अष्टपैलू खेळाडू सध्या सुरू असलेल्या दक्षिण आफ्रिकेतील ट्वेंटी-२० फ्रँचायझी स्पर्धेत डर्बनच्या सुपर जायंट्सकडून खेळत आहे. जिथे त्याला गोलंदाजी करताना हॅमस्ट्रिंगची दुखापत झाल्याचे वृत्त आहे. "ऑस्ट्रेलियासाठी वन डे क्रिकेट खेळणे हा एक अविश्वसनीय प्रवास होता. मी या सुवर्णकाळात घालवलेल्या प्रत्येक क्षणाबद्दल कृतज्ञ आहे. सर्वोच्च स्तरावर माझ्या देशाचे प्रतिनिधित्व करणे ही गोष्ट मी नेहमीच जपून ठेवेन. हा निर्णय सोपा नव्हता, पण मला वाटते की वन डे क्रिकेटमधून निवृत्त होण्याची आणि माझ्या कारकिर्दीच्या पुढील टप्प्यावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करण्याची हिच योग्य वेळ आहे," असे स्टॉयनिसने सांगितले. २०१९च्या ऑस्ट्रेलियन क्रिकेट पुरस्कारांमध्ये तो सर्वोत्तम वन डे खेळाडू ठरला होता. त्याने २०१५ मध्ये वन डे क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि त्याने ७१ वन डे सामन्यांत प्रतिनिधित्व केले आहे. त्याने १४९५ धावा केल्या आहेत आणि १ शतक व ६ अर्धशतकं झळकावली आहेत. इडन पार्कवर न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात सातव्या क्रमांकावर येताना त्याने ११७ चेंडूंत १४६ धावांची खेळी केली होती.

एक रौप्य व एक कास्यपदकाची कमाई

# सायकलिंगमध्ये महाराष्ट्राचा दुहेरी धमाका!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सायकलिंगमधील पदकांची मालिका कायम राखताना आज महिला गटात एक रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकले

महिलांच्या चार किलोमीटर अंतराच्या सांघिक कौशल्य स्पर्धेत महाराष्ट्राला कांस्यपदक मिळाले. या संघात वैष्णवी गाभणे संस्कृती खेसे, सिया ललवाणी व पूजा दानोळी यांचा समावेश होता. महाराष्ट्राने ही शर्यत पाच मिनिटे ३२.६४३ सेकंदात पार केली. हरियाणा (पाच मिनिटे २६.९२० सेकंद) व ओडिशा (पाच मिनिटे ३०.४२३ सेकंद) यांनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदक जिंकले.

महाराष्ट्राच्या श्वेता गुंजाळ हिने पाच फेऱ्यांचा समावेश असलेल्या 'केरीन' सायकलिंग या क्रीडा प्रकारात रौप्यपदक पटकाविले.

# कर्करोग देखभालीकरिता रु. ३ कोटींचा निधी उभारण्याकरिता देशभरातील सायकलपटू एकवटणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** जागतिक कर्करोग दिनानिमित्त, कॅन्सरग्रस्त मुलांना लाभ देणारे भारतातील सर्वात मोठे धर्मादाय सायकल आव्हान, सायकल फॉर गोल्ड, ४ फेब्रुवारी रोजी लॉन्च करण्यात आले. बालपणातील कर्करोगाच्या देखभालीसाठी जनजागृती आणि निधी उभारण्यासाठीची ही देशव्यापी चळवळ आहे. कॅनकिड्स किड्सकॅन-नॅशनल सोसायटी फॉर चेंज फॉर चाइल्डहुड कॅन्सर इन इंडिया यांनी आयोजित केलेल्या सायकल फॉर गोल्डच्या चौथ्या आवृत्तीने ४० दिवसांत एकत्रितपणे ६,००,००० किलोमीटर सायकल चालवण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे. यंदा कॅनकिड्सच्या माध्यमातून २४००० कॅन्सरग्रस्त मुलांच्या उपचारांना मदत करण्यासाठी देणगीदार, प्रायोजक आणि कॉर्पोरेट्सच्या माध्यमातून ३ कोटी रुपये जमा करण्याचे उद्दिष्ट आहे

चेन्नई, मुंबई, नवी दिल्ली, कोलकाता, सांगली आणि गोव्यातील अवेअरनेस राईडना देशभरातील रायडर, सायकलिंग क्लब, कर्करोगातून बचवलेल्यांचा या लॉन्चला आश्चर्यकारक पाठिंबा मिळाला. कर्करोगग्रस्त बालक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी रुग्णालये, कॅनकिड्स केअर सेंटर आणि होम अवे फ्रॉम होम्स येथून हिरवा झेंडा दाखवण्यासाठी सायकलस्वारांनी हिवाळ्यातील कडाक्याच्या थंडीलाही जुमानले नाही.

कॅनकिड्स किड्सकॅनः विथ सायकल फॉर गोल्डच्या संस्थापिका-अध्यक्ष पूनम बगई म्हणाल्या, “आम्ही सामूहिक कृतीच्या प्रभावाबद्दल एक शक्तिशाली संदेश देतो. प्रत्येक किलोमीटर चाललेली सायकल आपल्याला कर्करोगग्रस्त मुलांसाठी चांगले उपचार, आधार आणि अस्तित्व सुनिश्चित करण्यासाठी एक पाऊल जवळ आणते. आम्ही यंदा देणगीदार, प्रायोजक आणि कॉर्पोरेट्सच्या पाठिंब्याने २४००० मुलांच्या सर्वांगीण उपचार आणि आर्थिक संरक्षणासाठी योगदान देत आहोत. प्रत्येक किलोमीटर सायकलसाठी ५० रुपये याप्रमाणे ३ कोटी रुपये जमा करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.” या ४० दिवसांच्या चॅलेंज म्हणजेच आव्हानात दिनांक ४ फेब्रुवारी रोजी जागतिक कर्करोग दिन आणि दिनांक १५ फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय बाल कर्करोग दिनाचा समावेश आहे. आणि हा उपक्रम इंटरनॅशनल युनियन फॉर चाइल्डहुड कॅन्सर थीम-युनायटेड बाय युनिक, पीपल सेंटर्ड केअर, विन फॉर एव्हरी चाइल्ड’वर आधारित असेल!

# मुंडे स्पोर्टस्, मिझुकी संघ, नॉक ९९, २२ यार्डस्, विजय क्रिकेट क्लब संघांची विजयी आगेकूच !!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे क्रिकेट अ‍ॅकॅडमी आणि सागर कांबळे यांच्यावतीने कै. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित ‘अभिषेक ठाकूर करंडक’ आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्रेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत मुंडे स्पोर्टस्, मिझुकी संघ, नॉक ९९, २२ यार्डस्, विजय क्रिकेट क्लब आणि ब्रेव्हहार्टस् या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी करत आगेकूच केली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट अ‍ॅकॅडमीच्या मैदानावर आणि येवलेवाडी येथील ब्रिलीयंट्स स्पोर्टस अ‍ॅकॅडमीच्या



मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत रविंद्र जाधव याने केलेल्या ४४ धावांच्या जोरावर मुंडे स्पोर्टस् संघाने स्पोर्टीव्ह इलेव्हनचा ३८ धावांनी सहज पराभव केला. या विजयामध्ये मुंडे स्पोर्टस्च्या मयुर गिड्डे याने नाबाद ४९ धावांची खेळी केली. दुसऱ्या सामन्यामध्ये हिमांशु अगरवाल याने



फटकावलेल्या ७६ धावांमुळे मिझुकी संघाने ग्लोरी स्पोर्टस् फाऊंडेशनचा ३७ धावांनी पराभव केला. यशराज खाडे याच्या खेळीच्या जोरावर नॉक ९९ संघाने स्केलअप ब संघाचा ७ गडी राखून पराभव केला आणि आगेकूच केली.

सागर सिंग याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर २२ यार्डस्ने ग्लोरी स्पोर्टस् फाऊंडेशनचा ६६ धावांनी सहज पराभव केला. सागर याने ११ धावांमध्ये ५ गडी बाद करून चमकदार गोलंदाजी केली. ऋषीकेश जाधव याने १६ धावांमध्ये ४ गडी टिपत सागरला योग्य साथ दिली. ओंकार मोहीते याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे विजय क्रिकेट क्लबने थर्डआय स्पोर्टस् फाऊंडेशनचा ९ गडी राखून सहज पराभव केला. ओंकार याने केवळ चार धावांमध्ये तीन गडी बाद केले. रोहन नांबियार याने केलेल्या नाबाद ६४ धावांमुळे ब्रेव्हहार्ट संघाने रायझिंग क्रिकेट क्लबचा ५ गडी राखून पराभव केला आणि आगेकूच केली.

# जडेजाने केला अनोखा पराक्रम!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील वनडे मालिकेला नागपुरात सुरुवात झाली आहे. या सामन्यात इंग्लंडचा दिग्गज फलंदाज जो रूट तब्बल १५ महिन्यांनंतर वनडे फॉरमॅटमध्ये परतला. पण हा सामना त्याच्यासाठी चांगला गेला नाही. भारतीय संघातील दिग्गज लेफ्ट आर्म स्पिनरने त्याला तंबूचा रस्ता दाखवला. त्याला ३१ चेंडूत केवळ १९ धावा करता आल्या आणि जडेजाच्या फिरकीत तो झेलबाद झाला. यासोबतच एक आश्चर्यकारक विक्रमही बनला आहे. खरं तर, जो रूट हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये जडेजाविरुद्ध सर्वाधिक वेळा बाद झालेला फलंदाज ठरला आहे. जडेजाने १२व्यांदा त्याची शिकार केली आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी आपली तयारी मजबूत करण्यासाठी दोन्ही संघ वनडे मालिकेत घाम गाळत आहेत. पहिल्या सामन्यात इंग्लिश संघाच्या सलामीवीरांनी वेगवान सुरुवात केली होती. पण बेन डकेट आणि फिल सॉल्टनंतर संघाने सातत्याने विकेट गमावण्यास सुरुवात केली. इंग्लंडच्या फलंदाजीचा कणा मानल्या जाणाऱ्या जो रूटलाही फार काही करता आले नाही. रवींद्र जडेजाने त्याला एकदिवसीय क्रिकेटमध्ये चौथ्यांदा आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १२व्यांदा बाद केले. जडेजाने आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक वेळा रूटला बाद केले आहे. रूटशिवाय त्याने स्टीव्हन स्मिथला सर्वाधिक ११ वेळा आणि अँजेलो मॅथ्यूजला १० वेळा बाद केले आहे.

# पुणेकरांनी ठरवून मला 'ट्रिपल महाराष्ट्र केसरी' होऊ दिलं नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगली :** पुणे जिल्ह्यातील सांगवी मुक्कामी २००९ ला झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत ‘ट्रिपल महाराष्ट्र केसरी’ होण्यासाठी आखाड्यात उतरलो होतो. ५० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदा एखादा मल्ल तिसऱ्यांदा ‘महाराष्ट्र केसरी’ होण्यासाठी लढत होता, मात्र पुण्यात राजकारण शिजलं. पुणेकरांनी ठरवून सहा मिनिटांची कुस्ती दीड तास लांबवली. माझा मानसिक छळ होईल, अशीच ती रचना होती. त्यांनी ठरवून मला त्या सन्मानापासून रोखलं,” असा आरोप डबल महाराष्ट्र केसरी पै. चंद्रहार पाटील यांनी केला.

पुण्यात नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत शिवराज राक्षे या पैलवानावर अन्याय झाल्याच्या भावनेतून चंद्रहार पाटील यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी आपल्या दोन्ही गदा परत देण्याचा इशारादेखील दिला आहे. ‘महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेने २००९ मध्ये जे घडलं, ते माझ्यावर अन्यायकारक होतं, हे कबूल करावं,’ अशी मागणी केली आहे. सन २००९ ला नेमकं काय घडलं, याबाबत ‘सकाळ’ने चंद्रहार यांच्याशी संवाद साधला. ते म्हणाले, “सन २००७ ला औरंगाबाद मुक्कामी मी पहिल्यांदा महाराष्ट्र केसरी झालो. जिल्ह्याला २८ वर्षांनंतर गदा मिळाली. कडेगाव मुक्कामी ‘डबल महाराष्ट्र केसरी’ स्पर्धा झाली. आपल्या मातीत खेळलो, जिंकलो. ३५ वर्षांनंतर महाराष्ट्रात डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा मान मिळाला.

मिश्र दुहेरीत राही-प्रवीण जोडीला कांस्य

# स्वप्नील कुसाळेचा नेमबाजीत कांस्यपदकावर वेध!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्नील कुसाळे याने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पिछाडीवरून जोरदार मुसंडी मारत महाराष्ट्राला कांस्यपदक जिंकून दिले. याचबरोबर राही सरनोबत व प्रवीण पाटील या जोडीने मिश्र दुहेरीच्या एकतर्फी लढतीत बाजी मारत महाराष्ट्राला आणखी एक कांस्यपदक जिंकून दिले.

त्रिशूल शूटिंग रेंजवर गुरुवारी (दि.६) संपलेल्या नेमबाजी स्पर्धेत अखेरच्या दिवशी महाराष्ट्राची दोन कांस्यपदकाने सांगता झाली. ऑलिम्पिक पदकविजेत्या स्वप्नील कुसाळेने सुरुवातीच्या संघर्षानंतर स्वत:ला सावरत पुरुषांच्या ५० मिटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात ४४७.७ गुणांसह कांस्यपदकाला गवसणी घातली. सेनादलाच्या नीरज कुमारने एकूण ४६४.१ गुणांसह सुवर्णपदकावर मोहोर उमटवली, तर मध्य प्रदेशाचा प्रताप सिंग तोमर ५६२.४ गुणांसह रौप्य पदकाचा मानकरी ठरला.

स्वप्नील कुसाळेची सुरुवात समाधानकारक झाली नाही. थ्री पोझिशनच्या नीलिंग (गुडघ्यावर बसून) प्रकारात स्वप्नीलची दहाव्या शॉटपर्यंत अखेरच्या स्थानावर



घसरण झाली. त्यानंतर प्रोन प्रकारातही २५व्या शॉटपर्यंत तो अखेरच्याच स्थानावर होता. त्यानंतर स्वप्नीलने कामगिरीत सुधारणा करीत ३०व्या शॉटपर्यंत दोन स्थानाने प्रगती करीत सहावे स्थान गाठले, तर ३५व्या शॉटपर्यंत थेट तिसऱ्या स्थानी मुसंडी मारताच महाराष्ट्राच्या पदकाच्या आशा पल्लवित केल्या. इलिमिनेशनचा थरार सुरू झाल्यानंतर स्वप्नीलने अचूक वेध घेत किमान कांस्यपदक, तरी हातातून निसटणार नाही, याची काळजी घेतली.

## राही - प्रवीणची एकतर्फी बाजी

- राही सरनोबत आणि प्रवीण पाटील या महाराष्ट्राच्या जोडीने १० मिटर एअर पिस्तूल मिश्र दुहेरीच्या एकतर्फी लढतीत यजमान उत्तराखंडच्या जोडीचा १७-३ असा धुव्वा उडवून कांस्यपदक जिंकले. १० फेऱ्यांचा या लढतीत राही - प्रवीण या जोडीने सहज बाजी मारली. नवख्या उत्तराखंडच्या जोडीचा पराभव झाला असला, तरी त्यांनी इथपर्यंत मजल मारून उपस्थितांची मने जिंकली.

## .. तरीही स्वप्नीलचं ठरला मुख्य आकर्षण!

- ऑलिम्पिक पदकविजेत्या स्वप्नील कुसाळेला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले, तरी तोच त्रिशूल नेमबाजी रेंजवरील मुख्य आकर्षण ठरला. त्यांच्यासोबत फोटो काढण्यासाठी चाहत्यांची झुंबड उडाली होती. उत्तराखंडच्या दोन-तीन मंत्र्यांसह अनेक पदाधिकाऱ्यांचाही त्यामध्ये समावेश होता.

#रा